१८५३
म. ग्रं. सं. ठाणे
विषय चरित्र
सं. क्र. १५२२
REFBK-0007932

म. ... ग्रा
क्र. १५२२
१५२२

# वामन टिळक

## ...दर्शन व काव्यविवेचन



लेखक : देवदत्त नारायण टिळक

नाशिक

किंमत
दीड रुपया

★

स्मृतिचित्रांच्या भाग १, २ व ३ च्या नव्या आवृत्त्या तयार असून केशव भिकाजी ढवळे, कर्नाटक प्रिंटिंग प्रेस, चिरा बझार मुंबई २. ह्या पत्त्यावर त्या मिळतात.

स्मृतिचित्रें भाग ४ ची नवी आवृत्ति छापत आहे.

स्मृतिचित्रें संक्षिप्त आवृत्तीहि ढवळ्यांकडे मिळते.

★

# नारायण वामन टिळक

## व्यक्तिदर्शन व काव्यविवेचन

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
मराठी ग्रंथ संग्रहालय
०१५६० दि.
प्रा. ह्वा वि. क्र. ७९३२

नारायण वामन टिळक ह्यांचें चरित्र व त्यांचें काव्य, तसच त्यांचें काव्य व त्यासंबंधीं कळत नकळत झालेले गैरसमज हीं विषय-विवेचनाच्या दृष्टीनें इतकीं अभिन्न आहेत, कीं खालील विवेचनांत पुष्कळ ठिकाणीं लिहिण्याच्या ओघात त्या तिन्हींची जी सरमिसळ झालेली दिसते ती व तिच्यामुळें मधून मधून आलेला विस्कळित-पणा हीं अपरिहार्य आहेत. टिळकांचें जीवनचरित्र त्यांच्या कवितेपासून अलग करून ह्या दोहोंचें विवेचन वेगवेगळें करायचें, आणि नतर झालेले गैरसमज शोधून त्यांचें निराकरण करण्यांत पुस्तकाचा आणखी एक भाग खर्ची घालायला म्हटलें तर त्या तिन्ही भागांत पुन्हा संदर्भासाठीं मजकुराची पुनरुक्ति करावी लागली असती. तेव्हां लिहितांना मूळारभीं जी पद्धत अवलंबिली तीच कायम ठेवल्यास लेखना-च्या ओघाचा वेग व दिशा यत्किंचितहि न बदलतां व विवेचनांत खटके निर्माण न करता माझ्या मनांतील भाव मी वाचकापुढें सुलभ रीतीनें मांडूं शकेन असें वाटल्यानें कांहीं प्रेमळ मित्रांनीं हे तिन्ही विषय अलग करण्याची केलेली योग्य परतु वरील कारणामुळें अव्यवहार्य असलेली सच्चना मी स्वीकारूं शकलों नाहीं ह्याबद्दल दिलगिरी वाटते.

REFBK-0007932

पुस्तक लिहिलें जात असतानाच तें वाचून पाहून त्यासंबधीं वेळोवेळी सूचना केल्या त्याबद्दल माझे मित्र प्रा. वि. बा. आंबेकर व प्रिन्सिपाल भा. ल. पाटणकर ह्यांचा मी ऋणी आहें. माझा मुलगा चि. ध्रुव ह्यानें तर तें वारंवार वाचून पुष्कळ उपयुक्त फिरवाफिरव करण्यांत मला साह्य केलें, तें व महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार ह्यांचेंहि ह्या लेखन कालात पत्रव्यवहारानें झालेलें मार्गदर्शन मी विसरणार नाहीं.

ह्या पुस्तकाची जुळणी मी कित्येक वर्षांपासून करीत आहें तरी तें तयार करून छापखान्यात देण्याचें अगदीं आयत्या वेळीं ठरल्यानें वरील व्यक्तींच्या साह्यामुळेंच त्याला त्याचें आहे तितपत स्वरूप प्राप्त झालें आहे हें कबूल केलें पाहिजे.

टिळकांच्या कवितेची दुसरी बाजू-कैफियत-आज प्रथमच पुढे मांडण्यांत येत आहे व तिचा उपयोग टीकाकाराइतकाच विद्यार्थ्यांना होण्याचा संभव असल्यानें टिळकांच्या कवितेंच्या पांचव्या आवृत्तींत हीं पानें समाविष्ट करीत आहें.

शान्तिसदन, नाशिक
४ मे १९५३

दे. ना. टिळक

ता.क. प्रस्तावनेला ताजा कलम घालण्याचें भाग्य फार थोड्यांना मिळत असतें. चाळीस पानें छापून झाल्यावर ज्या कित्येक थोर व्यक्तींनीं मला साह्य केलें त्यांचा नामनिर्देश मी पुस्तकाच्या शेवटीं केला आहे. तो वाचण्याची तसदी वाचकांनीं अवश्य घ्यावी अशी नम्र विनती आहे.

३०-९-५३

दे. ना. टिळक

# नारायण वामन टिळक
# व्यक्तिदर्शन व काव्यविवेचन

## बालपण

नारायण वामन टिळक ह्यांचा जन्म ता ६ डिसेंबर १८६२ रोजीं रत्नागिरी जिल्ह्यांतील दापोली तालुक्यांत करजगाव नांवाच्या एका लहानशा खेड्यात झाला रत्नागिरी जिल्हा महाबळेश्वरपासून दूर असला तरी तळ कोंकणांत सृष्टिसौंदर्य महाबळेश्वरइतकेंच आढळून येत टिळकांचे मातुल गोविंदराव बेडेकर येथें रहात. टिळकांचें मूळ गांव चिखलगांव. परंतु आजोळीं जन्म व आजोळींच बाळपण गेल्यानें चिखलगांवापेक्षा, अगदी बाळपणच्या अशा करजगांवच्याच आठवणी त्यांना अधिक असत.

टिळकांच्या काव्यगुणांचा प्रादुर्भाव येथेंच झाला असें म्हणावें लागेल. बेडेकर आजोबा एक साधुपुरुष होते. त्यांनीं पंढरीची वारी केलेली होती. वेळ मिळाला, कीं आपल्या लहानग्या नातवाला कांखोटी मारून त्यांनीं दूर निर्जन रानीं जाऊन त्याच्याशीं खेळत बसावें. तुकारामाची भक्तिरसपरिपूर्ण भजनें म्हणावीं 'नारायण नारायण' म्हणून मुलाला झेलावें 'झेल्या नारायण' म्हणून त्यांचें कौतुक करावें. नारायण हें नांवहि त्यांचेंच दान आहे. बाहेर प्रेमळ आजोबांसारखा खेळगडी व नितान्त सुंदर अशा निसर्गाशीं एकतानता, तर घरीं त्यांची प्रेमळ आई! ह्या तिन्हींनीं मिळून त्यांना कवित्वाची दीक्षा त्यांच्या वयांत दिली टिळकांच्या मातोश्री जानकीबाई ह्या स्वतः कवयित्री होत्या त्यांच्या काव्यांतील केवळ खालील दोनच ओळी काळाच्या जबड्यांतून अजून टिकाव धरून राहिल्या आहेत.

> ही चिंधीची अल्प बाहुली, प्रताप हींचा पहा।
> बाळपणापासून मुलींना, शिकवी संसार हा ॥

ही माउली एक अत्यंत निःस्पृह, सत्यवादी व प्रेमळ स्त्री होती आंत एक व बाहेर एक असा दुहेरी संसार तिला माहीत नव्हता व तेच गुण पुढें टिळकांच्या चरित्रांत उतरलेले दिसून येतात टिळक होतां होईल तों आईला चिकटून चिकटून असत ह्याचें कारण त्यांचे वडील वामनराव! वामनरावांचें टिळकांना अतिशय भय वाटे. आणि टिळकांची जन्मकुंडली, हातांपायांचीं बोटें, कपाळाची

लोचीरही वगैरे वामनरावांच्या पसंतीला उतरणारीं नसल्यानें बापाच्या तोंडचा कोमल शब्द त्यांच्या जन्मांत एकदांहि ऐकलेला टिळकांना आठवत नव्हता. शिवाय वडील आपल्या प्रेमळ मातेला विनाकारण छळतात म्हणूनहि टिळक आपल्या वडिलांचा राग करीत.

टिळकांच्या आईला लिहितांवाचता येत असल्यामुळें टिळकांना अक्षर-ओळख आईकडूनच झाली.

१८६८ च्या सुमारास वामनरावांची तलाठी म्हणून ठाणें जिल्ह्यांतील मोखाडा गावीं नेमणूक झाली. मोखाडा अगदीं आडवळणी तेव्हां वामनरावांनी आपली मंडळी कल्याणास ठेवली येथें चार चेथें संपूर्णपणें आपल्या प्रेमळ मातेच्या सहवासांत टिळकांनीं काढलीं मराठीचें बरेंचसें त्यांचें शिक्षण येथें झालें. ह्याच ठिकाणीं त्यांना वाचनाचा अतिशय नाद लागला जानकीबाई कविता करीत, पण वामनराव कधींमधीं मोखाड्याहून आले व त्यांच्या हातीं त्या लागल्या तर त्या अग्नये स्वाहा होत टिळकांनीं पुढें गंगा नांवाचें पुस्तक लिहिलें होतें त्याच्या अर्पणपत्रिकेवरून जानकीबाईंचा टिळकांवर कसा परिणाम झाला होता तें स्पष्ट होतें. अर्पणपत्रिकेत टिळक म्हणतात,

> "जिनें स्वत रचलेलीं गाणीं म्हणून दाखवून मला कविताप्रिय केलें व माझ्या अंगीं रसिकता आणिली, तिच्या पवित्र चरणीं हें अल्प पुष्प, परमभक्तीनें व पुत्रास सहाजिक अशा ममतेनें मी वाहातों"

एक दिवस मोखाड्याहून वामनरावांचें पत्र आलें, कीं मी अतिशय आजारी आहें डोळेभेट द्यायला तावडतोब यावें वामनराव खरोखर आजारी नव्हते आजारी होत्या जानकीबाई! परंतु आपल्या पत्नीचें आपल्यावर किती प्रेम आहे हें पाहण्याची वामनरावाची लहर लागली व त्यांनीं हें पत्र पाठविलें. नारायण मोठा म्हणून व माधव अगदीं लहान म्हणून जानकीबाईनीं त्या दोघांना बरोबर घेतले, बाकी मुलं कल्याणास ठेवलीं आणि त्यांनीं मोखाड्याचा चाळीस मैलांचा प्रवास तसल्या अशक्तपणात पायीं पायीं केला मोखाड्यास आल्यावर वामन-रावांना चांगले हिंडते फिरते पाहून त्यांना फार आनंद वाटला. पण तो फार

चेळ टिकला नाहीं. डोक्यावरचा भरलेला हांडा उतरूं लागण्याची सूचना म्हणजे नवऱ्याचा अपमान अशा कल्पनेनें वामनरावांनीं जानकीबाईचे ते शब्द ऐकतांच त्यांच्या कमरेंत लाथ मारली व त्या ज्या खालीं पडल्या त्या पुन्हा उठल्या नाहींत. आठ दिवसांनीं त्यांचा अंत्यविधि उरकून टिळकांसह वामनराव आपल्या पत्नीच्या अस्थि गंगेंत टाकायला त्र्यंबकेश्वरीं आले.

## विद्यार्थिदशा

टिळकांचें बाळपण येथेंच संपलें असें म्हणावें लागेल. अकरा वर्षांच्या टिळकांनीं आपल्या मनाशीं ठरविलें, कीं आतां हें घर सोडून आपला मार्ग आपण स्वतः अवलंबायचा. आईच्या अस्थि गंगेंत टाकल्यावर [illegible] व विचारता टिळक त्र्यंबकेश्वरहून पळून निघाले. त्र्यंबकहून बाहेर पडणारा एकच राजरस्ता आहे. तो त्यांनीं धरला व चालत चालत ते नाशकास येऊन पोंचले. तें साल १८७३ असावें. नाशकास आल्यावर काय करायचें, कोठें जायचें कुणाकडे मुक्काम ठोकायचा वगैरे कांहीच त्यांना ठाऊक नव्हतें. इतकेंच काय पण आपण आलों आहों तें गांव नाशिक आहे ह्याचीहि त्यांना कल्पना नव्हती जातां जातां गंगेच्या कांठीं जाऊन ते पोंचले व तेथून पुढें कुठें जायचें हा विचार करीत तेथेंच बसले. समोर मायले नांवाचा त्यांच्याच वयाचा एक मुलगा स्नान करीत होता. त्याचें लक्ष टिळकांकडे जाऊन त्यानें त्यांची चौकशी केली. टिळकां-ची परिस्थिति ध्यानांत येतांच तो त्यांना आपल्या घरीं घेऊन गेला व पुढें स्वतंत्र बिऱ्हाड करीपर्यंत टिळक मायल्यांकडेच राहिले मुलगा गेला म्हणून वामनरावांना फारसें दुःख झालें नव्हतें, पण] त्यांचा पत्ता लागल्यावर मात्र त्यांना आनंद वाटला. कारण एक मोठी गैर सोय आतां दूर झाली. त्यांनीं टिळकांचीं सारीं भावंडें नाशकास त्यांच्याकडे विद्याभ्यासासाठीं पाठवून दिलीं व टिळक त्यांचे पालक बनले. हा संसार चालविण्यास वामनराव त्यांना आठ रुपये दरमहा पाठवूं लागले. त्या वेळचे आठ रुपये आजच्या ऐंशी रुपयांच्या ठिकाणीं होते तरी खाणारीं माणसेंहि चांगलीं चारसहा होतीं. त्यामुळें टिळकांना मिळेल तें काम करून ह्या आठ रुपयांत भर घालावी लागे.

नाशकास आल्यावर टिळक खरे खरे विद्यार्थी बनले आधीं आधीं त्यांचें लक्ष संस्कृतकडे वळलें व भटजीच्या मठांत त्यांनीं प्रवेश करून घेतला. ह्या ठिकाणीं टिळकांची व गणेशशास्त्री लेले ह्यांची गांठ पडली. आईच्या खालोखाल आपल्या काव्यस्फूर्तीचें श्रेय टिळक लेलेशास्त्र्यांना देत. त्या वेळची टिळकांची परिस्थिति, दिनचर्या वगैरे प्रत्यक्ष पहाणारे लक्ष्मणशास्त्री लेले लिहितात : " हा काल १८७८–८२ हा असावा. मी त्या वेळीं सुमारें आठदहा वर्षांचा असेन. नारायणराव हे माझ्यापेक्षां बरेच वडील होते. त्याचा सर्वांत धाकटा भाऊ महादेव म्हणून होता. तो व मी मराठी शाळेंत सोबती होतों. यामुळें तो माझ्याकडे व मी त्याच्याकडे जात येत असूं. माझे वडील के. गणेशशास्त्री हे नाशिक येथें सुप्रसिद्ध विद्वान् व ग्रंथकार होते. रा. ब. रानडे, रा. ब. गोपाळराव हरि देशमुख (लोकहितवादी) वगैरे बडी मंडळी त्या वेळीं नाशिक येथें होती. त्यांच्या उत्तेजनामुळें तेथें 'स्वसुधारणेच्छु' नांवाची सभा स्थापित होऊन तिचे सेक्रेटरी शेवटपर्यंत के. गंगाधर नरसिंह केतकर वकील हे होते. ही सभा साप्ताहिक असून हिच्यांत विद्वान् व बहुश्रुत गृहस्थांचीं व्याख्यानें होत. ह्या सभेचें अध्यक्षपद माझे वडील गणेशशास्त्री यांच्याकडेच बहुतकरून असे. ज्या तरुण गृहस्थांना या सभेंत बोलण्याची तालीम मिळाली त्यांपैकीं तुमचे वडील नारायणराव, बळवंत खंडोजी पारख, व पंचवटींतील भोंडे नांवाचे एक गृहस्थ प्रमुख होते. आमचे वडील गोरारामाचे मंदिराजवळ वैद्यांचा वाडा आहे तेथें राहत असत. त्यांची–(टिळकांची)–स्थिति अत्यंत विपन्न होती. सगळ्या कुटुंबाचें भरण नारायणरावावर पडे व तो भार त्यांनीं मोठ्या आनंदानें व संतोषानें सहन केला असें दिसे.

"माझे वडील विद्वान् व कवि म्हणून प्रसिद्ध होते. त्यांचा व नारायणरावाचा संबंध या काळांत जुळला. त्यांची प्रथमभेट मला आठवत नाहीं पण पुढल्या भेटी चांगल्या आठवतात. नारायणरावांचा मोकळा व प्रेमळ स्वभाव, त्यांची कविवृत्ति, शालीनता व विद्याव्यासंग पाहून माझ्या वडिलांना मोठा आनंद वाटे. नारायणरावांनीं कोणतीहि नवी कविता केली, कीं ती ते गणेशशास्त्री यांना आणून दाखवीत. कोणताहि एखादा गद्यलेख लिहिला तरी ते शास्त्रीबुवांस आणून वाचून दाखवीत. शास्त्रीबुवा नारायणरावांचें वारंवार अभिनंदन करीत व मधून मधून सूचनाहि देत. एकदा नारायणरावांनीं एक नवी कविता आणून शास्त्रीबुवांस

दाखविली ती ऐकतांच शास्त्रीबोवा फार संतुष्ट झाले व 'भले नारायणराव' असे उद्‌गार त्यांनीं काढले

"नारायणराव शास्त्रीबोवांना गुरुस्थानीं समजत व शेवटपर्यंत नारायणरावांनीं त्यांचेविषयीं आदरबुद्धि ठेवली होती.

"वरील काळांत महाराष्ट्रांत जिल्हानिहाय वक्तृत्वसमारंभ निघाले होते त्यांत भाषणें करून नारायणरावांनीं बक्षिसें मिळविलीं भाषणाचे मुद्दे व त्यांची मांडणी या गोष्टी गणेशशास्त्र्यांच्या घरीं होत असत.

"नारायणरावांचें भाषण फार मधुर असे. यावरून गणेशशास्त्री त्यास विनोदानें 'महाराष्ट्रकोकिळ' असें म्हणत एका वर्षी पूर्वोक्त बळवंत खंडूजी पारख, भोंडे व नारायणरावजी एकाच विषयावर वक्तृत्वसभेंत बोलले. त्यांचीं एकाच विषयावर भाषणें होण्याचें गणेशशास्त्र्यांच्या घरींच ठरलें होतें. त्याच वेळीं शास्त्रीबुवांनीं भाकित केलें कीं आमचा 'महाराष्ट्रकोकिळ' पहिला येणार व तसेंच झालें, याचें शास्त्रीबोवा वगैरे मंडळीनें मोठें कौतुक केलें.

"नारायणराव आठवड्यांतून एकदोन वेळ व विशेषतः रविवारीं आमच्या घरीं दुपारीं तीनचार वाजतां येत, व एकदोन तास बसत. त्या वेळांत मराठी काव्यांतील शंकास्थळें, नवीन कवितावाचन, संस्कृत काव्यनाटकालंकारातील कांहीं चर्चा असे विषय असत. शास्त्रीबुवांची दृष्टी मंद होती तेव्हा ते कांहीं संस्कृत ग्रंथ नारायणरावांकडून वाचवीत असत.

"एके दिवशीं गंगाधर नरसिंह केतकर यानीं मित्रमंडळी भोजनास बोलावली त्यांत गणेशशास्त्री व टिळक हेहि निमंत्रितांपैकीं होते. या दिवशीं टिळकांनीं पंक्तीमध्यें एक श्लोक नवा रचून म्हटला. त्यांत केतकर, रानडे, देशमुख, लेलेशास्त्री यांचीं नांवें गुंफलीं होतीं. या वेळीं टिळकांच्या मधुर आवाजाची, शीघ्रकवित्वाची व रचनाचातुर्याची सगळ्यांनीं तारीफ केली.

'गणेशशास्त्र्यांच्या सहवासानें टिळकांच्या काव्यशक्तीचा विकास झाला, संस्कृत भाषेवर त्यांनीं प्रभुत्व मिळविलें व वक्तृत्व संपादन केलें. पण अजून एक

फार मोठी उणीव होती ती भरून काढायला जवळ पैसे नव्हते. तेव्हां त्यांनीं कोणाला विचारलें की इंग्रजी कसें शिकायचें हो? ह्या शास्त्र्याला इंग्रजीचें काय करायचें व हा काय इंग्रजी शिकणार असें इंग्रजी शिकणाऱ्या त्या गृहस्थाला वाटून त्यानें टिळकांना डिक्शनरी पाठ करायला सांगितलें! टिळकांची स्मरण-शक्ति उत्तम, शिवाय जुन्या पद्धतीनें ते संस्कृत पढलेले, तेव्हां डिक्शनरी पाठ करणे त्यांना अवघड वाटलें नाहीं. त्यांनीं तावडतोब तें काम हातीं घेतलं व कांहीं-(हीं एम् पर्यंतची होतीं)-अक्षरें त्यांचीं तोंडपाठ झालीं पुढें नाशिक हायस्कूलचे मुख्याध्यापक रा. परांजपे ह्यांची गाठ पडून त्यांनीं टिळकांना तावडतोब इंग्रजी चौथ्या इयत्तेंत दाखल करून घेतलें."

अशा रीतीनें नाशकास आल्यावर बरोबर पाच वर्षांनीं म्हणजे १८७८ सालीं टिळक इंग्रजी शाळेंत दाखल झाले. शाळेंत नांव दाखल झालें तेव्हाचें त्यांचें वय १६ वर्षें २६ दिवस असें लिहिलेलें आहे टिळकांनीं २५ जुलै १८८० त सहाव्या इयत्तेंतून शाळा सोडली. एवढेंच त्यांचें इंग्रजी शिक्षण होतें परंतु वक्तृत्वांत आपला हातखंडा व्हावा म्हणून त्यांनीं बर्क, मिल इत्यादि वक्त्यांचीं इंग्रजी भाषणें तोंडपाठ करून टाकलीं होतीं व इंग्रजींत त्यांनीं इतकें प्रावीण्य मिळविलें होतें की माझ्या बी.ए.च्या वेळीं ते माझ्या अभ्यासक्रमांतील इंग्रजी मला सांगू शकले.

## पुढील पंधरा वर्षं

अशा रीतीनें विद्यार्थी दशेचीं सात वर्षें संपलीं. कवि, लेखक व वक्ते म्हणून टिळकांची प्रसिद्धि त्या काळांत चांगलीच झाली होती. वामनरावांनीं आपलें बाकी कुटुंब हालविल्यानें टिळकांवर आतां कांहीं आर्थिक जबाबदारीहि उरली नाहीं.

गोखल्यांच्या मनूताईंसाठीं वरसंशोधनाची जलालपुरास तयारी सुरु झाली मनूताईंचे मेव्हणे, नानासाहेब पेंडसे नाशकास सरकारी हुद्दयावर होते. ते मराठी कवितेचे मोठे भोक्ते होते. त्यांनीं टिळकांची कीर्ती ऐकली होती व कविताहि ऐकली होती. त्यांच्या मनानें फार घेतलें की मनू टिळकांना द्यावी. व त्यांच्या

आणि इतर मित्रमंडळीच्या खटपटीनें हा विवाह १८८० सालीं जलालपूर मुक्कामीं घडून आला. 'मनूताई'च्या 'लक्ष्मीबाई' झाल्या.

टिळकांच्या आयुष्यातील येथून पुढचीं कांहीं वर्षे अत्यंत अस्वस्थतेचीं, अनिश्चिततेचीं व बरवर पहाणाराला विक्षिप्तपणाचीं अशीं गेलीं. शाळेंत असतांना त्यांना एक शिक्षक मिळाले होते. [illegible] ह्या शिक्षकासंबंधीं टिळक म्हणतात.

"I came under the influence of a school master. Though this man never knew how to be truly useful to his country, yet he had the burning love of a true patriot. He made the little heads under his charge as dizzy with patriotism as his own. This circumstance and others gave a peculiar turn to my mind I well remember that even in my tender years when I sat in the school room for a lesson in geography, my mind was absent, for I was musing over the deep problem of India's future."

ह्या पंधरा वर्षांत टिळकांनीं निरनिराळीं ठिकाणें बदललीं, नाहीं नाहीं तरी तीन शाळा निरनिराळ्या ठिकाणीं काढून त्या चालविल्या व नंतर दुसऱ्यांना अर्पण केल्या. द्वारका, नागपूर, राजनांदगांव, धामक, पुणें, मुंबई वगैरे निरनिराळ्या ठिकाणीं मुक्काम करीत ते हिंडले. त्यांनीं ह्या काळांत योगसाधन केलं, कातन केलं, [illegible] सारे प्रकार केले. जातिभेद, शिवाशीव, अस्पृश्यता वगैरेंवर अगदीं उघडउघड हल्ले त्यानीं ह्या इतक्या जुन्या काळांत चढविले.

नाशीक लोकल बोर्डाचे माजी चीफ ऑफिसर श्री. त्रिंबकराव वैद्य ह्यांनीं टिळकांना प्रत्यक्ष ह्या काळांत पाहिलेलें आहे. त्यांच्या वडिलांच्या डायरीवरून व स्वतःच्या आठवणींवरून त्यांनीं जी थोडी माहिती दिली आहे ती उद्बोधक होण्यासारखी आहे. त्रिंबकराव म्हणतात:

"रा. गोपाळ कृष्ण वैद्य–(त्रिंबकरावाचे वडील)–ह्यांच्या सूचनेवरून १ जून १८८२ रोजीं टिळकांनीं पंचवटींत शाळा काढली. तेथें ते इंग्रजी शिकवीत पावसाळ्यांत त्या दिवसांत मुलांना होडयांत बसून नाशिकला यावें लागे. त्यामुळें ही शाळा चांगली चालली त्या वेळीं नाशिक म्युनि-सिपालिटी अस्तित्वांत नव्हती.

"कॅनन जोशी ह्यांचे वडील रे. लुकस जोशी हे शरणपुरास रहात असत. ते गंगेवर मारुतीसमोर उभे राहून ख्रिस्ती धर्मावर उपदेश करीत त्या वेळीं टिळक त्यांना श्रोत्यांत उभे राहून अडवीत. वादविवाद होई मि जोशी ह्यांची लोक हुर्यो करीत पोलिसांचा त्यामुळें टिळकांना त्रास होऊं लागला, तेव्हां ते पराजप्यांच्या ओट्यावर उभे रहात व हिंदु तत्त्व-ज्ञानावर उपदेश करीत. जोशांचे श्रोते हळूहळू कमी होऊं लागले व टिळकांच्या भोंवतीं फारच मोठी गर्दी जमूं लागली शेवटीं जोशांनीं ती जागाच बदलली

"१८८७ व १८८८ सालीं टिळक वक्तृत्वोत्तेजक समारंभासाठीं बाहेरगांवाहून येत व येथें आल्यावर दोन दोन महिने येथेंच राहत तीन वर्षें त्यांनीं दोन दोन बक्षिसें लागोपाठ मिळविल्याचें मीं पाहिलें आहे. दोन बक्षिसें मिळविलीं तरी नियमाप्रमाणें एकाच बक्षिसाचे पैसे त्यांच्या हातावर पडत एकदा टिळकांनीं मला आपल्या बक्षिसातील अर्धे पैसे व पांच वर्षांची 'बालबोध' मासिकाची वर्गणी दिली. कारण परीक्षकानें दुसऱ्या एका चढाओढींत दुसऱ्यालाच बक्षीस दिलें, परंतु टिळकांच्या मतें माझें भाषण बक्षिसास योग्य असें होतं टिळक आपलें भाषण extempore करीत. नियमाप्रमाणें बक्षीस मिळालेल्या वक्त्याला आपलें भाषण लिहून द्यावें लागे पण टिळक तें देत नसत, ह्यावरुन खटका उडे

"टिळक जेवतांना सोवळेओवळें ठेवीत नसत. म्हणून त्यांच्या बरोबरीच्या मंडळीला तें Shocking वाटे. एकदा त्यांना आपल्या ताटांतील बोंडें (दुसऱ्याच्या ताटात) फेकतांना मीं पाहिलें आहे."

अनुक्रम ११ ५९५१० दि:

# १८७८ ते १८९५ पर्यंतचें टिळकांचें लेखन

वरील विवेचनावरून एवढें स्पष्ट होतें, कीं टिळकांनीं आपलें नांव इंग्रजी शाळेंत घातलें (१ ज्या. १८७८) त्याच्या आधींच वक्ते व कवि म्हणून त्यांनीं कीर्ति संपादन केली होती व कविता रचण्यास तर वयाच्या अकराव्या वर्षापासूनच, म्हणजे कल्याणला आईजवळ असतांनाच सुरवात केली होती असें, त्यांच्याबरोबर १५ वर्षें कार्य केलेले श्री. मनोहरराव उजगरे ह्यांनीं १९ मे १९२८ रोजीं ख्रिस्ती भ्रातृमंडळापुढें वाचलेल्या निबंधांत म्हटलें आहे. श्री. लक्ष्मणशास्त्री लेले ह्यांनीं त्यांच्या शीघ्रकवित्वाचें दिलेलें उदाहरण त्यांनीं इंग्रजी शाळेंत नांव घातलें त्याच्या आधींचें आहे

१८८० ते १८९५ ह्या पंधरा वर्षांच्या काळांत टिळकांनीं पुष्कळ कविता लिहिली. त्यांचें पहिलें छापील काव्य यशवंतराव महाराजांवर लिहिलें होतें. तो कटाव होता व त्याचा आरंभ 'जय प्रभु यशवंता' असा असल्याचें त्यांच्या वर्णीच्या एका विद्यार्थ्यानें सांगितल्यावरून मीं टिपून घेतलेलें आहे त्यानंतर १८८१ सालीं 'गंगा'काव्य त्यांनीं लिहिलें. पण तें अप्रकाशित राहिलें. कवितेचीं पुस्तकें विकत घेण्यास त्या वेळीं कोणी तयार नसत असें दिसतें. 'गंगा' काव्यरूपानें नाहीं पण गद्यांत १८८७ मध्यें त्यांनीं छापलें त्याच्या प्रस्तावनेंत ते म्हणतात :—

"मित्रहो, तुम्हाला आवडत नाहीं अशी गोष्ट आजपासून करावयाची नाहीं. पद्यात्मक पुस्तकें लिहिण्याची मला आवड तर खरीच. पण आपल्या आवडीहून माझी आवड मला अधिक नाहीं." तसे लोकाच्या आवडीवर किंवा पैशावर टिळक विसंबून नव्हते. पुढें त्याच प्रस्तावनेंत ते लिहितात, "तथापि आपल्या आवडीसाठीं अनीतिप्रसारक पुस्तकें मी साफ लिहिणार नाहीं. मी आपला भिकार बांधव तर खराच, पण पैशानें आणि ज्ञानानें बरें! मनानें मी भिकारी नाहीं. असें म्हणण्याबद्दल मला तुम्ही अभिमानी म्हणाल, पण मी त्या दोषारोपास भीत नाहीं."

टिळकांनीं ह्या सुमारास पुष्कळशीं संस्कृत कविता लिहिली आहे. परंतु तींतील कांहीं थोड्याशा कवितांवाचून बाकी आतां उपलब्ध नाहींत. संस्कृत कविता पाहिजे तेव्हां ते सहज रचूं शकत हें श्री. द्वारकानाथ गोविंद वैद्य ह्यांना प्रार्थनासमाजासाठीं त्यांनीं रचून दिलेल्या ( १३ जून १९१७ ) कांहीं कवितांवरून दिसतें.

त्या काळांतील जीं जीं छापील पुस्तकें माझ्या संग्रहीं आहेत त्यांचा अनुक्रम असा लागतो—

आनंदराव अथवा पाशबद्ध स्वदेशाभिमानी (संगीत नाटकः१८८६), माझा ओसाड पडलेला गांव ( डेझर्टेड व्हिलेजचें पद्यमय भाषान्तर : १८८६ ), माझी भार्या ( काव्य १८८७ ), वीरकन्या ( सामाजिक कादंबरी १८८८ ), बापाचे अश्रु ( काव्य १८८८ ), संगीत गोदुःखविमोचन (नाटक· १८८९ ), काव्यकुसुमांजलि ( कवितांचें मासिक १८८९, पाच अंक—व पुढें १८९३-मध्यें 'विविधविषयतरंगणी'मध्यें अंतर्भाव ), देवीचा प्रसाद ( काव्य·१८९१ ), ऋषि मासिक (१८९३).

१८९३पासून पुढें त्यांनीं लिहिलेली कविता फार आहे. त्या दोनतीन वर्षांत त्यांचें लक्ष पूर्णपणें धर्म ह्या विषयानें वेधिलें असल्यानें, व ही कविता आधींच खाजगी स्वरूपाची असल्यानें हिला प्रसिद्धि देण्यांत आलेली नाहीं. परंतु रोज अगदीं मुंगीएवढ्या अक्षरांनीं ते डायरींचें एक तरी पान भरून काढीत. त्यांत पुष्कळशी कविता असे. मासल्यासाठीं एका पानावरील थोडा मजकूर येथें उतरून घेतों.

"५ वाजतां उठलों. चुलींत विस्तव ईश्वराची प्रार्थना. कादंबरी चुलींतील विस्तव विझाला. पुन्हा घातला. उजाडलें. गोविंदराव गाडी घेऊन बाहेरगांवीं जाण्याकरितां वाळास हाक मारीत आहे. बा उदरा ! (भूपाळी) कसा पहा बा उदरा दास तुझा प्राणिमात्र झाला. ॥ ध्रु० ॥ निद्रेला दूर करून । तातडिनें हात जुळुन । शिरसा तव वचन नमुन । प्राणि पुढें

आला ॥ कसा०॥ निंद्य वंद्य कर्म करी । निंदास्तुति हृदयिं भरी । नर पशु खग कीट सरी । एक दिसे झाला ॥ कसा ०॥ जीवाला जीव खाय । मुखें स्मरे न्याय न्याय । तूं वदशी ते उपाय । करुन राहियेला ॥ कसा०॥ काक उठे, श्येन उठे,। गृध्र उठे, गरुड उठे । दुर्बलास खात सुटे । रामबाबा तुजला ॥ कसा० ॥ बुद्धिमान नरजाती । परस्परां पिळुन खाति । दया दया गर्जताति । तव ही मधु लीला ॥ कसा०॥ रघुतिलका नारायण । भक्तावन-पारायण । उदरार्थचि जात सरुन । आयु, तार याला ॥ कसा ०॥—

उपलब्ध असलेली १८८६ पासून १८९३ पर्यंतच्या आर्याश्लोकादिकांची संख्या अंदाजें १५०० इतकी आहे.

हीं काव्यें रचण्याचें काम चालू असतांना एकीकडे टिळकांचा प्रवासहि चाले. ह्या काव्यांची एक जंत्री मातोश्री लक्ष्मीबाईनीं तयार केली आहे ती येणें प्रमाणें—

## काव्यें व प्रवास

**नाशीक** : यशवंतराव महाराज काव्य, **जलालपूर** : गंगा व पहिलें बापाचें अश्रु; **मुंबई** : घड्याळ काय म्हणतें, माझा ओसाड पडलेला गांव; आनंदराव नाटक; गणपती मेळ्याचीं गीतें; **संगमनेर**·माझी भार्या; **[illegible]ी**:देवीचा प्रसाद; **नागपूर** : गोरक्षणावर नाटक व कविता, **पहिलें वनवासी फूल**, साधूवर कविता (ह्या बहुतेक नानाजींवर असाव्या.) **वीरकन्या**, तीन विधवा, एक अर्धी लिहून छापून ठेवलेली कादंबरी; **राजनांदगांव** : किरकोळ कविता व उपासनेला लागणारीं गीतें भजनें.

## धर्मांतर

अस्वस्थतेचीं पंधरा वर्षे संपलीं. राजनांदगांवला आल्यावर टिळकांनीं धर्मांतराचा निश्चय केला. २५-१०-१८९४ च्या ज्ञानोदयांत टिळक लिहितात·

" माझें अंत:करण मीं ख्रिस्तास पूर्णपणें अर्पिलें आहे, असें समजून जगापुढें त्यास विधिपूर्वक कबूल करीत नाहीं; ह्यामुळें माझ्या कित्येक ख्रिस्ती

मित्रांस माझ्या अंगीं तितकें धैर्यच नाहीं, असें वाटत आहे पण वस्तुतः ह्याचें कारण हें नाहीं. ह्याचें जें कारण आहे, तें दूर व्हावें एतदर्थ माझ्या अल्प बुद्धीनुसार मी प्रयत्न करीत आहें, ३०-९-४९ला मीं जी प्रार्थना केली ती जशीच्या तशी येथें देतों, म्हणजे माझी अडचण कोणती आहे हें त्यांच्या लक्षांत येईल.

हृत्कमलीं मम सुधर्मरविनें निर्मल कर जे शिरले
मुग्धावस्था जाउन ह्याची पूर्णपणें हें फुललें १

भक्तिरसाचा मरंद वाहे सुगंध सुटला वारा
जेव्हांपासुन येशू तव मी चरणीं घेईं थारा. २

नवें धैर्य मज नवी शांति मज सुख नव होय दयाळा
वेदांतार्णवमज्जन करुनी कधि न पावलों ज्याला. ३

... ... ... ... ...

... ... ... ... .

तारक तूं मम, भिऊं कशाला सांग तरी मनुजाला
माता जवळीं असतां बागुल भयद न वाटे बाळा. ६

... ... ... ... ...

स्वदेशसेवा तव अनुगमनें जैशी मज साधावी
तशी न दुसऱ्या कवण्या मार्गे किती श्रमोनी व्हावी. ८

... ... ... ... ...

इतुकें करुनी जनांपुढें मीं नाहीं तुजला नमिलें
सदया ख्रिस्ता ! तेणें मन मम खिन्न सदाचें झालें. १०

पण जनांपुढें तुझा अंगीकार न करण्याचें कारण स्वार्थ, अविश्वास वगैरे कांहीं नसून "आयु पथ हा बिकट आजवर ज्या मित्रासह गेला। पंगु अबल तो, मींच आजवर नेलें वाहुन त्याला "– त्या मित्राला सोडून " रम्य मुक्तिचें मंदिर" असलें तरी त्याला टाकून—

आज जरी मज तें स्वर्गीचें राज्य मिळालें तरिही
सदा शरण ह्या मित्रा सोडुन जाणें हा नय नाहीं १७

ह्यां 'मित्रा'संबधीं १८८७ सालीं लिहिलेल्या 'माझी भार्या' काव्यांत टिळकांनीं ठिकठिकाणीं जीं हृद्य वर्णनें केलेलीं आहेत तीं वाचतां त्याचा त्याग करणें किती अवघड होतें हें चटकन ध्यानांत येतें.

## ख्रिस्ती झाल्यानंतर

परंतु मनाच्या ह्या संमोहावर विजय संपादन करून टिळकांनीं मुंबईस जाऊन बाप्तिस्मा घेतला. १० फेब्रुवारी १८९५ च्या डायरींत टिळक लिहितात.

"मु. मुंबई अमेरिकन चर्चमध्ये दुपारी ४॥ वाजतां रे. तुकाराम नथूजी पाळक यांच्या हातून प्रभु येशू ख्रिस्तानें बाप्तिस्माविधीनें माझा स्वीकार केला. रे. पदमंजींनी प्रार्थना केली व रे. करमकर यांनीं ख्रिस्ताच्या प्रतिपासून मला कोण वेगळें करील' यावर व्याख्यान दिलें"

## पांच वर्षांचा विरहकाल

ख्रिस्ती झाल्या [redacted] टिळकांचें पैशाचें नुकसान झालें व सामाजिक रीत्या ते अस्पृश्य बनले पण ह्या सर्वांपेक्षां टिळकांना खरोखर लक्ष्मीबाईंचा व माझा विरह मात्र फार जाणवला. पांच वर्षें आपल्या पत्नीची वाट पाहात असलेल्या टिळकांचें कोणीहि [illegible].

टिळक ख्रिस्ती झाल्यानंतर इतर कित्येकांप्रमाणें तुम्हीहि दुसरें लग्न कां करीत नाहीं असें त्यांना कधीं कधीं कोणी विचारीत. कधीं कधीं त्यांना मुलीहि दाखवीत. परंतु लक्ष्मीबाईंवर त्यांचें इतकें प्रेम होतें, कीं त्या स्वत होऊन येईपर्यंत पांच वर्षें टिळक त्यांच्यासाठीं थांबले. दुसरें लग्न करा म्हणून सुचविणाऱ्यांना त्यांनीं खालील मार्मिक उत्तर दिलें आहे

तार्‍यांची माला नको मज, द्या त्या सुमनाला

रत्नपारखी हसोत नलगे हिरा लाल मोती
कल्पलतेचें फूल नको जरि आलें तें हातीं
तया फुलास्तव देइन जीवाला—

सख्या फुला मी गाणीं गाइन सदैव रे तुजला
जीव असे तों अश्रु वाहुनी करिन पूजनाला
विरहीं तुझिया जळुन मरावें हेंच पुरें याला
हाच सुखाचा परमावधि झाला—

ह्या कवितेच्या तळटीपेंत म्हटलें आहे.

“ एका एकनिष्ठ पतीस, आपल्या विरहान्तरित पत्नीचा त्याग करून दुसरा संबंध करण्याविषयीं एका गृहस्थानें सूचना केली. या सूचनेला हें त्या विरहाकुल, दीन व प्रेमळ पतीचें उत्तर आहे.” ह्या सुमारास लिहिलेल्या एका खासगी पत्रात टिळक म्हणतात.

“ १ बहुतेक ख्रिस्ती झालेल्या लोकांनीं आपल्या पूर्वधर्मांतील बायका येत नाहींत म्हणून त्यांचा त्याग करून दुसरीं लग्नें केलीं आहेत मीहि त्या महापापांत पडलों असतों, पण देवाच्या दयेनें आपल्या प्रथम पत्नीवरच्या प्रीतिलतिकेस अश्रूंचें पाणी घालून वाढविण्यातच माझे दिवस आनंदानें जात आहेत. विषयलंपट मनुष्य पटकन् लग्न करून टाकील का आपल्या प्रथम पत्नीसाठीं विरहव्यथेनें व्याकुल होऊन निरंतर देवाला प्रार्थीत बसेल ?

२. प्रीति म्हणजे स्मरण, विरह, अश्रुपात नाही का ? देवाजवळ एखाद्या प्रिय व्यक्तीसाठीं प्रार्थना करणें म्हणजे त्या व्यक्तीसाठीं मन कळवळणें ना ?

३. पुढील कवितेंत ‘ मज माता भगिनी किंवा भार्या देई ’ असें देवाजवळ मागितलें आहे. कोणत्या कामी मनुष्याच्या तोंडून असे उद्गार

निघतील ? कामी, विलासी मनुष्याच्या तोंडून असे उद्गार निघतात असा अनुभव ज्ञानोदयांतून मला उपदेश करणारास नाहीं ही माझी पक्की खात्री आहे "

" काम निराळा, प्रेम निराळें, सदैव वाटे ज्यातें
कधीं कल्पिलें नसे जयानें विषामृताचें नातें "

टिळक आधीं कविता 'जगत' व मग त्या लिहीत. १९४० सालीं श्री. अमृत महादेव जोशी ह्यांनीं सह्याद्रि मासिकात लिहिलेल्या टिळकांवरील आपल्या विस्तृत लेखांत म्हटलें आहे.

"टिळकांचें जीवन त्यांच्या काव्याचा पार्श्वभाग आहे. या पार्श्वभागाचें जसजसें आकलन होत जातें तसतसें टिळकांच्या कवितेचें वैशिष्ट्य नजरेंत भरत जातें "

अशी होती टिळकांची रीत ! हें ज्यांना प्रत्यक्ष अनुभवानें माहीत होतें त्यांनाच टिळकांच्या ह्या पांच वर्षांच्या विरहकाळाची नीट कल्पना होईल.

## छळ

ख्रिस्ती झाल्याबरोबर त्यांचा कांहींसा छळ झाला.

" बाप्तिस्मा घेतल्यानंतर कांहीं दिवसांनीं त्यांना टपालांतून मिठाईचें एक पार्सल आलें. तें त्यांनीं फोडलें व घटकाभरानें त्यांतली मिठाई खावी असा विचार केला; पण इतक्यांत त्यांना आठवण झाली, कीं आज आपल्याला अमुक अमुक ख्रिस्ती बंधूच्या घरीं जेवायला जायचें आहे. त्यांनीं तें उघडलेलें पार्सल तसेंच टाकलें व ते त्या बंधूच्या घरीं जेवायला गेले. तेथें त्यांचे ' पाळक ' व दुसरीहि कांही मंडळी आली होती. पुढें बरीच रात्र झाल्यामुळें तेथून निघाल्यावर त्यांच्या ' पाळकां 'नीं त्यांना आपल्याच घरीं रात्रींचें राहवून घेतलें. सकाळीं टिळक आपल्या घरीं येऊन पाहतात तों त्या उघडलेल्या पार्सलांतील कांहीं मिठाई कमी झालेली असून तेथें एक मांजर मरून पडलेलें आहे !—

"आणखी एक अशी गोष्ट सांगतात, कीं त्या दिवसांत एकदा ते होडीची वाट पहात एका खाडीजवळ बसले होते. इतक्यात कांहीं मंडळी हातांत काठ्या घेऊन त्यांच्याकडे आली व 'तूं परधर्म स्वीकारलास म्हणून आम्ही तुला चांगलाच चोप देतों,' असें म्हणाली ह्याप्रमाणें त्यांचें बोलणें चालू असतां घोड्यांच्या टापांचे आवाज ऐकूं आले ते ऐकतांच ह्या तरुण मंडळीनें धूम ठोकली." (श्री. म. कृ उजगरे)

टिळकांना हें सारें दिसत नव्हतें असें नाहीं हें सारें ठाऊक असतां उघड्या डोळ्यांनीं त्यांनीं ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला, व आपल्या समाजाला, आपल्या बायकोमुलाला ते मुकले. ह्या धर्मान्तरानें त्यांना काय मिळालें, ह्या कुतूहलाच्या प्रश्नाचें स्पष्टीकरण केल्याशिवाय त्यांचें चरित्र किंवा त्यांचें काव्य नीट कळणें शक्य नाहीं. म्हणून तें स्पष्टीकरण खालीं दिलें आहे

## धर्मान्तराचें स्पष्टीकरण

अस्वस्थतेच्या ह्या पंधरा वर्षांच्या आरंभीं आरंभीं टिळकांची गांठ एका देशाभिमानी शिक्षकाशीं पडली होती. त्याच्या शिकवणुकीनें त्या वेळेपासूनच स्वदेशकल्याणासाठीं काय वाटेल तें करण्याची त्यांची तयारी होती. 'गुरुस्थान अन्तीं जगाचें तुझें, यात शंका न कांहीं' अशी आपल्या मायभूमीसंबंधीं त्यांची जी भावना होती ती पहिल्यापासूनच होती. ह्याच वयांत जातिभेद नसावा, शिवाशीव नसावी, मूर्तिपूजा नाहींशी व्हावी, वगैरे विचार त्यांच्या डोक्यात येत व ते तावडतोब कृतींतहि उतरत. त्यांच्या लहानपणीं त्यांच्या आईनें मारुतीच्या गळ्यात घालण्यासाठीं त्यांच्या हातीं पाठविलेल्या वड्याच्या माळेंतील वडे त्यांनीं स्वत-च स्वस्थपणें बसून खाल्ल्याचें वर्णन 'स्मृतिचित्रां'त आहे ह्या गोष्टी विसावें शतक सुरु होण्याच्या आधींच्या होत्या हें लक्षांत घेतलें म्हणजे त्या काळच्या लोकांना त्याबद्दल वाटलेला कडवटपणा केवढा असेल हें ध्यानांत येईल. पुण्यास पंचहौद मिशनमधील, चहा प्रकरण घडत होतें तोच हा काळ होता. हे सर्व आचार-विचार बदलण्याचे झाले तर ते धार्मिक उन्नतीनें बदलतील असें त्यांच्या मनानें घेतलें. त्यांना वाटूं लागलें, कीं आपल्या देशाला जगाचें गुरुस्थान धर्माच्या मार्गानेंच लाभेल. आणि म्हणून धार्मिक बाबीकडे त्यांचें लक्ष ओढलें गेलें.

ह्याच काळांत सटाण्याचे देव मामलेदार किंवा कापशीचे नानाजी महाराज ह्याच्या भजनीं ते लागले. पण तेथेंहि मनाला शांति मिळेना, तेव्हां ते वणीच्या सप्तशृंगीचे भक्त बनले, 'देवीचा प्रसाद' नांवाच्या भक्तिरसपूर्ण अशा कविता ह्या वेळीं त्यांनीं लिहिल्या. त्यांचे सर्वांत धाकटे बंधु माधवराव हे जन्मापासून एक साधुपुरुष होते ते बाजारांत गेले, कीं अंगावरचे कपडे गरीबाला अर्पण करून उघडेबोडके घरीं यायचे. ह्या बंधूंचाहि टिळकांवर थोडाबहुत परिणाम झाला असला पाहिजे. टिळकहि कधीं कोणाला काय उचलून देतील ह्याचा नियम नसे. आपल्यामध्यें एखादी दैवी शक्ति असल्याशिवाय आपल्या हातून कांहीं अलौकिक घडणार नाहीं असें शेवटीं शेवटीं त्यांच्या मनानें घेतलें व ते अजिबात अदृश्य झाले. एवढ्यांत दहाएक वर्षे निघून गेलीं होतीं. ह्या शेवटल्या प्रयाणांत त्यांची एका बंगाली साधूशीं ओळख झाली व ते एका डोंगरावर जाऊन योगाभ्यास करूं लागले. एकदीड वर्षांच्या ह्या ध्यानमननाच्या काळांत त्यांच्या मनानें घेतलें, कीं आपल्या देशाला, एका नवीन धर्माची जरूर आहे व त्या धर्माच्या तत्त्वाची जुळवाजुळव त्यांच्या मनांत सुरू झाली. डोंगरावर ह्या नव्या साधूच्या दर्शनाला लोकांच्या झुंडीच्या झुंडी येऊं लागल्या त्यांच्यामुळें रोगहि बरे होतात अशी लोकांची समजूत होऊं लागली आणि झुंडींचें स्वरूप यात्रेंत होऊं लागलें. आपल्या नवधर्माबद्दल मात्र हे लोक कांहीं आस्था दाखवीत नाहींत, कीं तिकडे लक्ष देत नाहींत, त्यांना केवळ आपलें दर्शन व जमल्यास कांहीं ऐहिक फायदा हवा हें साधुबुवांच्या लक्ष्यांत येतांच त्यांनीं जलालपुरास आपल्या सासुरवाडीस प्रयाण केलें व तेथें जाऊन आपले जावळ उतरून टाकले.

ह्यानंतर ते नागपुरास गेले. ह्याच सुमारास त्यांची व केशवसुतांची नागपुरास प्रथम गांठ पडली. नागपुरास ते पुन्हा गेले तेव्हां श्रीमंत आप्पासाहेब बूटी ह्यांच्या मुलाचे शिक्षक म्हणून. ह्याच वेळेस श्री बूटींनीं टिळकांना त्यांच्या अध्ययनासाठीं लागतील तीं पुस्तकें पुरवण्यास सुरवात केली.

टिळकांच्या नवधर्माची रूपरेषा अशी होती.

१ सृष्टीचा उत्पन्नकर्ता हा बुद्धिमान् असून त्याला सारी मानवजात मुलांप्रमाणें आहे.

२. कोणत्याहि धर्माचे कोणतेहि धर्मग्रंथ हे ईश्वरप्रेरित नसून मनुष्य-प्रेरित आहेत. ईश्वराचा धर्मग्रंथ म्हणजे सृष्टि व परमेश्वराचें स्वरूप सृष्टी-वरून ज्ञात होतें

३. पूर्वजन्म व पुनर्जन्म ह्या कल्पना भ्रामक आहेत. मनुष्याची येथील स्थिति ही त्याच्या अनुवंशिकतेवर, त्याच्या परिस्थितीवर व त्याच्या स्वत:-च्या प्रयत्नांवर अवलंबून असते.

४. परमेश्वरावर व माणसावर प्रेम करणें हा सर्व धर्मांचा मूळ पाया असायला पाहिजे

५ मूर्तिपूजा हा खऱ्या धर्माचा सर्वांत मोठा शत्रु असून तिचा नाय-नाट करायला हवा. मात्र प्रेम, दया, सत्य ह्या गोष्टींवर सचेतन वस्तु-धर्माचा आरोप करून त्यांची पूजा करण्यास हरकत नाहीं.

पुढें १८९३ च्या सुमारास नागपूरहून राजनादगांवला जात असतां गाडींत त्यांना एक युरोपियन भेटला आर्षी वाङ्मय, मग संस्कृत वाङ्मय व शेवटीं धर्म ह्या विषयावर त्या दोघांच्या गप्पा चालतां चालतां टिळकांनीं त्याला आपल्या नवधर्माची रूपरेषा सांगितली. ती ऐकून त्या युरोपियन गृहस्थानें टिळकांना म्हटलें, आणखी दोन वर्षांनीं तुम्ही ख्रिस्ती व्हाल असें माझें भाकीत आहे. त्यानें टिळकांना 'नव्या करारा'ची एक प्रत दिली व त्यांतील कांहीं कांहीं भागावर खुणाहि करून दिल्या. ख्रिस्ती धर्मांचें पुस्तक असें आजपर्यंत टिळकांनीं कधींच वाचलें नव्हतें किंवा त्यांच्या धार्मिक अभ्यासांत ह्या धर्मासंबंधीं विचार-हि त्यांच्या डोक्यांत कधीं आला नव्हता. ह्याचें कारण त्यांच्या म्हणण्याप्रमाणें 'ख्रिस्तीधर्माचा अत्यंत सोपेपणा' हें असावें. राजनांदगावला आल्यावर त्यांनीं 'नवा करार' वाचण्यास सुरवात केली. 'डोंगरावरील उपदेशा'पर्यंत आल्यावर ते आश्चर्यानें थक्कच झाले त्यांचा सर्व अभिमान गळाला. आपण स्वत: धर्म-संस्थापक होण्यास किती नालायक आहों, हें त्यांच्या ध्यानीं आलें व आपल्या **कल्पिलेल्या अपूर्ण धर्माचें पूर्ण आचरण केलेली व्यक्ति आप-णास सांपडली** म्हणून त्यांना अतिशय आनंद झाला. तरी त्यांनीं आणखी दोन वर्षें धर्मान्तर केलें नाहीं. प्रसिद्ध ख्रिस्ती ग्रंथकार रे. बाबा पद्मनजी व

महाराष्ट्र संत कवींची पाश्चात्याना प्रथम ओळख करून देणारे रे. जस्टिन ॲबट वगैरे प्रसिद्ध ख्रिस्ती व्यक्तींशीं त्यांनीं या दोन वर्षात बराच पत्रव्यवहार केला व अशा रीतीनें टिळकांचें पूर्ण विचाराअन्तीं धर्मान्तर झालें

## येशू ख्रिस्ताचा काळ

दोन हजार वर्षांपूर्वी पालेस्ताइनमध्यें यहुदी राष्ट्राची धार्मिक, राजकीय व नैतिक अवस्था जशी होती तशीच जवळ जवळ ह्या काळांत आपल्या देशात होती. कर्मकांड म्हणजेच सारा धर्म अशी यहुद्यांची समजूत होती व ह्या कर्मकांडाचीं सारीं सूत्रें तेथील शास्त्री व परुशी वर्ग आपल्या हातीं घेऊन बसला होता. इकडे इंग्लंडनें जें केलें तें तेथें त्या वेळीं रोमनें केलें होतें. यहुदी राष्ट्र हें एक गुलामांचें राष्ट्र त्यांनीं बनवून टाकलें होतें. बंडें व बंडाची तयारी हा त्यावेळच्या तरुण यहुदी पुढाऱ्यांच्या आयुष्यातला [illegible] रोजचा कार्यक्रम बनला होता. अशा परिस्थितींत येशूचा अवतार झाला व त्यानें अनत्याचाराचा नवा मार्ग जगांत प्रथमच आपल्या लोकांत शिकविला. धर्माच्या नांवाखालीं चाललेले कर्मकांडाचे ढोंगी प्रकार पाहून त्याचा जीव तळमळे. आपल्या राष्ट्राची खरी उन्नति व खरें तारण जर कशांत असेल तर तें स्वतःच्या आध्यात्म उन्नतींत आहे. स्वराज्याआधीं स्वराज्य मिळवलें पाहिजे, नाहीं तर मिळवलेलें स्वराज्य टिकायचें नाहीं व पचायचेंहि नाहीं हें त्यानें आपल्या लोकांच्या गळीं उतरविण्याचा अटोकाट प्रयत्न केला, व त्यांतच त्याचा अंत त्याच्या शत्रूंनीं केला.

हा ख्रिस्ताचा इतिहास जेव्हां टिळकांनीं पाहिला तेव्हां तो त्यांना चटकन घरचाच वाटला व यहुदी राष्ट्राला जशी प्रथम स्वाराज्याची गरज होती तशीच आपल्याहि राष्ट्राला आहे हें पटून ते ख्रिस्ती झाले

## स्वदेशभक्ति

तुम्ही ख्रिस्ती झालां तर तुमची उत्कट स्वदेशभक्ति कायम राहील काय? तुमचें आमच्यावर प्रेम राहील काय? अशा प्रकारचे प्रश्न टिळकांच्या एका मित्रानें केल्यावरून त्याला जें उत्तर त्यांनीं दिलें त्यांतला कांहीं भाग खालीं देत आहें.

बाळ सहज जरि अल्पमात्रही निजलें असतां कण्हलें
तरि मायेला भासे त्याचें मरणचि येउनि भिडलें
थोडें गेलें अधिक दूर तें सोडुनि खेळायाला
तरि मायेच्या धाकें धडकी भरते मृदु हृदयाला
हा मायेचा खेळ ! न तीचा उपाय कांहीं त्यानें
ज्ञान धैर्यदमगुणांस माया निमिषार्धीं व्यापीते
म्यास्तव तुझिया ह्या प्रश्नाचें नवल न वाटे मजला
मित्रप्रेमें मोहित केलें उदार तव हृदयाला
तुला सांगतों ठेव सख्या तूं मजवरती विश्वासा
बंधू तुमचा राहिन जोंवर करितों श्वासोच्छ्वासा
रविप्रकाशें कमल वाढतें परि नच सोडि जलाला
ख्रिस्तयशोरत झालों तरि मी सोडिं न जन्मधरेला
प्राणप्रियतर दुजें न माझें साच तुम्हाहुन भाऊ
एक भूमिचीं सर्व लेंकरें आपण कोठें जाऊं ?

× × ×

स्वजन आपले कसकसे हाल करतलि ह्याचीहि त्यांना जाणीव होती—

कराल ठावें मला मजवरीं स्वदेशबांधव सारे
अपशब्दांची वृष्टी मेघा लाजवितीं मित्रा रे
मेला ! गेला ! नष्ट जाहला ! असेंच हो मानाल
कुतर्कजालीं मला गुंतवुन भयद जना दावाल
तोंड पहाया अयोग्य ऐसा गणाल वैर धराल
परंतु मजला तों तों प्रियतर मद्बांधव हो व्हाल
अपशब्दांला आशीर्वच मी निंदेला स्तुति देई

तरी —

कोपा शांती, दुःखाला सुख ! पहाल ! संशय नाहीं
वैराग्नीवर मी प्रेमाचा पाउस पाडिन जाणा
स्वदेशबांधव मम हो वाहिन तुमच्या कार्यी प्राणा

खिस्ती झाल्यानंतर आपला जो छळ झाला, त्याबद्दल पुढें कित्येक वर्षांनीं त्यांनीं म्हटलें आहे.

"वीस वर्षांपूर्वी आम्हापैकीं एक खिस्ती झाला तेव्हां त्याचा जो छळ झाला त्याला आम्हीं छळच म्हणत नाहीं तें त्याला दुरावल्यामुळें साहजिकपणें वाटणाऱ्या त्याच्या प्रेमळ इष्टमित्राच्या दुःखसंतापाचें नुसतें आविष्करण होतें."

व —

धन्य धन्य माझ्या जन्मभूची कुशी । उपजे महर्षी संत मुनी ॥
कां रे खिस्ती मला कोणीच पुसेना । कोणी रागवेना मजवरी ॥
भेटतो वंदितो प्रेमें आलिंगीतों । कोणी न म्हणतो विटाळलों ॥
माझिया गुरूला सुखें सन्मानीती । आप्त हा म्हणती आमुचाच ॥

टिळकांचा देशाभिमान खिस्ती होण्यापूर्वी होता तितका व तसाच आज्ज्वल्य खिस्ती झाल्यानंतरहि शेवटपर्यंत राहिला.

१९१५ सालीं मुंबईस भरलेल्या साहित्यसंमेलनांत टिळकांनीं एक भाषण केलें होतें. हें अहमदनगर येथील इंडियन खिश्चन असोसिएशनतर्फे त्यांनीं केलें होतें. धर्मान्तर म्हणजे देशान्तर ह्या समजुतीनें देशांत केवढी भयंकर परिस्थिति उत्पन्न होणें शक्य आहे त्याचें आज पाकिस्तान हें आपल्यापुढें एक प्रात्यक्षिकच आहे. पाकिस्तान उत्पन्न होण्याच्या ३२ वर्षे आधीं केलेलें हें भाषण आहे खिस्ती लोकांच्या बाबतींतहि तसेंच होऊं नये अशासाठीं टिळकांचा जीव किती तळमळत होता तें त्यांच्या त्या भाषणांतील खालील कांहीं उताऱ्यांवरून व त्यातल्या त्यांत शेवटल्या वाक्यांवरून दिसून येईल

"धर्मान्तर म्हणजे देशान्तर ही आमच्या राष्ट्राची समजूत आम्हा हिंदी खिस्ती लोकांना अनेक मार्गांनीं बाधक होत आहे. हिच्या योगानें आम्ही असूं त्या शहरांत किंवा गांवांत सार्वजनिक हिताच्या कोणत्याहि चळवळी होत असल्या तरी त्या करणारांना आमची आठवण होत नाहीं. आपली राष्ट्रीय सभा अशेष राष्ट्राची आहे. पण तिला मुखत्यार पाठविण्या-

करिता एखाद्या गावांत सभा झाली, आणि तत्प्रीत्यर्थ हजारों आमंत्रण-पत्रिका वांटण्यात आल्या, तरी त्यांतली चुकूनसुद्धां एखादी पत्रिका ख्रिस्ती समाजाकडे जात नाहीं नागरिक म्हणून व हिंदी राष्ट्राचे घटक म्हणून जनसेवा करायला आम्ही कितीहि आतुर असलों, तरी हिंदी जनांच्या मनांत भिंवलेला आम्हाविषयींचा हा परकेपणा व तदुद्भव साशंकता, औदासिन्य व केव्हा केव्हा निष्कारण वैर आम्हाला पदोपदीं मागें ढकलीत आहे, व उलट हीच जनता आमच्या नुसत्या पोशाखाकडे पाहून किंवा कांहीं कारणांनीं विशिष्ट स्वरूपाच्या बनलेल्या आमच्या भाषेकडे पाहून आम्हाला राष्ट्रीयत्वाला मुकलेले म्हणावयाला सदैव तयार आहे ! ह्या जनतेची समजूत करणारे कोण ? आपण ग्रंथकार, वर्तमानपत्रांचे व मासिकांचे संपादक, कवि, वक्ते ना ? किंवा दुसरे कोणी हिची समजूत करणारे आहेत ? आपल्या मनात आमचा अडतीस लाख हिंदी ख्रिस्ती लोकांचा समाज हिंदिस्तानांतल्या हिंदिस्तानात परका करून ठेवायचा आहे का ? खचित नाहीं, पण आपल्या व आमच्या कोट्यवधि अर्धशिक्षित आणि अशिक्षित देशबांधवांना आपण काय करीत आहों याचा अर्थ समजत नाहीं आणि आपण वेळेवर याना हा अर्थ समजून न दिला तर कालान्तरानें अनेक संघांनीं घटित अशा आपल्या राष्ट्राचा हा एक वर्धमान घटक किंवा अवयव वियुक्त झाल्यावांचून राहणार नाहीं. या प्रमाणें एखाद्या राष्ट्राचे वियुक्त झालेले सारेच अवयव मरत नसतात, त्यांतले कांहीं स्वतंत्रपणें वाढून त्यांचीं परस्परविरोधी राष्ट्रान्तर्गत राष्ट्रें बनत असतात हें आपणांस माहीत आहेच."

टिळकांच्या ह्या भाषणाचा कितपत उपयोग झाला तें सांगता येत नाहीं. परंतु ख्रिस्ती समाजांत त्यांनीं जें कार्य केलें तें मात्र चिरस्थायी झालें व तें होण्याचें कारण टिळक प्रत्यक्ष त्या समाजांत रहात होते. त्यांचें बोलणें हें केवळ ओठापासूनचें नसून तें त्यांचें अंतःकरण होतें हें त्या लोकांनीं प्रत्यक्ष पाहिलें,—अनुभवलें. १८९६ सालच्या त्यांच्या एका विद्यार्थ्यानें लिहिलेलें पत्र मजसमोर आहे. त्यांत ते गृहस्थ म्हणतात :—

"I was a student in the English class of the Ahmednagar Theological Seminary of 96/98 where Mr. Tilak was a student as well as a professor.... ...Once while in the Seminary he called two students to dinner at his place In the course of conversation one of the students passed some unpleasant remarks on India and the Indians Mr Tilak felt very much hurt at these remarks. He went to his office in the middle of the meal and wrote out the hymn, which I am afraid is now lost to the public.

'चाल्ली तव गे निंदा ऐकुनिया आई
संतापें वाटे आतां निघूनि जीव जाई ॥ ध्रु० ॥
अन्न गे विषासम लागे, तल्पि सर्व कांटे'

I have forgotten the rest of the song."

१८९६ सालची ही गोष्ट १९१६ सालींहि टिळकांच्या बाबतींत घडली असती. हिंदुस्थानाविषयीं प्रेम न बाळगतां इकडे येणाऱ्या मिशनरींना उद्देशून टिळकांनीं खालील अभंग अगदीं अलीकडे लिहिले आहेत

बांधारे गाठोडी व्हा रे व्हा चालते । ज्यां नावडते हिन्दभूमि ॥
हात जोडितों मी प्रेमाव्रांण कोणी ।
नका खिस्तवाणी खोटी करूं ॥

किंवा —

नव्हे हिंदुस्थान लेकुरांच्या चेष्टा । नव्हेत प्रतिष्ठा भेंडोळ्या या ॥
इथेंच जाहले महाधर्मवीर ।,ज्यां थरथर विश्व कांपे ॥
इथेंच जाहले मुनी, योगीश्वर । अद्यो आजवर प्रभा ज्यांची ॥

श्रद्धा हेंच ज्यांचें जीवितसर्वस्व । आपुलेंच विश्व घर ज्यांचें ॥
असे भक्तराज इथेंच जन्मले । हृदीं विराजले ज्याच्या त्याच्या ॥
इथें नाचवून भलतींच सोंगें । करुनियां ढोंगें अर्थ काय ? ॥

टिळकांचा स्वदेशाभिमान अत्यंत जाज्वल्य होता. मात्र 'स्वदेशाभिमान' ह्या शब्दाऐवजी ते 'स्वदेशप्रेम' हा शब्द वापरीत. त्यांची एक अप्रसिद्ध कविता पुढें दिली आहे तीवरुन त्यांची ह्या बाबतची मनोभूमिका ध्यानांत येईल.

## माझ्या जन्मभूमीस—

तुजसाठीं मीं खाइन कोंडा, पाघरीन चिंध्या मातें,
वैभव किंवा सुख जें म्हणती, मिळविन मी तें मातीतें.

कधीं तरी हा प्राण सोडुनी जाइल माझ्या देहातें,
दूर करावें तुजपासुन मज हें न साध्य परि काळातें.
धन्य भाग्य मम ! तुझ्याच उदरीं देव दे मला जन्मातें,
हरणारा हें कोण भाग्य मम ? धैर्य कुणा हें चोरातें ? १

तव सेवेस्तव विडंबीन मी देहा, देइन जीवातें,
हसोत किंवा रडोत कोणी, शुभाशुभ न त्याचें मातें.
खरें करिन मी जन्मुन माझें तुझें जन्मभूमी नातें,
घडो एवढें हेंच याचितों अनन्य भावें देवातें २

गुरू तसा मी चेला होइन, राहिन नच तिळमात्र कमी,
निजभूमीस्तव, सर्व जगास्तव करी तो तसें, करीन मी,
विडंबिलेला, वधिला, मेला बघाशील नेत्रांहीं ज्यांतें,
तोच मी तुझ्या किती युगें तरि करीन जननी सेवेतें. ४

त्यांनीं आपल्या जन्मभूमीला उद्देशून काढलेले हे उद्गार आपल्या देशावरील त्यांच्या उत्कट प्रेमाचेच निदर्शक नाहींत काय ?

खंच घालशिल जो वदनीं
तोंच घास मी खाईन
नातरि उपास काढोनी
तसाचि मरुनी जाईन
निजलों, बसलों
सहर्ष रमलों,
तिथेंच मेलों
तव मांडीवर जरि जननी
तरी धन्य मी जन्मोनी

किंवा ' माझ्या जन्मभूमीचें नांव ' घेतांना त्यांना होणारा आनंद काय दाखवितो ?

आणि आपल्या सहधर्मीयांना त्यांनीं केलेली पुढील विनंती काय दाखविते ?

श्रीखिस्तांच्या प्रिय शिष्यांनो, ।
एक विनंती ऐका अमुची, ।
निजदेशाला सेवुं चला, ।
करुनी चित्तें पूर्ण शुचि ॥ १ ॥
हिंदुस्थाना, जीवचि माना, ।
बोधि असें प्रभु येशु सखा, ।
मित्र, गुरु, नच कुणि नच परका. ॥ ध्रु० ॥

## टिळकांच्या ह्या वृत्तीमुळें झालेले गैरसमज

टिळकांच्या जाज्वल्य स्वदेशप्रेमामुळें व खिस्ती समाजाला, त्यांच्या भाषेच्या बाबतींत, चालीरीतींच्या बाबतींत व भक्तिप्रकाराच्या बाबतींत पूर्ण हिंदी पेहराव देण्याच्या त्यांच्या आटोकाट प्रयत्नांमुळें पुष्कळसे हिंदु लोक, टिळकांना खिस्ती होऊन पश्चात्ताप झाला होता व त्यांना परत हिंदु व्हायला हवें होतें असा उथळ आरोप त्यांच्यावर करतात. परंतु वास्तविक पहातां टिळकांचें वय जसजसें वाढत गेलें तसतसें त्यांचें आध्यात्मिक जीवन अधिकाधिक खिस्तमयच होत गेलें

त्यांनीं हिंदु व्हावें म्हणून बाप्तिस्म्यानंतर तावडतोब आटोकाट प्रयत्न झाले. पंढरपुरास तसा शास्त्रार्थ मिळेना तेव्हां तोसुद्धां त्यांच्याच कडून काढून घेण्यांत आला पण त्याचा कांहीं परिणाम झाला नाहीं. त्यावरून जाणूनबुजून ते ख्रिस्ती झाले होते व जाणूनबुजूनच ख्रिस्ती राहिले होते हें उघड होतें.

श्री. मनोहरराव उजगरे ह्याबाबत म्हणतात — "**टिळक एकनिष्ठ ख्रिस्तभक्त होते.** त्यांनीं ख्रिस्तसेवा आपल्या वाणीनें, लेखणीनें व तनूनें केली ख्रिस्तचरित्रप्रसाराचें मार्ग, भजन, कीर्तनें इत्यादि आहेत हें ते नुसते सांगूनच राहिले नाहींत, तर त्यांनीं स्वत. भजनें रचलीं, तीं करून दाखविलीं व लोकांनीं तन्मय होऊन तीं गायिलेलीं आपल्या कानांनीं ऐकलीं आज ते हयात असते तर ख्रिस्ती लोक आपलीं भजनें इतके तल्लीन होऊन गात असलेले पाहून ते आनंदातिशयानें खरोखर नाचले असते.

टिळकांचे एक चहाते व मुंबई प्रार्थनासमाजाचे पुढारी श्री. गोविंद मल्लिनाथ ठेंगे ह्यांना व इतर कित्येक लोकांना ह्याबद्दल विचारलें असतां त्यांनीं अशी साक्ष दिली आहे, कीं ख्रिस्ती झाल्याबद्दल टिळकांना कधींच पश्चाताप झाला नाहीं उलट ख्रिस्ती विश्वासांत ते अधिकाधिक दृढ होत गेले.त्यांनीं आपल्या शरीराचें दहन करावें म्हणून लिहून ठेवलें होतें. पण त्या इच्छेंत धार्मिक प्रश्न मुळींच नसून ती एक सामाजिक आरोग्य रक्षणाची बाब असल्यानें त्यांनीं तसें सांगून ठेवलें होतें. त्यांचें दहन झालें तसें त्यांच्या नंतर डॉ. ह्यूम, त्यांच्या पत्नी, त्यांचे चिरंजीव ह्या सगळ्यांचीं दहनें झालीं म्हणून ते हिंदुधर्मीय झाले होते असें म्हणायचें कीं काय ? शिवाय त्या दहनांत हिंदु प्रेतक्रियेंतील सारी भेसूरता कसोशीनें वर्ज्य केली होती हेंहि ध्यानांत ठेवायला पाहिजे.

आपल्या पत्रांत श्री. ठेंगे म्हणतात —

"तुमचे वडील कधीं असंतुष्ट असल्याचें किंवा मोठ्या हुद्द्याच्या चाकरीच्या मागें लागल्याचें किंवा कांहीं सुखोपभोगाच्या मागे लागल्याचें मला त्यांच्याशीं झालेल्या कोणत्याहि संभाषणावरून आढळून आल्याचें स्मरत नाहीं तसें म्हटलें म्हणजे त्यांचें मन सर्वकाळ तत्त्वज्ञान व काव्य ह्यांत गढलेलें असायचें. ह्याच विषयावर ते बोलत व मनमोकळेपणानें चर्चा

करीत अर्थात ही चर्चा कळकळीची असली तरी बरेच वेळां तींत विनोदा-चीहि झाक दिसून येई हुद्द्याची नोकरी किंवा दुसरा कांहीं ऐहिक लाभ असल्या कोणत्याहि गोष्टी त्यांच्या धर्मान्तरास कारणीभूत झाल्या असणें शक्य नाहीं. ख्रिस्ताच्या जीवनतेजाचा त्यांच्या हृदयावर अधिक गाढ परिणाम झाला असावा. त्या आरंभींआरंभींच्या काळीं असा परिणाम साधारणत होत असे कदाचित् उत्साहाच्या अतिरेकानेंहि हें झालें असावें ते कांहींहि असो, आमच्याशीं मनमोकळेपणानें चर्चा करतेवेळीं त्यांना हुरहूर लागून राहिल्याचें किंवा पश्चात्ताप झाल्याचें आमच्या निदर्शनास कधींच आलें नाहीं 'ख्रिस्तायन,' तसेंच स्तोत्रें व इतर प्रार्थनागीतें इतकीं जीं अत्यंत परिणामकारकपणें त्यांनीं लिहिलीं आहेत तीं जर त्यांचें हृदय सर्वस्वी ख्रिस्ताचें झालें नसतें तर त्यांना लिहिताच आलीं नसतीं."

महामहोपाध्याय दत्तोपंत पोतदार म्हणतात "टिळकांच्या सुशीलादि स्फुट काव्यांतहि आंतली ख्रिस्तश्रद्धा झाकलेली नाहीं. तशीच आर्यप्रीतिहि चमकल्या-शिवाय राहत नाहीं."

## बाप्तिस्म्यानंतर

बाप्तिस्म्याच्या आधीं १८९४ मध्यें टिळक मुंबईस आले व १८९६ मध्यें ते मुंबईहून गेले त्यावेळीं पुन्हा केशवसुत व ते एकत्र आले. मुंबईहून ते अहमदनगरास गेले. अहमदनगरास त्यांनीं जवळ जवळ पंचवीस वर्षें काढलीं तेथील ईश्वरविद्येच्या शाळेंत व हायस्कूलमध्यें ते शिक्षकाचें काम करीत. तसेंच अहमदनगर जिल्ह्यांतलि राहुरी, पारनेर वगैरे ठिकाणचीं मिशनरीचीं कामें त्यांनीं पर्यवेक्षक म्हणून केलीं. ह्याशिवाय 'ख्रिस्ती' 'ज्ञानोदय' व 'ख्रिस्ती नागरिक' ह्या पत्रांच्या, संपादनाचें काम त्यांनीं केलें.

## फुलांमुलांचे कवि

१८९६ पासून १९१० पर्यंत 'बालबोधमेवा' मासिकाचें जवळ जवळ त्यांनींच संपादन केलें असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. १८९६ पासून त्यांनीं मुलांसाठीं कविता लिहावयास सुरवात केली. ह्यापूर्वी मराठीमध्यें

मुलांसाठीं लिहिलेली कविता जवळ जवळ नव्हतीच म्हटलें तरी चालेल. टिळकांना 'फुलांमुलांचे कवि' म्हणण्याची पद्धत जी पडली आहे ती बहुतेक त्यांच्या 'बालबोधमेव्यां'तील कवितांवरून पडली असावी. 'दत्त' 'अनंततनय', 'केशवसुत', 'आनंदीरमण' व पुढें पुढें 'बालकवि' इत्यादि कवींकडून टिळकांनींच मुलांवर कविता लिहवून घेतली. परंतु ती कविता, खुद्द टिळकांनीं ह्याच विषयावर लिहिलेल्या कवितेच्या मानानें फारच थोडी आहे.

टिळकांच्या फुलामुलांवरील कवितांचा एक विशेष सांगावयाचा म्हणजे त्यांनीं ह्या बहुतेक कविता महाबळेश्वर मुक्कामीं लिहिल्या आहेत १८९५ पासून जवळ जवळ १९०८ पर्यंत टिळक दर वर्षी युरोपियनांना मराठी शिकविण्यासाठीं महाबळेश्वरला जात तेथें हसणारा निसर्ग आणि आसपासची प्रेमळ मित्रमंडळी ह्याच्यामुळें त्यांच्याभोंवतीं इतकें आनंदी वातावरण निर्माण होत असे, कीं त्यांच्या त्या वेळच्या कविता मुलांच्या आवडत्या होणें अपरिहार्यच होतें.

टिळकांची कविता ( भाग १ ) ह्यांत एकूण ८६ लहानमोठ्या कविता आहेत. त्यांपैकीं केवळ ८ कविता फुलांमुलांवर आहेत आणि तेवढ्यावरून त्यांना फुलांमुलांचे कवि हें नांव मिळालें असेल हें शक्य नाहीं. फुलांमुलांवर त्यांच्या जवळ जवळ दोनअडीचशें कविता आहेत व टिळकांची कवि म्हणून अधिक प्रसिद्धि झाली त्या वेळीं त्यांच्या ह्याच कविता प्रामुख्यानें वाचकांसमोर आल्या होत्या

टिळकांच्या 'बालोद्याना'ला लिहिलेल्या प्रस्तावनेंत आचार्य अत्रे म्हणतात–

"टिळकांच्या स्फुट कवितांचा पहिला संग्रह बत्तीस वर्षांपूर्वी (१९१४) प्रसिद्ध झाला. त्यांत 'फुलें आणि मुलें' या मथळ्याखालीं आठ कवितांचा एक निराळा गुच्छ करण्यांत आला आहे त्यांतली 'ताइ तूं फूल गडे माझें' ही कविता मला त्यावेळीं अतिशय आवडली होती लहानग्या बहिणीवर लिहिलेली इतकी हृदयंगम कविता मराठी भाषेंत दुसरी नाहींच नाहीं असें मी म्हणतों.............आणि आज इतक्या वर्षांनीं ( १९४६ ) 'बालोद्यान' हा तिसरा संग्रह प्रसिद्ध होत आहे या संग्रहांतील सर्व कविता टिळकांनीं पस्तसिचाळीस वर्षांपूर्वी लिहिलेल्या आहेत

हें वाचकांनीं लक्षांत ठेवावें........पस्तीसचाळीस वर्षांपूर्वी, महाराष्ट्रांत नवीन शिक्षणशास्त्राचा मागमूसहि नव्हता, हर्बार्ट, फ्रोबेल आणि मॅंटिसॉरी यांनीं युरोपीय शिक्षणांत जी महान् क्रांति घडवून आणली तिचे फारच थोडे पडसाद त्या वेळीं या देशांत उमटलेले होते. मुलांकडे बघण्याची पाश्चात्यांची नवीन दृष्टि इकडच्या समाजाला त्या वेळीं माहीत असणेंहि मुळीं शक्य नव्हतें. 'मूल' म्हणजे 'लहान माणूस' किंवा मोठ्या माणसाची छोटी आवृत्ति असंच समाजाला तेव्हां वाटत होतें....... ... अशा परिस्थितींत लहान मुलांची काव्याची गरज निराळी आहे असें ओळखून त्यांच्या साठीं निराळीं काव्यें लिहिण्याची आवश्यकता टिळकांना वाटली याबद्दल त्यांच्या बुद्धिमत्तेचें कौतुक करावें तेवढें थोडेंच आहे...... मुलाच्या शिक्षणासंबंधीं स्वतंत्रपणें विचार करून त्याबद्दलचें स्वतःचें तत्त्वज्ञान त्यांनीं निश्चितपणें ठरविलें होतें.

'पोरें' हीं न परंतु कल्पतरु हे, आधार हे आपुले
हे देतील फळें अनर्घ्य जरि ह्या अत्यादरें जोपलें
ह्या बाळांत कवीश, पंडित, महायोद्धे तसे सन्मणी
नाना वृक्ष जसे लपून बसती अत्यल्प बीजांतुनी!

या एका श्लोकांत वर्डस्वर्थ आणि फ्रोबेल यांच्या बालविषयक तत्त्वज्ञानांचा मनोहर समन्वय टिळकांनीं घालून दिलेला दिसून येतो."

वडील मुलगा विद्यानंद वारला तेव्हां, म्हणजे १८८७ मध्यें टिळकांनीं आपलें पहिलें "बापाचे अश्रु" नांवाचें काव्य लिहिलें. त्यांत मुलाच्या शिक्षणासंबंधीं त्यांनीं असे उद्गार काढले आहेत.

"मोठा होशिल तेव्हां तुजला घरींच मी शिकवीन
उदरंभरि पंतोजी दिसती, तत्करिं नच देईन
शाळांमध्यें व्यर्थ श्रम बा बाळांना पडताती
त्यांच्या मतिची कोंवळिक असतां शिक्षक करिती माती

वाल्क सर्व खर्चोनि येइना अल्पहि विद्या हातीं
मुलें विचारीं व्यर्थ शरीरीं क्षीण मात्र होतातीं
इत्यादिक हे हाल पाहुनी पोरांच्या शिकण्याचे
तुला घरीं मीं असें योजिलें बाळा शिकवायाचें."

"चार तपांपूर्वी टिळकांनीं लिहिलेल्या ह्या कवितांपैकीं एकहि कविता उपदेशात्मक किंवा तात्पर्यपर नाहीं हें ह्या कवितांचें वैशिष्ट्य अगदीं अद्भुत आहे असें मी समजतों. हें त्या काळीं अगदीं अशक्य होतें."

हें आचार्य अत्र्यांचें म्हणणें फार महत्त्वाचें आहे. अत्रे पुढें म्हणतात—

"मुलांच्या कविता" लिहिण्याचा टिळकांना खासच अधिकार होता, असा त्यांच्या टीकाकारालाहि निर्णय द्यावा लागेल. बालमनाचा त्यांचा अभ्यास अत्यंत सूक्ष्म होता. ते स्वतन्त्र प्रज्ञेचे शिक्षक आणि स्वयंभू प्रतिभेचे कवि होते"

पण टिळकांनीं फुलांमुलांवर वाटेल तितक्या कविता लिहिल्या असल्या, किंबहुना इतर कोणत्याहि कवीपेक्षां त्या अधिक लिहिल्या असल्या आणि त्या लिहिण्याचा पायंडा त्यांनींच पाडून त्यात अग्रमान मिळवला असला तरी त्याना फुलांमुलांचेच कवि म्हणतां येणार नाहीं.

## टिळकांच्या काव्याची पार्श्वभूमि

श्री अमृत महादेव जोशी म्हणतात—

"टिळकांचें जीवन त्यांच्या काव्याचा पार्श्वभाग आहे. या पार्श्वभागाचें जसजसें आकलन होत जातें तसतसें टिळकांच्या कवितेचें वैशिष्ट्य नजरेंत भरत जातें."

वाक्चातुर्यप्रधान, कल्पनाप्रधान व भावनाप्रधान अशी कवींची वर्गवारी केली तर टिळक तिसऱ्या वर्गांत पडतील. वाक्चातुर्यप्राधान्य ज्या कवितेंत अधिक तिला आतां कोणी फारसें महत्त्व देत नाहीं. उलट कल्पनाप्रधान काव्यांनाच खरें काव्य समजणारे वाचक मात्र पुष्कळ सांपडतील ह्या वाचकांचें प्रेम

कल्पनाचातुर्यावर इतकें बसलेलें दिसून येतें, कीं एखादवेळेस ते भावनाप्रधान कवींना कवि म्हणण्याससुद्धां तयार नसतात. परंतु जनमनावर खरीखुरी पकड जर कोणाची असेल तर ती ह्या तिसऱ्या प्रकारच्या कवींची आणि ह्याचें कारण-हि तितकेंच जबरदस्त आहे. कल्पनाप्रधान कवीला आपल्या वर्ण्यविषयापासून अलिप्त राहून आपलें काव्य लिहितां येतें तर भावनाप्रधान कवीला आपल्या वर्ण्यविषयासुन कधींच अलग करता येत नाहीं. किंबहुना तो जितका जितका त्या विषयाशीं तद्रूप होत जाईल तितकी तितकी त्याची ती कविता सरस वठत जाईल. **भावनाप्रधान कवि हे कविता लिहितात म्हणण्यापेक्षां कविता जगतात असें म्हणावें लागतें.** त्याचें चरित्रच एक काव्य बनतें. टिळक ह्या तिसऱ्या वर्गांतील कवि असल्यानें त्यांची कविता समजायला, रा जोशी म्हणतात त्याप्रमाणें त्यांच्या जीवन-काव्याच्या पार्श्वभूमीचें आकलन करता आलें पाहिजे.

कर्णाचीं कवच-कुंडलें जशीं त्याच्या शरीराचा भागच होतीं तद्वत टिळकांचें काव्य व टिळकांचें जीवन हीं एक होतीं.

"न कळे केव्हां कैशी होते कविच्या मनाप्रति स्फूर्ति" आणि "हीं निश्वसितें। कोण सोडितें। मम हृदयीं" तें एक देवालाच ठाऊक असें खुद्द टिळक म्हणत.

या रे या रे या रे लुटा सारें धन।
तरीच संपन्न होईन मी ॥
या रे या रे या रे करा विडंबन।
हाच माझा मान मला व्हावा ॥
या रे टाका मज खांबाला खिळून।
तरीच होईन चिरंजीवी — ॥

उगीच कांहीं कल्पना म्हणून वरील अभंग लिहिला गेला नाहीं त्यांच्या चरित्रांत एक नाहीं अनेक अनुभव त्यांना असे आलेले आहेत. एकदा एका गृहस्थाला पैशाची अत्यंत अडचण पडली. त्या क्षणाला जर त्याच्या हातात पैसे पडले नसते तर त्याच्या सर्व कुटुंबाचा नाश झाला असता टिळकांच्या

आयुष्यांत एकदाच एक स्वतःच्या मालकीचें घर त्यांना लाभलें होतें. तें त्यांनी जाऊन विकलें, आलेले सारे पैसे त्या गृहस्थाला त्यांनीं पोंचते केले व हे पैसे आपण दिले आहेत ही जाणीव त्याला शेवटपर्यंत होऊं दिली नाहीं. टिळकांचे हे पैसे त्यांना कधींच परत मिळाले नाहींत. परंतु त्याची आठवण टिळकांनीं एकदाहि केल्याचें मला आठवत नाहीं.

अहमदनगरास एकदा टिळक बावीस मुलांना घेऊन घरीं आले. बाहेर दुष्काळामुळें त्यांची अन्नान्नदशा झाली असती. टिळकांचें उत्पन्न होतें तेंच होतें त्यांत वाढ झालेली नव्हती. परंतु त्याच उत्पन्नांत आम्हीं सर्वांनीं आनंदानें अर्धपोटी राहून त्या मुलांचे जीव वांचविले आपल्याला जें कांहीं मिळतें आहे त्यांत आपल्या भोंवतालचे सारे गरजू वाटेकरी आहेत अशी खरोखरीच त्यांची भावना होती.

प्रेम आणि देव एक हा विश्वास
        कसा तो विश्वास दूर मानी
विश्व दूर तरी विश्वनाथ दूरी
        काय सांगूं वैरी मीच त्याचा
स्वप्नांतहि मज नसो दुजाभाव
        हीच एक ठेव दे दे देवा

अशी त्यांची खरोखरीची भावना होती, त्यामुळें घरांत अत्यंत हाल होते तरी त्यांचा खरा आनंद विश्वकुटुंबी असल्यानें त्यांना त्या क्षणभंगुर हालांची तीव्रता कधींच भासली नाहीं.

पुण्य गांठिं व्हावें म्हणून परार्थ
        पापमय स्वार्थ नको नको
मेल्यामागें नांव नाचवावें भूत
        केवळ अनर्थ हाही नको
नको आवडतो मनाला म्हणून
        कोण हा आमीन आवडीचा

तुसी आज्ञा बापा म्हणून साधणें
त्याहि पोरपणें सिद्धी नाहीं
स्वपरभेदाचा गळ्यांत पाषाण
आधी तोडवण हीच व्हावी

त्या गोष्टींसाठीं नव्हे तर
मीच जेथें तेथें मजला पहावें
देणें तरी थावें दान हेंच

आणि ह्याच बुद्धीनें नगरास प्लेगनें पटापट माणसें उचलण्यास सुरुवात केली असतां त्यांच्यांत जाऊन त्यांची सेवा टिळकांनीं व लक्ष्मीबाईंनीं केली , ही सेवा करतांना कोणत्याहि तऱ्हेचा आपपरभाव त्यांनीं ठेवला नाहीं. शेवटीं शेवटीं तर ह्या पतिपत्नींनीं तेथील भंग्याचीं कामेंसुद्धां केलीं..

टिळकांची कविता भाग १ ह्या पुस्तकांत

मी सेवक, मम पत्नी सेवा,
प्रेम लाडका अमुचा छावा
पुरे ! ह्याच संसारीं माझा आत्मा रत व्हावा

किंवा

जनसेवा ही ईश्वरसेवा
याविण दुसरा हेतु न ठावा
प्रेम आपली देव दिसावा एक सदा ज्यातें

किंवा

हिंदभूमि माझी जननी,
आले हीच्या कुशींतुनी
हिरेच अवघे माझे ते
मन्मन त्यां मोहुन जातें

असलीं वाक्यें विखुरलेलीं सापडतात, **तीं कांहीं नुसतीं प्रतीकें नव्हतीं. तें त्यांचें खरेंखुरें जीवन होतें.** अभङ्गाञ्जली संबंधानें बोलतांना ते श्री चिंतामणबोवा गायकवाड यांना म्हणाले होते " अभङ्गाञ्जली काव्य नाहीं. मी जें अनुभवलों आहें तें माझें जिवन तें आहे."

इतरहि कांहीं ख्रिस्तीतर टीकाकारांनीं हें ओळखलें आहे. पंचविसाव्या स्मृतिदिनीं ज्ञानप्रकाशांत लिहिलेल्या लेखात प्रो. आंबेकर म्हणतात

"प्रांजलपणा, प्रामाणिकपणा, सहृदयपणा आणि दयार्द्रबुद्धि या गुणांनीं त्यांच्या काव्यांत जें माधुर्य आलें आहे, तें केवळ भाषेपुरतें, विषयापुरतें किंवा मांडणीपुरतेंच मर्यादित न राहतां तें **त्यांच्या सर्व जीवनालाच व्यापून उरलें होतें. कवीचें जीवन आणि त्यांचें काव्य यांचा इतका अविभाज्य संबंध सुस्पष्ट रीतीनें चित्रित करणारा एक थोर** महाराष्ट्रीय ग्रंथकार म्हणून टिळकांचें नांव वाङ्मयाच्या इतिहासांत निःसंशय भूषणास्पद होऊन राहील."

## टिळकांच्या मनोवृत्तीची प्रगति

श्री. अमृतराव जोशी 'सह्याद्रि' मासिकांत म्हणतात:—

"मानवी दृष्टीचीं क्षितिजें ओलांडून अनंत क्षितिजांत समावेश करून घेणाऱ्या सत्पुरुषाच्या पराकोटीपर्यंत टिळकाच्या मनोवृत्तीची प्रगती झालेली दिसते. टिळकांचा हा हृदयविकास आणि हा हृदय-विलास म्हणजेच टिळकांची कविता होय.

टिळकांच्या कवितेला जर एखाद्या लतेची उपमा दिली, तर 'उत्कटता' हें तिचें मूळ, 'समरसता' हा तिचा अंगरस, 'प्रीति' ही तिची अंग-यष्टि, 'कारुण्य, वात्सल्य, अद्वैत' हा तिचा शाखा—पल्लव—विकास, 'प्रसाद, प्रसन्नता' हा तिचा सौंदर्यविलास आणि 'बुद्धिगम्य अमूर्त आनंद' हा तिचा मूर्तिमंत बहार म्हणावा लागेल. उद्गम, विकास, विलास व विलासा-न्तर्गत आनंद **अशी पूर्ण गुणमंडित कविता टिळकांच्या भव्य व मंगल जीवनचुडाशीं एकरूप झालेली पाहिली, आणि एकमेक एकमेकांना शोभतांना व शोभवितांना दिसणारें**

**मनोहर दृश्य डोळ्यांसमोर उभें राहिलें म्हणजे 'सुंदरतेची ही लीला' असेंच म्हणावें लागतें.**

टिळकांनीं ज्या मनोभावानें 'प्रीति' आणि 'सेवा' आपल्याशा केल्या, त्याच मनोभावानें 'प्रीति' आणि 'सेवा' रुचणारा देव त्यांनीं आपलासा केला. **टिळकांच्या प्रीतिसेवेची परिणति भक्तींत झाली,** तसें त्यांचें काव्य 'भक्तिकाव्य' म्हणून अभंगांजलीच्या रूपानें सामोरें आलें. सत्कवींच्या काव्याची परिपूर्ति भक्तिकाव्यानेंच व्हावी, हा महाराष्ट्रीय कवींचा संकेत आणि विशेष ठरलेलाच आहे."

## टिळकांचें भक्तिकाव्य

१८८० ते १८९५ पर्यंत अस्वस्थतेच्या काळांत टिळकांनीं जी कविता लिहिली आहे ती पाहतां त्या काळांत भक्तिकाव्याच्या जवळ ते एकदाच म्हणजे १८९१ सालीं आलेले दिसतात. तो काळ म्हणजे सप्तशृंग येथील देवीला उद्देशून लिहिलेलीं, व 'देवीचा प्रसाद' ह्या नांवानें प्रसिद्ध झालेलीं गीतें लिहिलीं तो. परंतु येथून पुढें पुन्हा त्यांचें मन भटकूं लागलें. भक्ति व भक्ति-काव्य ह्यांचा त्याग करून ते योगसाधनेच्या व धर्मसंस्थापनेच्या मार्गी लागले.

१८९५ सालीं टिळकांचें धर्मान्तर झालें; तेव्हांपासून मात्र त्यांच्या कवि-ची दिशा बदलली पुस्तकरूपानें प्रसिद्ध झालेल्या 'अभङ्गाञ्जलि' व 'प्रभूची प्रार्थना' ह्यांतील २५६ अभंग, 'उपासनासंगीतां'तील २५२ भक्तिरसपूर्ण पद्यें, 'भजनसंग्रहा'तील १०९ भजनें, ह्याखेरीज एकंदर ज्ञानोदय व बाळबोध-मेव्यांत येऊन गेलेलीं गाणीं मिळून एकंदर सरासरी हजारबाराशें भक्ति-स्फुटें त्यांनीं गायिलीं आहेत. हीं बहुतेक अहमदनगर व राहुरी येथेंच लिहिलीं गेलीं टिळकांचा भजनसंग्रह प्रसिद्ध झाला त्या वेळीं श्री. अच्युत बळवंत कोल्हटकरांनीं म्हटलें होतें,

"रे. टिळक जी जी कविता लिहितात त्यात रसाचा इतका ओलावा असतो, कीं त्यामुळें त्यांच्या कवितेंत जी जी मनोवृत्ति प्रथित झालेली

असेल तिला पाझर फुटून तिच्यामुळें वाचकांचें हृदय सद्‌गदित झाल्यावांचून राहत नाहीं. भक्तिरसाची भट्टीहि रे. टिळकांना अत्युत्तम साधते व 'वेडा झालों खरा' वगैरे त्यांचीं अत्युत्तम पदें आम्हीं अवलोकन केलेलीं आहेत त्यांवरून भक्तिरसानें हृदयाचें काठिण्य सर्वथैव विरघळून टाकण्याचें अत्युत्कृष्ट सामर्थ्य त्यांच्या कवितेंत आहे, हें आनंदानें निवेदन करतों."

परंतु आचार्य अत्रे म्हणतात त्याप्रमाणें "टिळकांच्या जीवनांत व चिंतनांत धर्माला फार मोठें स्थान असूनहि त्यांचें सर्वसाधारण काव्य प्रतिगामी किंवा जुनाट वाटत नाहीं. त्यांच्या रचनेंत, विचारांत व भावनेंत आधुनिकतेचा ताजे-पणा आणि विकास मुसमुसतो आहे असेंच आढळून येतें." त्याचें कारण 'धर्म' या शब्दानें अभिप्रेत होणारें कर्मकाण्डाचें जाळें त्यांनीं तटातट तोडून टाकलें होतें. 'नव्हे 'ख्रिस्ती ख्रिस्ती' परि 'ख्रिस्त ख्रिस्त' पाहिजे संतत उभा केला," ही त्यांची ख्रिस्ती जीवनासंबंधीं श्रद्धा होती. आणि हा ख्रिस्त कर्मकाण्डाच्या विरुद्ध बंड उभारणारा पहिला क्रान्तिकारक बंडवाला होता.

## ख्रिस्ती समाजांत

परंतु मराठी ख्रिस्ती समाजाला अगदीं नवीन वळण लावणारी ही शक्ति टिळकरूपानें ख्रिस्ती समाजांत अवतरतांच त्यांत भयंकर खळबळ उडाली. ख्रिस्ती धर्म हिंदुस्थानांत आणणारांनीं तो इतका पाश्चात्य बनवून आणला, कीं त्यामुळें धर्मान्तर म्हणजे देशान्तर ही समजूत दोन्ही समाजांत दृढ होऊन बसली होती. त्यामुळें दोन्ही समाजांतील सोंवळ्या लोकांशीं टिळकांना टकरा द्याव्या लागत. टिळकांनीं लिहिलेलें खालील स्फुट असाच एक प्रसंग दाखवितें :

"'धन्य धन्य माझ्या जन्मभूची कुशी !! उपजे महर्षी, संत, मुनी!' हा आमचा अभंग वाचून आम्हाला एक ख्रिस्ती बंधु उपदेश करीत आहेत, कीं तुम्ही ख्रिस्तीपणाचें पांघरूण फेकून देऊन एकदम प्रार्थनासमाजिस्ट किंवा हिंदु व्हा ! तुमचें हें दुटप्पी वर्तन पुरें झालें. आम्हाला आमच्या या बंधूंची कींव येते. आम्ही हिंदी आहों, हिंदी वाङ्मयाचा, हिंदी महा-

त्यांचा आम्हाला अभिमान असणें साहजिक आहे. तरी नुसत्या अभिमानामुळें आम्ही त्यांची स्तुति करितों असें कोणीं समजूं नये. तुकाराम, ज्ञानेश्वर हे एक वेळ आमचे गुरु होते, व आतां आम्ही त्यांचे शिष्य नसलों तरी त्यांना आपले पूर्वगुरु म्हणून कृतज्ञतापूर्वक मान देत आहों. 'माझ्या मागें या', 'माझें जूं घ्या', 'मजसारखे व्हा', 'मजमध्यें राहा', ह्या ख्रिस्तोपदेशश्रेणीचा खरा अर्थ आमच्या लक्षांत आणून दिला, तो समीपता, सलोकता, सरूपता, सायुज्यता ह्या हिंदु–तज्ज्ञांनीं मानिलेल्या व हिंदुभक्तांनीं अनुभविलेल्या भक्तियोगाच्या परंपरेनें! आणखी असे पुष्कळ अनुभव सांगतां येतील, पण ते सांगितले असतां आमचे हे धर्माभिमानी बंधु अधिकच खवळतील, ............ ............ .................... ...........चांगुलपणाचीं, श्रद्धेचीं, उदाहरणें देतांना प्रत्यक्ष आपला प्रभु येशू ख्रिस्त कितपत आपपर भेद ठेवीत आहे, हें त्याच्या चरित्राचीं व उपदेशाचीं पारायणें करणारांना कोणीं सांगायला नको पुरें झालें. आम्ही आणखी एक शब्द लिहीत नाहीं; इतकेंच अगदीं प्रांजलपणें सुचवून ठेवितों, कीं आम्हाला जगांतील सारे साधुसंत देवाच्या सदेष्ट्यांप्रमाणें असून हिंदु साधुसंतांचे बोल हा आमचा पहिला जुना करार आहे. ह्याच्यायोगानें आमचा प्रभु आम्हाला अधिकाधिक व्यक्त, अधिकाधिक जवळ होत आला आहे, आणि तोच आम्हाला "Amicus Socrates, Amicus Plato, sed Magis Amica, Veritas." सॉक्रीटिस हा आमचा प्रिय आहे, प्लेटो हा आमचा प्रिय आहे पण सत्य हें आम्हाला त्याहून प्रिय आहे.) या म्हणीचें सत्यत्व अधिकाधिकपटवून देत आहे. (ज्ञानोदय एप्रिल ११–१९१८.)

पोषाख, चालीरीती, उपासनेच्या पद्धति, भाषा, विचार, इत्यादि कितीतरी गोष्टींत पाश्चात्यांचें जें अंधानुकरण ख्रिस्ती लोकांत होत असे तें बदलून टिळकांनीं त्यांना पुरे पुरे हिंदी बनविलें हिंदी संस्कृतीची प्रत्येक गोष्ट ते पुन्हा हस्तगत करीत चालले 'हें आमचेंच अंधानुकरण चाललें आहे, हे लोक आतां हिंदु व्हायला लागले' असा कांहीं ख्रिस्तीतर लोकांनीं उलट मिष्ट केला असतां टिळकांनीं त्यालाहि समर्पक उत्तर दिलें:

"हिंदी ख्रिस्ती लोकांच्या हातांत हीं वाद्यें ('टाळ, वीणा, मृदं) पाहून व त्यांच्या भजनाचे आलाप ऐकून कित्येक ख्रिस्तीतर लोक हें आमचें अनुकरण आहे असें समजून त्याचा उपहास करीत असतात, त्यांना प्रथमत. आम्ही निक्षून सांगतों, कीं हें अनुकरण नाहीं, उलट अनुकरण सोडून जें आपलें आहे, आपल्या राष्ट्राचें आहे त्याचा हा पुन्हा स्वीकार आहे............

"येथें ज्यांनीं ख्रिस्ती धर्माचा प्रचार केला त्यांनीं म्हणजे परदेशीय मिशनरींनीं त्या धर्माच्या उपासनेची पद्धति स्थापित केली, अर्थात् त्यांनीं ह्या उपासनेंत आपणास प्रिय अशा आपल्या गानवादनाचा उपयोग केला, व हिन्दी ख्रिस्ती लोकांनीं त्याला मान दिला. याप्रमाणें आमच्या उपासनालयांतून पियानो, हार्मोनियम यांची प्रतिष्ठापना झाली व गाणीं मराठी तर चाली इंग्रजी हा प्रकार सुरु झाला तें खरें खरें अनुकरण होतें व एका काळीं तें अपरिहार्य होतें......आम्ही बाजाच्या सुरावर इंग्रजी चालीवर ओढूनताणून रचिलेलीं गाणीं म्हणणें हें अनुकरण असून टाळ, वीणा, मृदंग घेऊन अभंग-पदें, म्हणणें हा आमचा खरा खरा जन्माधिकार आहे"

## उत्क्रान्ति

आपण प्रथम बुद्धीनें ख्रिस्ती झालों परंतु हृदयानें ख्रिस्ती होण्यास आपल्या-त्या पुढें पांचसहा वर्षांचा अवधि लागला असें टिळक म्हणत. १८९५ पासून १९१९ पर्यंत आध्यात्मिक दृष्टीनें टिळकांची वाढ कसकशी होत गेली हें मोठें पहाण्यासारखें आहे. रागीटपणा, चंचल वृत्ति, वगैरे दुर्गुणांचा नायनाट होऊन त्याच्या ठिकाणीं शान्त वृत्ति व दृढता ह्यांची वाढ झालेली पाहून मोठें नवल वाटतें आपण एक धर्मसंस्थापक होणार ह्या अभिमानी वृत्तीच्या जागीं—

"पुष्कळ अजुनी उणा प्रभू मी पुष्कळ अजुनी उणा
टाकाऊ मी परंतु सदया आवडलों त्वन्मना
तुझा ऋणी तर सदाच राहिन अगा पतितपावना'

या वृत्तीपर्यंत त्यांची वाढ झाली. आपल्या नांवामागें रेव्हरेंड, मिस्टर, राजश्री किंवा कवि वगैरे कांहींहि उपाधि लावूं नयेत असें त्यांचें आग्रहाचें सांगणें असे. घरांत उठून त्यांनी झाडसारव करावी, लक्ष्मीबाईंना स्वयंपाक करण्यांत मदत करावी. कारण ख्रिस्ताला चाकरनोकर कुठें होते ?

तुला कुठें होते चाकरनोकर ।
मला हा ओजार कशाला रे ॥
तुझिया पुढारां वाढीलें कदन्न ।
मजला पक्वान्न कशाला रे ॥
तुला नाहीं जागा डोकें टेकायाला ।
मला रे कशाला घरें-माड्या ॥
दास म्हणे ख्रिस्ता तुझ्या कबरीं ।
मला जागा करीं थोडकीशी ॥
तुझ्या तोंडावर थुंकले दुर्जन ।
मग मीच कोण मोठा आलों ॥
तुझ्या पाठीवर ओढियेले बेत ।
मग ते नकोत मलाच कां ॥
लागे उचलावा तुझा तुल्य खांब ।
मग मला थांब कोण म्हणे ॥
तुझिया मस्तकीं कंटककिरीट ।
माझा थाटमाट हाच अतीं ॥

आमच्या घरीं दोनदां चोरी झाली. दोन्ही वेळेस सर्व घरदार चोरांनीं धुऊन नेलें. पहिल्या वेळेला टिळकांना चोर सांपडला. परंतु त्यांनीं त्याची पश्चात्तप्त वृत्ति पाहून त्याला सोडून दिलें व घर कांहीं मदतहि केली. पुन्हा संसाराला सुरुवात झाली. हळूहळू गरिबीचा पण सर्व संसार थाटला पुन्हा चोरी झाली त्यानंतर मात्र तांब्यापितळेचीं भांडीं घरांत त्यांनी आणलीं नाहींत. त्यांची जागा मडक्यांनीं घेतली. या चोरासाठीं टिळक प्रार्थना करीत.

विश्वास, आशा व प्रीति हे भाव मनुष्यांत पूर्णत्वानें वसावयाला हवे ही ख्रिस्ताची शिकवण आहे. व त्याच नमुन्यावर टिळकांच्या चरित्राची उभारणी

झालेली होती. त्यांच्या सर्व काव्यांत प्रत्यक्षाप्रत्यक्ष हे त्रयी दिसून येते. त्यांची सर्व कविता वाचल्यास एकहि निराशेचा सूर कोठें वाचतांना दिसून यायचा नाहीं त्यांची कविता ऊर बडवीत किंवा कपाळाला हात लावून बसलेली कधीं आढळणार नाहीं. ' अहह ' हा शब्द तिला ठाऊक नाहीं. मनुष्य आपल्या परिस्थितीचा स्वामी आहे. ' ह्या सृष्टींतिल दिव्यपण ' हेंच मनुष्यपण आहे, अशा विश्वासानें, ' हा एक कक्षेंत छावा गजाचा दुजीमा जे हा सिंह केसरवतो ', असें टिळक **मनुष्याविषयीं** बोलतात. त्यांची कविता वाचल्यानें कोणी विषण्ण बनणार नाहीं, कोणाला आत्महत्येचे विचार सुचणार नाहींत. त्यांची प्रेमविषयक कविता वाचून कोणी कामुक बनणार नाहीं प्रेम आणि पावित्र्य ह्यांची सांगड त्यांच्या काव्यांतून कधीं सुटणार नाहीं इंग्रजीचा परिणाम टिळकांवर झाला असला तरी तें अपचन होऊन अंगावर उबरलेलें इंग्रजी नाहीं. तें पचनीं पाडून आपलेंसें केलेलें इंग्रजी आहे त्यांची बोली पूर्णपणें मराठी आहे. वनवासी फुलासंबंधीं लिहितांना त्यांच्या बोलीसंबंधीं रा. भिडे व रा खाडेकर ह्यांनीं असे उद्गार काढलेले आढळून येतात, कीं—

" प्रस्तुत काव्यावर पाश्चात्य कवींपेक्षां भारतीय कवींचीच छाया ठळकपणें पडलेली आहे एकंदर वर्णनाची पद्धती, दृष्टान्तोपमादि अलंकार आणि स्वभावलेखनाची रीत, संस्कृतप्राकृत कवींच्याच धाटीची आहे "

"कल्पनांच्या दृष्टीनें त्यांच्यावर इंग्रजी काव्याचा मुळींच पगडा बसलेला दिसत नाहीं. वनवासी फुलाचें एकंदर वातावरण सर्वांशीं स्वदेशी आहे."

टिळकांच्या सर्वच कवितेला हे उद्गार लागू पडतील.

टिळक ' पश्चिम हिंदुस्थानचे रवींद्रनाथ टागोर ' नाहींत, कीं ' महाराष्ट्राचे वर्ड्स्वर्थ ' नाहींत टिळक हे टिळक आहेत. त्यांचे व्यक्तित्व व त्यांचें कवित्व पूर्णपणें त्यांचेंच आहे, व ही गोष्ट त्यांचें चरित्र व त्यांचें **संपूर्ण** काव्य **अत्यंत समतोल बुद्धीनें** पाहणाराच्या ध्यानांत येईल.

ह्या विवेचनावरून दिसून येईल, कीं टिळक हे मुख्यतः धार्मिक कवि होते व कवि म्हणून त्यांचें स्थान ठरवितांना त्या दृष्टीनेंच तें ठरविलें पाहिजे.

ईश्वरभक्तिपर कविता आधुनिकांत फार थोड्यांनीं लिहिली आहे. टिळकां-आधीं ती 'पाळंदे' आणि 'नरहरी' व नंतर 'स्वामी कुवलयानंद' आणि 'दास गणू' त्यांनीं लिहिली आहे. 'मोडक' आणि 'भांडारकर' त्यांचीहि ईश्वरभक्तिपर मधुर पद्यें प्रार्थनासंगीतांत आहेत.

सध्या वाचकांपुढें असलेली त्यांची कविता (टिळकांची कविता भाग १) ही त्यांची फक्त 'Secular'—धर्मातील–कविता आहे. धर्मातीत हा शब्दहि बरोबर नाहीं. कारण उघड नसला तरी प्रच्छन्नरीतीनें त्यांचा धर्मभाव याहि कवितेंतून दिसून येत आहे, कारण ते प्रामुख्यानें धार्मिक कवि होते. मात्र त्यांचा धर्म हा कर्मकांडाच्या पलीकडचा होता आणि म्हणूनच—

**टिळकांच्या काव्यांत बुद्धि किंवा हृदयाला जेवढें स्थान आहे तेवढें कृतीलाहि आहे.** त्यांची कविता नुसती बोलकी, किंवा नुसती हास्याचे 'फवारे' किंवा अश्रूंचीं 'कारंजीं' उडविणारी नसून कृति करणारी आहे.

## संन्यास

१९१७ पूर्वी दोनतीन वेळेस टिळकांनीं मिशनची पगारी नोकरी सोडली होती परंतु मिशनचा संबंध त्यांनीं कधीं सोडला नाहीं. १९१७ सालीं पुन्हा त्यांनीं पगार देण्याचें सोडलें. मात्र आतां ते अहमदनगर सोडून सातारा येथे येऊन राहिले.

आपल्याला पुन्हा माणसावर अवलंबून राहण्याचा मोह होऊं नये म्हणून त्यांनीं आपला बेत ज्ञानोदयांत प्रसिद्ध केला, कीं "देवाच्या वाणीला मान देऊन मी आजपासून मिशनचा किंवा दुसऱ्या कोणत्याहि मानवी संस्थेचा आश्रित किंवा वेतन देऊन काम करणारा चाकर नाहीं मी एक ख्रिस्ती संन्यासी म्हणजे विरागाच्या नव्हे—तर अनुरागाच्या मार्गें जाणारा संन्यासी आहें. मला आजपासून देव जो आत्मा, तो सांगेल तें करण्याचे प्रयत्न करावयाचे आहेत."

टिळकांनीं 'देवाचा दरबार' नांवाची एक संस्था काढली. तिचा संकल्प असा होता "मी तुझ्यासारखा दरिद्री राहीन, तुझ्यासारखी सेवा करीन;

तुझ्यासारखा निर्वैर असेन, तुझ्यासारखा खाबाला खिळला जाण्यास सिद्ध राहीन, तुझ्यासारखा देवाच्या इच्छेची परिपूर्ति करावयाला झटेन, तुझ्यासारखें मनुष्यमात्रावर प्रेम करीन, मी श्रद्धेच्या बलानें तुझ्या समीप असेन, तुझेंमाझें जग एक करीन, तुझेंमाझें रूप सारखें व्हावें म्हणून झटेन व शेवटीं तुझ्याशीं युक्त होऊन 'तुम्ही मेला आहां व तुमचें जीवित खिस्तासह देवाचे ठायीं प्रच्छन्न आहे', हें साधुवर्य पौल यांचें म्हणणें, स्वानुभवानें खरें करीन."

'देवाच्या दरबारा'ला सुरवात झाली पुष्कळ सभासद मिळूं लागले परंतु त्याला विरोधहि फार होऊं लागला कोणतीहि नवीन गोष्ट आली म्हणजे तिच्याकडे संशयी दृष्टीनें पाहण्याचा मनुष्यस्वभावच आहे टिळकांनीं संन्यास घेतला. त्यांच्या प्रमाणेंच आणखीहि कित्येकांना संन्यास घ्यावा असें वाटूं लागलें. त्यांतील एकाला त्यांनीं उत्तर दिलें कीं "खिस्ती संन्यासी पतीला आपल्या पत्नीचा त्याग कर असें सांगत नाहीं. या बाबतींत 'जें देवानें जोडलें तें माणसानें तोडूं नये' अशी प्रभूची स्पष्ट आज्ञा आहे. सारांश जर आपल्या कुटुंबाचा आजचाच आटोक्या बाहेर झालेला विस्तार आणखी अधिक व्हायचा असेल तर आपण मजप्रमाणें संन्यास न घेतां घरातल्या घरातच देवाचें साह्य घेऊन क्रमाक्रमानें किंवा एकदम आपल्या पत्नीविषयक प्रेमाशीं संबद्ध असलेल्या **कामाचा त्याग करा, हा पहिला सन्यास होय.** हाहि पूर्णपणें व्हायला पति व पत्नी या उभयतांचें सहव्यक्तित्व पाहिजे आपण उभयतां देवाचे चिंतनांत, प्रार्थनेंत व सेवेंत, जितकीं जितकीं अधिक निमग्न व्हाल तितका तितका आपणास हा सन्यास होईल."

टिळकांनीं पगार सोडला, तेव्हां त्यांचा योगक्षेम कसा चाले असा प्रश्न येईल. त्यासंबंधीं टिळकांच्याच शब्दांत त्यांचें म्हणणें खालीं दिलें आहे—

"मी उद्यांची सेवा करीन, त्यांच्यापुढें गरज लागल्यास आपली झोळी करीन. तींत देवाच्या प्रेरणेनें ते जें टाकतील त्याचा मी देवाचे व त्यांचे उपकार मानून स्वीकार करीन. माझ्या गरजेपेक्षां हें दान अधिक भरल्यास मी त्याचा तेथल्या तेथेंच जनसेवेप्रीत्यर्थ उपयोग करीन'—'मी या वृत्तीला भिक्षा समजत नाहीं, मला भिक्षा मागायची नाहीं व भिक्षुकीला उत्तेजन द्यायचें नाहीं."—"कामकऱ्याला त्याचें अन्न मिळावें हें वाजवी आहे (मत्तय १०·१०) हें अन्न

देणारा देव आहे, आणि हूं तो कामकऱ्यानें ज्याचें काम केलें त्याकडून देववितो. ( मत्तय १०·११–१४ )."

सातारला इन्फ्लुएन्झानें माणसें मरूं लागलीं. त्यांची करुणाजनक स्थिति पाहून टिळकांनीं "अल्प दवाखाना व स्वल्प अन्नछत्र खुलें केलें. रोज तीनचार शेर काढा उकळण्यांत येई. तें औषध, दूध, साबूदाणे, साखर, घासलेट व आगपेट्या ह्या जिनसा टिळक सकाळीं आठपासून बारापर्यंत वांटीत." ( स्मृतिचित्रें ) सातारला ख्रिस्ती भजनालय नव्हतें तेथील मिशनशाळेच्या हॉलचा उपयोग त्या कामीं होई. परंतु तेथील मिशनरीबाईला टिळकांचे लोकविलक्षण मार्ग न खपून ती त्यांच्या मार्गांत अडथळे उत्पन्न करूं लागली. ' एक दिवस मंडळी टिळकांकडे सांगावयाला आली. आज स्वर्गाचीं दारें बंद झालीं ! टिळक म्हणाले होऊं द्या. देव देवळांत रहात नाहीं. जेथें कोठें दोघेतिघे एका दिलानें मजकरितां जमाल तेथें मी आहें, असें प्रभु म्हणतो आहे. चला, आपण मैदानांत झाडाखालीं मंदिर उघडूं " टिळक निघाले. त्यांच्या मागें मंडळी निघाली. टिळकांच्या त्या मंबाजीनें दुरून हें पाहिलें लागलाच एक तुल्मा धावत धावत किल्ली घेऊन ह्या मंडळीच्या मागें आला व त्यानें सर्वांस मागें फिरविलें. त्या दिवशींच्या टिळकांच्या भाषणानें मंडळीचे डोळे ओले झाले. त्यांच्या [illegible]

ख्रिस्ता तुझ्या कैवेवरी ! मला जागा करीं थोडकीशी हें होतें भाषण संपतां संपतां टिळकांनीं सांगितलें,' आज माझा हा तुम्हाला शेवटचा उपदेश आहे. मी पुन्हा ह्या मंदिरांत पाय टाकणार नाहीं मी येथून जाईन तो पुन्हा साताऱ्यांत पाणी पिणार नाहीं.' लोक रडूं लागले टिळकांचें म्हणणें खरें झालें तो त्यांचा त्या मंदिरांतला शेवटला उपदेश ठरला परंतु ईश्वरी योजना किती विलक्षण असते ! ज्या साताऱ्च्या मंडळीला उपदेशासाठीं मिशनच्या शाळेंत जमावें लागे त्याच साताऱ्च्या मंडळीला एका उदार मित्राच्या देणगीमुळें टिळकांच्या मृत्यूनंतर एक सुंदर मंदिर मिळालें व त्या मंदिराचें नांव ' टिळक स्मारक मंदिर ' असें ठेवण्यांत आलें

## मृत्युपत्र

टिळकांना मूळव्याधीचा त्रास होऊं लागला. त्यांनीं आपलें मृत्युपत्र तयार केलें. त्यांत अर्थात कशाची व्यवस्था करून ठेवायचा प्रश्नच नव्हता.

दोन मयाच्या कन्या व कांहीं मडकीं एवढाच त्यांचा संसार होता. त्या मृत्यु-पत्रकात त्यांनीं म्हटलें आहे, 'मी जितकी आपल्या देशावर प्रीति करतों तितकी मी आपल्या आईबापांवर, बायकोवर, लेकरांवर, मित्रांवर, फार काय स्वतःवरहि केलेली नाहीं असें मला वाटतें. देवाज्ञा कधीं होईल हें कांहीं कुणाला सांगतां येत नाहीं व तिचा उगाच कुणींहि विचार करीत बसूं नये. देवाज्ञेला मी कधींहि "मृत्यु" म्हणणार नाहीं! कारण ती देवाची आज्ञा आहे, देवाचें बोलावणें आहे, ती नवजीवनजागृति आहे. या मृत्यूचा विचार माझ्या मनांत आला तर तो मला कधींहि निरुत्साही करीत नाहीं."

झाले. त्यानंतर साडेपांच महिन्यांनीं टिळकांना मृत्यु आला. आधीं पुणें व नंतर मुंबई याप्रमाणें त्यांनीं उरलेले बहुतेक दिवस दवाखान्यांत घालविले. त्यांचा आजार अगदीं साधारण म्हणजे मूळव्याधीचा होता. तें शारीरिक दुःख नसेल तेव्हां ते मोठ्या आनंदांत असत. या अवधींत त्यांचा कितीतरी वेळ भजनांत जात असे, कितीतरी नवे अभंग त्यांनीं लिहिले, कितीतरी लेख लिहिले. मनुष्य आपल्या परिस्थितीचा स्वामी आहे हें आपलें ब्रीदवाक्य या आजारांत त्यांनीं खरें करून दाखविलें. मृत्यूच्या आदल्या दिवशीं रे. जे. एफ्. एडवर्ड्स् त्यांना भेटायला गेले असतां टिळक त्यांना म्हणाले, "माझ्यासारख्या इतर रुग्णजनांस मी दर रविवारीं देवासंबंधानें सांगत असें. ख्रिस्ताचें उज्ज्वल चरित्र सांगण्याचा जेव्हां जेव्हां मला प्रसंग आला तेव्हां तेव्हां मला आपल्या शारीरिक यातनांचा विसर पडला." जे. जे. हॉस्पिटलांत मॉर्फिया इंजेक्शनांनीं त्यांची शुद्धी हरण करीपर्यंत त्यांना शारीरिक कष्ट जबर होत आहेत हें कोणाच्या ध्यानांतहि येऊं नये, इतके ते भक्तिरसांत तल्लीन होऊन जात. अगदीं शेवटल्या दिवसापर्यंत, रे. जे. एफ्. एडवर्ड्स, श्री. काशिनाथ रघुनाथ मित्र, श्री. मनोहरराव उजगरे वगैरे कितीतरी मित्रांशीं ते बोलले. परंतु एकालाहि त्यांच्या बोलण्यावरून हा त्यांचा शेवटचा दिवस असेल असें वाटलें नाहीं.

पण टिळकांना ती कल्पना होती. लक्ष्मीबाईंशीं शेवटलें बोलणें झालें. टिळक म्हणाले,

मी आतां बरा आहें, लवकरच चांगला बरा होईन. काळजी करूं नको. मला माझीं सेन मोठालीं कामें अजून करावयाचीं आहेत. ख्रिस्तायन व देवाचा दरबार.

'माझें आवडतें गाणें कोणतें आहे सांग पाहूं.

शत्रु गराडा घालुन बसले
बसोत त्यांना कोण पुसे
पिता परात्पर ज्याचा त्याहुन
पर्वतशतही थोर नसे.

आकाशींची कुऱ्हाड आली
कुऱ्हाड आली येऊं द्या
पिता परात्पर ज्याचा त्याला
खेळाया होइल सध्या.—

आधीव्याधी उभे पुढें, हे
जरामरण पाठीमागें
पिता परात्पर ज्याचा त्याशीं
शक्त न हे लढण्याजोगे.—

शुक्रवार ता. ९ मे १९१९ रोजीं टिळकांना देवाज्ञा झाली. त्यांच्याच शब्दांत म्हणायचें झालें तर—

"कोणी कोणी म्हणति तुजला हा जगाआड गेला
सारें खोटें; परि तुज नवा जन्म हा प्राप्त झाला।
तूं दयाला त्यजुन पुढतीं आमुच्या भारतीशी
'न प्रेमाला मरण' पटली आज पौलोक्ति ऐशी."

# टिळकांच्या बाबतींत झालेला अन्याय

टिळकांची कविता भाग १ असें जें पुस्तक वाचकांपुढें १९१४ सालीं आलें त्याच्या विषयीं त्या पुस्तकाला लिहिलेल्या उपोद्घातांत श्री. नरसिंह चिंतामण केळकर म्हणतात.—

"सदर कवितासंग्रहांत कवींच्या विशिष्ट धर्मपंथाची कोणास आठवणहि होणार नाहीं अशा नाजुक व मार्मिक रीतीनेंच कवितांची बहुधा निवड केली गेली आहे."

टिळकांच्या धार्मिक कवितांचा यत्किंचित् वास आला असता तरी वाचकांनीं त्या पुस्तकाला हात लावला नसता अशी त्या वेळची परिस्थिति होती हें ओळखूनच रे. भास्कर कृष्ण उजगरे ह्यांनीं कवितांची निवड करतांना अगदीं 'Secular' धर्मातीत अशीच कविता निवडली.

हा कवितासंग्रह प्रसिद्ध झाल्यानंतर पांच वर्षांनीं टिळकांची कविता भाग २ अभङ्गाञ्जलि व बत्तीस वर्षांनीं टिळकांची कविता भाग ३ ख्रिस्तायन, हीं प्रसिद्ध झालीं.

टिळकांची समग्र कविता वाचकांपुढें नाहीं आहे ती एवढीच व तीहि एकसमयावच्छेदेंकरून आलेली नाहीं. तेव्हां हे वाचक त्यांना टीकाकार सांगतील तीं मतें स्वीकारतील ह्यांत नवल नाहीं

माझा दावा आहे तो ह्या वाचकांविरुद्ध नसून संपूर्ण अभ्यास न करतां वाचकांना चकविणाऱ्या टीकाकारांविरुद्ध आहे. टिळकांच्या धर्मान्तरामुळें, त्यां-च्यासंबंधीं लिहितांना ह्या टीकाकारांनीं जो अभ्यास करायला पाहिजे होता तो न करतां व जें वाचन करायला पाहिजें होतें तेंहि पुरें न करतां एक लिहितो म्हणून दुसरा त्याची री ओढतो असा प्रकार केला.

गतानुगतिकत्वाची तर आमच्या लेखकांत कमाल आहे. संस्कृत कविपंचका-वरून मराठी कविपंचक सुचलें, नंतर मराठी ५ कवि आले, मग ५ निबंधकार

आले मग पाच संत कवि आले, महाराष्ट्राचे पंचप्राण आले ! सात कां नाहीं ? आणि तसें पाहिलें तर पांच आंकड्याच्या ह्या मोहानें इतर कवींवर व वाचकांवरहि ह्या गतानुगतिकानीं अन्याय केला आहे. टीकाकारांच्या गतानुगतिकत्वाचें आणखी एक उदाहरण—दुष्ट उदाहरण द्यायचें झालें तर तें बालकवींच्या उदासीनतेबद्दलचा त्यांचा शोध. एकानें म्हटलें त्यांच्या उद्विग्नतेचें एकमेव कारण त्यांच्या पत्नी होत्या, दुसऱ्यानें त्यांचीरी ओढली, तिसऱ्यानें तेंच केलें—पण ह्या बाबातींत आपण जीं विधानें करतों त्यांत सत्य किती आहे, त्यामुळें आपण कोणावर अन्याय करतों आहों कीं काय हें पाहण्याचें कितींच्या डोक्यांत आलें ?

हीं एकदोन उदाहरणें चटकन् ध्यानांत आलीं तीं दिलीं. चोखंदळ वाचक आणखी पुष्कळ शोधून काढूं शकतील

टिळकाच्या धर्मान्तरामुळें त्याच्यावर लिहितांना व बोलतांना समतोल बुद्धि ठेवून लिहिणारे व बोलणारे—निदान आधींआधीं तरी कोणी फारसे सांपडत नसत. त्यांच्या धर्मान्तराचा हा असा परिणाम झाला असल्याची कबुलायत 'आधुनिक कविपंचका'चे विद्वान् लेखक श्री. ग. त्र्यं. माडखोलकर आपल्या एका खाजगी पत्रांत अप्रत्यक्षपणें देतात, श्री. माडखोलकर म्हणतात–(२७-६-२९)

> "टिळकांविषयीं आपल्याला एक सूचना करणें अत्यंत आवश्यक वाटतें. टिळकांचें धर्मान्तर ही त्यांच्या आयुष्यातील अत्यंत क्रान्तिकारक व केन्द्र-सदृश गोष्ट असून **त्यांच्याविषयीं अनेक प्रकारचे पूर्वग्रह उत्पन्न करण्यास ती कारण झालेली आहे.** (जाड टाईप माझा) त्यांच्या धर्मान्तराविषयीं व धर्मविषयक मताविषयीं शक्य तितकी अधिकृत माहिती आपण दिली पाहिजे. त्याचप्रमाणें चरित्रांतील जितका भाग त्यांच्या शब्दांत देतां येईल तितका द्यावा म्हणजे कोणालाहि शंका घ्यावयाला जागा नको."

हा परिणाम खुद्द श्री. माडखोलकरांवरच झालेला होता हें त्यांच्या आधुनिक कविपंचकांतील लिखाणावरून स्पष्ट होतें.

प्रा. मंगेश विठ्ठल राजाध्यक्ष आपल्या '५ कवि' ह्या पुस्तकांत स्पष्टच सांगत आहेत कीं—

"धर्मान्तरामुळें सामाजिक संबंधांत त्याची, अस्पृश्य म्हणून ओढाताण झालीच असेल, पण साहित्यक्षेत्रांतहि त्याची सांवली त्यांना सुटली असें नाहीं."

जळगांवच्या भाजलेल्या पहिल्या कविसंमेलनांत टिळकांनीं एवढा पुढाकार घेतला होता तरी तेथेंहि ही वाङ्‌मयीन शिवाशीव दिसून आलीच "तूं दहनभूमिंतिल पुष्प जयाला म्हणशी" तें पुष्प सार्थसुधें नाहीं असें अनततनयांना तेथें जमलेल्या कांहीं पूर्वग्रहदूषित साहित्यिकांना सागावें लागलें होतें. जळगांवहून परत येतांना टिळक व श्री पांगारकर ह्यांनीं एकाच डब्यांत प्रवास केला त्या प्रवासांत ह्याच गोष्टीवरून दोघांचें कडाक्याचें भांडण झाल्याचें पुढें मला दोघांनींहि भिन्न भिन्न प्रसंगीं सांगितलें होतें

महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार आपल्या एका खाजगी पत्रांत लिहितात. : ( ३० ४-५३ )

"इ स १९१४–१६ च्या काळांत महाराष्ट्रांतील टिळकांचे समकालीन के. **** *** ** बी. ए.[१] हे आमच्या नू म.वि च्या शिक्षक-शाळेंत मला अनेकदां बोलले आहेत—तो टिळक–' नोडगा '–बाटगा – मोठ्या रागानें आणि तिरस्कारानें बोलत. मी प्रतिवाद करीत असें. माझे गुरु व सहकारी के. लक्ष्मणशास्त्री लेले ह्यासहि हा प्रकार विदित होता. पण संमत नव्हता."

प्रा. द. के. केळकर ह्यांच्या ' काव्यालोचन ' नांवाच्या २८२ पानांच्या पुस्तकात टिळकांविषयीं जो चारपांच वेळां उल्लेख आला आहे त्यावरून टिळकांच्या धर्मान्तरामुळें त्यांचाहि तोल कसा सुटलेला दिसून येतो हें पुढें परिशिष्टांत अधिक विस्तारानें दाखविलें आहे येथें जातां जातां एवढेच सांगायचें, कीं

---

[१] नाव मीं गाळलें आहे दे. ना. टिळक

"मनुष्य आपल्या परिस्थितीचा स्वामी आहे" हें म्हणताना टिळकांपुढें दृष्टि, वाचा किंवा श्रवण ह्या सर्वांना मुकलेली हेलन केलर किंवा दोन हजार वेळेला अपयश आलें तरीहि त्या दोन हजार अपयशानंतर वर मान करून 'एखादी गोष्ट कशी करूं नये हें दोन हजार रीतींनीं आपण शिकलों,' असें म्हणणारा एडिसन हीं असलीं पाहिजेत. व अशा 'मान या 'च्या प्रतीकांना पाहून त्याच 'मानव्या विषयीं सुचलेली ही 'दर्पोक्ति' वृथा आहे असें कोण म्हणेल ?

श्री. केळकरांचें हें पुस्तक मूळ ज्या केसरीच्या स्तंभातून क्रमशः प्रसिद्ध झालें त्या केसरीकारांनीं तर आपल्या टिळकद्वेषाचें प्रदर्शन इतक्या उघड रीतीनें केलें होतें, कीं त्याला तोडहि मिळणार नाहीं प्रथम टिळक वारले. त्यांच्या निधनाचें वर्तमान केसरीच्या एका कोपऱ्यांत [illegible]
आलें. नंतर टिळकांचे धाकटे बंधु सखारामपंत वारले. तेव्हां त्याच केसरींत एक खास संपादकीय स्फुट येऊन सखारामपंत हे कवि असल्याचाहि शोध त्यावेळेस केसरीनें लावला. त्यापुढील विवेचनांत श्री. माडखोलकरांच्या सूचनेप्रमाणें टिळकांच्या 'धर्मान्तराविषयीं व धर्मविषयक मताविषयीं शक्य तितकी अधिकृत माहिती' 'त्यांच्या शब्दांतच' देत आहें.

१९४४ मध्यें टिळकांच्या पंचविसाव्या स्मृतिदिनीं मीं पुण्याच्या ख्रिस्ती मराठी वाङ्मयमंडळापुढें एक भाषण केलें होतें. त्या प्रसंगीं महामहोपाध्याय दत्तोपंत पोतदार हजर होते व त्यांनीं आपल्या भाषणांत माझ्या म्हणण्याला दुजोरा दिल्याचें स्मरतें त्या वेळीं खालीलप्रमाणे बालल्याचें ते एका खाजगी पत्रांत आठवण देतात :—

"आम्हाला हिंदुधर्माचा लहानपणापासून अभिमान होता तो अद्यापि वाढतच आहे. तरीहि दुसऱ्याच्या सद्भावनेवर चिखल टाकलेला आम्हास अन्यायाचा वाटतो ... असा नारायणराव म्हणजे माधुर्य–भक्तीचा संगम आहे. त्यांना व्यर्थ दूषणें का द्यावीत ?"

विषय-प्रवेश म्हणून माझ्या त्या भाषणाचा कांहीं भाग येथें दिल्यास तो अस्थानीं होईल असें वाटत नाहीं.

"ह्या प्रसंगाची मी वाट पहात होतों पंचवीस वर्षे वाट पहात होतों. आजची संधि खरोखरच अमोल आहे आणि म्हणून मीं चटकन आपलें आमंत्रण स्वीकारलें. टिळकांच्याबद्दल कळत-नकळत जे जे अन्याय झालेले आहेत त्यांचा उल्लेख केल्यास आज माझें म्हणणें महाराष्ट्राला पटेल असा काळ आला आहे. हें मी मागें बोललों असतों तर माझ्या बोलण्याचा कदाचित् विपर्यास करण्यांत आला असता. कदाचित् टिळकांचा मुलगा म्हणून हा असें बोलतो असें कोणाला वाटलें असतें. आज टिळक ही व्यक्ति ऐतिहासिक व्यक्ति झाली असल्यानें व त्यांच्या समकालीन विद्यमान व्यक्तींबद्दल बोलतांना जीं बंधनें एऱ्हवीं पाळावीं लागलीं असतीं तीं पाळण्याचें आज कारण उरलें नसल्यानें मला जें बोलावयाचें तें अगदीं स्पष्ट व कांहीं आडपडदा न ठेवतां बोलतां येईल.

"मासिक मनोरंजनांत अनंततनयांवर लिहिलेल्या एका लेखांत श्री. माधव म्हणतात :—

> " रे. टिळकांप्रमाणें जर बिनदगदगीचें असें एखादें चरितार्थाचें साधन त्यांना ( म्हणजे अनंततनयांना ) प्राप्त झालें असतें तर आपले उच्च विचार त्यांना खात्रीनें आपल्या कृतींत उतरवून दाखवितां आले असते. आपला धर्म आणि समाज यांना सोडून देण्यापूर्वी रे. टिळक यांच्या कवितेचें स्वरूप अत्यंत क्लिष्ट असें होतें. तेंच ते ख्रिस्ती झाल्यावर किती सुधारलें हें कोणालाहि सांगावयाला नको. रे. टिळकांच्यामध्यें ही सुधारणा घडून येण्याचें वास्तविक कारण त्यांचें धर्मान्तर हें नसून धर्मान्तरामुळें चरितार्थाची सोय झाल्याकारणानें काव्य या विषयाकडे त्यांना भरपूर वेळ देतां आला हें होय." (मनोरंजन सप्टेंबर १९२९ )

वरील विधान सत्य नाहीं परंतु तें सपशेल खोटेंहि नाहीं. तें एक अर्धसत्य आहे. ख्रिस्ती झाल्यावर टिळकांमध्यें एकप्रकारची स्थिरता आली, ही गोष्ट सर्वस्वी खरी आहे. पण ती चरितार्थाच्या सोयीमुळेच काय ?

त्याला उत्तर रा. आनंदराव जोशी ह्या नागपूरच्या एका संशोधकांनीं परस्परच व नकळत देऊन ठेवलें आहे.

रा. जोशी १९३४ सालीं ( २–९–३४ ) नागपूरच्या 'महाराष्ट्र' पत्रांत लिहितांना म्हणतात—

"त्या काळांत ( म्हणजे टिळकांनीं ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केल्याच्या किंचित् आधींच्या काळांत ) टिळकांनीं लेखक, कवि, व संपादक या त्रिविध नात्यांनीं केलेलें वाङ्मयकार्यहि अनेक दृष्टींनीं महत्वाचें व संस्मरणीय आहे. नागपुरास त्यांचे आश्रयदाते कै. रावबहादूर मकुंद बाळकृष्ण ऊर्फ आप्पासाहेब बुटी हे होते. व त्यांनीं त्यांना आपल्या ग्रंथसंग्रहातील धार्मिक संस्कृत ग्रंथांचें संशोधन व भाषांतर करण्याच्या कामावर नेमलें होतें. त्यांच्याच प्रोत्साहनानें व साह्यानें येथें 'ऋषि' नांवाचें मासिक मार्च १८९१ पासून टिळकांच्या संपादकत्वाखालीं काढण्यांत आलें होतें. त्याशिवाय स्वतः टिळकांनींहि येथें 'काव्य-कुसुमांजलि' ( ज्या. १८८९ ) व 'विविधविषयतरंगिणी' ( मार्च १८९३ ) नांवाचीं दोन मासिकें काढलीं होतीं."

श्रीमंत बुटींच्या नोकरींत शिरण्याआधींहि टिळक वेगवेगळ्या गांवीं वेगवेगळ्या नौकऱ्याधंदे करीत मुंबईपासून राजनांदगांवापर्यंत फिरत राहिले होते ते केवळ चरितार्थाच्या सोयीसाठींच काय ? चरितार्थाची सोय लागावी ह्या एका तळमळीनेच त्यांनीं साधुसंतांची सेवा, व योगसाधना इत्यादि गोष्टी केल्या असाव्या काय ? चरितार्थाच्या सोयीसाठींच श्रीमंत बुटींसारख्यांचा आश्रय त्यांनीं सोडला असावा काय ?

धर्मान्तरानें टिळकांना स्थिरता आली ही गोष्ट खरी परंतु ती आर्थिक स्वरूपाची नसून वैचारिक, मानसिक व आत्मिक स्वरूपाची होती हें उघड आहे.

मनुष्य ख्रिस्ती होतो तो केवळ 'भाकरी' साठीं होतो ही जी एक कल्पना कित्येकांच्या मनांत घर करून बसलेली असते किंबहुना ख्रिस्ती व्हायला त्याला दुसरें कारण असणें शक्यच नाहीं असा जो त्या लोकांचा पक्का भरंवसा असतो त्यामुळें ख्रिस्ती लोकांमधील चांगल्या गुणांची त्यांना पारख होत नाहीं, त्यांच्या चांगल्या कामाचें चीज होत नाहीं.

आपला धर्म सर्वश्रेष्ठ, त्या धर्मात इतर सर्व धर्मांचा समावेश होतो, त्या धर्मात नाहीं असें दुसरीकडे कांहीं असणें संभवनीयच नाहीं—ही जी एक दुराग्रहाची भावना पुष्कळशा लोकांत असते तीमुळें धर्मान्तर झालें कीं त्यांच्या अंतःकरणाची चीरफाड सुरू होते, व मग ख्रिस्ती झालेल्या माणसास मोहासाठींच ख्रिस्ती धर्म स्वीकारावा लागला हें स्वतःला पटणारें, स्वतःचें मन न दुखविणारें, स्वतःच्या अभिमानाला धक्का न लावणारें लंगडें आणि सोईस्कर विधान बाहेर पडतें.

जो गृहस्थ, टिळकांना पाहिजे असें, केवळ वाङ्मयीन कार्य करण्यासाठीं आपलें ग्रंथभांडार त्याच्या हवालीं करतो, ते मागतील तो पगार देण्यास जो तयार होतो, स्वतःच्या मुलाला टिळकांच्या हाताखालीं, प्रत्यक्ष त्याच्या घरीं, गृहशिक्षणासाठीं आणून ठेवतो, ज्याची श्रीमंती एखाद्या संस्थानिकाला शोभण्यासारखी होती, ज्याला गुणी माणसांची पारख होती, किंमत होती व गरज होती, त्या रावबहादुर आप्पासाहेब बुटींच्याकडून निघून टिळक ख्रिस्ती झाले. ख्रिस्ती होण्याच्या थोडेसें आधीं टिळक राजनांदगावला गेले होते. तेथेंहि त्यांना पगार व मानमान्यता चांगलीं होतीं. आप्पासाहेबांचें टिळकांवरील प्रेम कधींच कमी झालें नव्हतें. टिळक ख्रिस्ती होत आहेत हें ऐकतांच आप्पासाहेबांनीं आपले चिरंजीव बापूसाहेब ह्यांना राजनांदगांवीं पाठवून तुम्हाला काय पाहिजे आहे तें सांगा म्हणजे ती सोय करतों, परंतु ख्रिस्ती होऊं नका असा निरोप टिळकांना पाठविला होता. परंतु टिळकांनीं ह्या अत्यंत प्रेमळ मित्राकडील अत्यंत सुखाची व त्यांच्या वाङ्मयीन संसाराला योग्य अशी नोकरी सोडली व ते ख्रिस्ती झाले.

इकडे ख्रिस्ती झाल्यानंतर त्यांना कित्येक वर्षे जो पगार मिळाला तो आतां पहा.

डॉ. ह्यूम ह्यांच्या जुन्या हिशोबाच्या वह्या तपासून मीं हे आंकडे मिळविले आहेत. १८९५ फेब्रुवारी ते १८९६ जूनपर्यंत टिळक मुंबईस होते. तेथील त्यांच्या पगाराचे आंकडे सांपडले नाहींत. परंतु तेथेंहि त्यांना फक्त पोटापुरतें मिळत असावें कारण तेथील शाळेंत ते कांहीं तासच शिक्षकाचें काम करीत.

| | | |
|---|---|---|
| जुलै १८९६ ते नोव्हें० १८९९ | दरमहा रु. | ३५ |
| डिसें० १८९९ ते डिसें० १९०२ | ,, रु. | ४५ |
| जाने० १९०३ ते जुलै १९०३ | ,, रु. | ५० |

आणि पुढें त्यांनीं फुकट केलेल्या कामांचा अंतर्भाव करून जर त्यांच्या पगारांची सरासरी काढली तर ख्रिस्ती झाल्यापासून शेवटपर्यंतच्या २४ वर्षांच्या काळात त्यांना मिशनच्या नोकरींत दरमहा ५२ रु १ आणा ३ पै इतका सरासरीनें पगार मिशनकडून मिळाला आहे.

टिळकांनीं १९१२ ते १९१९पर्यंत ज्ञानोदयाच्या संपादकांचें काम केलें परंतु ते विनावेतन केलें. प्रा आंबेकर म्हणतात त्याप्रमाणें त्यांना त्याबद्दल कांहीं वेतन मिळत असे, असें नाहीं

मोठा पगार नाही तर ख्रिस्ती होण्याबद्दल कांहीं डबोलें तरी टिळकांना खास मिळालें असावें असेंहि कित्येकांचें म्हणणें आहे. त्यांना माझें इतकेंच सांगणें आहे कीं टिळकांच्या मृत्यूनंतर पुढें तीन वर्षेंपर्यंत बँकबुक म्हणजे काय तें आमच्या घरांत ठाऊक नव्हतें. आणि इतका वाद तरी कशाला ! हातच्या कांकणाला आरसा लागत नाहीं. टिळकांचा संसार पाहिलेलीं माणसें अजून हयात आहेत "**दृश्य जगाच्या स्वार्थी संसाराची**" किंमत टिळकांना काय वाटत होती व पैशावांचून ते कोठें अडून बसत होते हें तीं सांगू शकतील.

श्री. अनंततनयांवर 'माधवां'नीं लिहिलेल्या लेखाचा पान ५२ वर जो उल्लेख आहे, त्याच 'माधवां'नीं टिळकांच्या मृत्यूनंतर त्यांच्यावर लिहिलेली एक उत्कृष्ट कविता 'नवयुगां'त प्रसिद्ध केली होती. तींत त्यांनीं म्हटलें होतें

> "महाराष्ट्रांतल्या साऱ्या कवींचा तूं महाराज
> कसा गेलास लोटोनी तयां दुःखार्णवीं आज ?"

टिळकांबद्दल इतका आदर वाटणाऱ्या गृहस्थांनाहि त्यांच्या धर्मान्तराबद्दल साशंक बनविलें त्याचें कारण धर्मान्तरें हीं केवळ ऐहिक फायद्यासाठींच होतात ही भ्रामक समजूत.

धर्म (किंबहुना जात) न सोडतां कसेंहि वागलें तरी चालण्यासारखें होतें. खुद्द टिळकांच्या म्हणण्याप्रमाणें ( ज्ञानोदय २३-१-१८९६ )—

> "पाहिजे तें करावें, पण जातीस चोरून करावें ह्या तत्त्वाचा अवलंब करणारे शेंकडो लोक दिसत आहेत.'बाबा, मांस खा, दारू पी ! पण चोरून पी आणि ख्रिस्ती होऊं नको !' असा उपदेश करणारे प्रत्यक्ष आम्हाला भेटलेले आहेत. जोंपर्यंत जात सोडली नाहीं तोंपर्यंत वाटेल तीं मतें असलीं, वाटेल तसा आचार असला तरी चालेल."

आणि ही स्थिति अजून बदललेली नाहीं. आतां तर उघड उघड दारूबाजी-चें समर्थन केलें किंवा मद्य-मांस-भक्षण चारचौघांत केलें, किंवा दुसऱ्यांच्या बायका पळविल्या तरी त्याच्याकडे डोळेझांक करण्यात येईल. पण आपल्या सच्च्या सदसद्विवेकाला स्मरून कोणीं धर्मान्तर केलें व कितीहि नीतिमत्त्वानें तो वागत असला तरी तें चालणार नाहीं. कारण धर्मान्तर म्हणजे शत्रुपक्षाला जाऊन मिळणें ही कल्पना !

अशा कल्पना उराशीं बाळगणाऱ्या टीकाकारांनीं असल्या पार्श्वभूमीवरून व ह्या पूर्वग्रहानें दूषित झाल्यावर टिळकांची संभावना अशी कां केली हें समजणें कठीण नाहीं. श्री. माडखोलकरांसारख्या नांवाजलेल्या टीकाकारानें टिळकांबद्दल काढलेले उद्गार पहा—

> "टिळकांच्या अभंगांतील हा प्रसाद आणि हें प्रेम पाहून कित्येकांना त्यांची गणना वारकरी संप्रदायाच्या संतकवींत करण्याचा मोह होतो"

इतकें कबूल केल्याबरोबर टीकाकाराचा एकदम तोल सुटतो. टीकाकार पुढें म्हणतात—

> "आचारानें टिळकांची गणना पुण्यचरित संतकवींच्या पवित्र परंपरेंत होईल कीं नाहीं देव जाणे ! परंतु विचारोच्चारांनीं तरी खचित होणार नाहीं."

कारण

> "ख्रिस्ताशिवाय हिंदुस्थानाचा उद्धार नाहीं, हे उद्गार ज्याच्या अंतःकरणां-तून बाहेर पडले त्याचें अंतःकरण इतर जगाच्या स्वार्थी संसारांत

घोंटाळत होतें हें स्पष्टच आहे. ज्याचे विचारोच्चार इतके किंवा त्याहूनहि कोते आणि संकुचित होते त्याची गणना—मग तो कितीहि ख्रिस्तपर प्रेमळ अभंग लिहो—संतकवींच्या संप्रदायात कालत्रयींहि होणें शक्य नाहीं."

आणखी हें पहा—

" 'हिंदुस्थान ख्रिस्ती होवो' अशी वाणी आज उच्चारणें म्हणजे केवळ अधम अनुदार वृत्तीनें हिंदु, मुसलमान व पारशी या तीन बंधुसमाजांचें अनिष्ट चिंतणें व अस्तित्व नाकारणें आहे. स्वार्थाचा इतका नीच मासला दुसरा क्वचितच सांपडेल." "हिंदुस्थान ख्रिस्तीस्थान होवो, अशी अभद्र वाणी उच्चारणें हा एक धर्मवेड्या अविचारी मनाचा क्षुद्र विकार आहे असें म्हणणें प्राप्त आहे."

पुढें कित्येक वर्षांनंतर टिळकांच्या कवितेच्या दुसऱ्या आवृत्तीवर अभिप्राय देतांना ह्याच टीकाकारांनीं तो अत्यंत अनुकूल दिलेला आहे त्यासंबंधीं वऱ्हाडचे एक प्रसिद्ध लेखक श्री. वा. ना. देशपांडे एका खाजगी पत्रांत म्हणतात, "कविपंचकांतील प्रतिकूल टीकेवरून या अत्यंत अनुकूल अभिप्रायावर श्री. माडखोलकरांनीं जें उड्डाण घेतलें तें त्यांच्या वाढत्या ज्ञानाचें व तज्जन्य उदार बुद्धीचें द्योतक आहे." ही गोष्ट खरी आहे. पण तरुण धर्माभिमानी ख्रिस्तीतर मनाची स्थिति टिळकांबद्दल कशी होते हें माडखोलकरांच्या ह्या 'तरुण'पणच्या लिखाणावरून दिसून येण्यासारखें असल्यानें वरील अवतरणें मुद्दाम दिलीं आहेत टिळकांची कविता ख्रिस्तेतर लोकांत मागें पडण्याचें हेंच कारण आहे. वरील लेखक आपल्या पत्रांत पुढें म्हणतात 'त्यांच्या धर्मविषयक कवितांमुळें त्यांची कविता इतकी मागें पडली असावी असें मला वाटतें.' त्यांना मागें ठेवण्याचे जाणूनबुजून प्रयत्न झाले असें जरी खात्रीनें म्हणतां आलें नाहीं तरी तें अगदींच अशक्य नाहीं. परंतु एक गोष्ट मात्र खात्रीनें झालेली आहे. व ती म्हणजे ख्रिस्तीतर समाजांतील लेखक-टीकाकारांच्या अंतर्मनात अशी पूर्वग्रहदूषित भूमिका तयार झालेली असल्यानें त्यांनीं टिळकांना द्यायला पाहिजे तें महत्त्व देण्याचें टाळलें आहे. त्यांत कांहींनीं जाणून बुजून, कांहींनीं गतानुगतिकत्वानें, तर कांहींनीं इतरांना भिऊन ह्या कार्यास हातभार लावला आहे."

श्री. माडखोलकरांच्या जिव्हारीं लागलेलें विधान— ' ख्रिस्ताशिवाय हिंदुस्थानाचा उद्धार नाहीं, ' हें टिळकांनीं कोणत्या मनःस्थितींत व कोणत्या परिस्थितींत केलेलें आहे हें जर माडखोलकरांनीं ध्यानांत घेतलें असतें तर **अंतःकरण दृश्य जगाच्या स्वार्थी संसारांत** घुटमळून गेलें असतांना टिळकांनीं तें केलें नव्हतें हें ध्यानांत येईल. टिळक ख्रिस्ती झाले हें शल्य माडखोलकरांना व इतरांना बोचतें तें, ते दुसऱ्या समाजांत त्यांनीं **भर टाकली** व तो दुसरा समाज आपला **शत्रु आहे** ह्या भ्रामक समजुतीमुळें! धर्मान्तर म्हणजे देशान्तर नव्हे, धर्मान्तर म्हणजे संस्कृत्यतर नव्हे, धर्मान्तर म्हणजे समाजान्तरहि नव्हे ही गोष्ट त्यांना खरीच वाटत नाहीं. धर्म बदलणें म्हणजे देश बदलणें हीं भावना त्यांच्या हाडींमांसीं इतकी खिळली आहे कीं कांहीं कांहीं बाबतींत त्यांना उघड उघड नास्तिक किंवा आपल्या वर्तनानें व शब्दांनीं स्वतःच्या धर्माची पदोंपदीं विटंबना करणारा इतर कोणीहि चालेल पण ख्रिस्ती मनुष्य त्यांना आपला हाडवैरी वाटेल टिळकांच्या दृष्टीनें ख्रिस्ती धर्म म्हणजे काय व ख्रिस्ती होणें म्हणजे काय ह्याचें जर ह्या टीकाकारांना आकलन झालें असतें तर त्यांनीं आपल्या लेखण्यांत इतकें विष भरलें नसतें.

ख्रिस्ती धर्मासंबंधानें टिळकांनीं ८–७–१९१५ च्या ज्ञानोदयांत खालीं दिलेलें स्फुट लिहिलें आहे :—

" सबंध नव्या करारांत ' धर्म ' हा शब्द दोनतीन वेळांच आला असून तो इतर धर्मांचा उल्लेख करताना योजिलेला आहे प्रभु येशू ख्रिस्तानें हा शब्द एकदासुद्धां उच्चारलेला नाहीं यहुदी धर्माला धर्माचें, म्हणजे अंधविश्वासानें बनविलेल्या व सांवरून धरिलेल्या नुसत्या औपचारिक **कर्मकांडाचें** स्वरूप आलेलें पाहून प्रभूला पराकाष्ठेचें दुःख होत आहे प्रभु साधारण जनतेचा किंवा पाप्यांचा निषेध करीत नाही. त्याच्या निषेधाचा सारा मोर्चा या असल्या धर्माच्या पुरस्कर्त्यांकडे—शास्त्री आणि परोशीयांजकडे फिरलेला आहे. **धर्म म्हणजे जीवन हें जगाला शिकवावें हाच ख्रिस्ताच्या अवताराचा हेतु** असून आज दोन हजार वर्षे हाच हेतु व्यक्तीच्या, समाजाच्या आणि राष्ट्राच्या बाबतींत न्यूनाधिक प्रमाणानें साऱ्या पृथ्वीवर सफळ होत आहे आणि होईल.

'असें असून आपणास ख्रिस्ती म्हणविणारे कितीतरी लोक ह्या जीवनाचा एक विशिष्ट धर्म करून बसले आहेत.. **हे इतके (लोक) ख्रिस्ताच्या हेतूचे आणि ख्रिस्ताचे हितशत्रु आहेत असें म्हणायला आम्हाला मुळींच दिक्कत वाटत नाहीं.** ... पति, पिता, शेजारी, मित्र, स्वामी, सेवक, नागरिक सारांश कोणत्याहि नात्यानें आणि कोणत्याहि परिस्थितींत ख्रिस्ती मनुष्य असो, तेथें तो आणि ख्रिस्त अभिन्न दिसणार नाहीत, म्हणजे तेथें त्याचें जीवन ख्रिस्त झालेलें नसेल, तर त्याचें ख्रिस्तीपण व्यर्थ आहे."

टिळकांच्या कांहीं कांहीं अभंगांत ह्याच विषयावर त्यांनीं अधिक तळमळून लिहिलेलें दिसतें.

"मज ख्रिस्तीधर्म कुठें आहे सांगा। नका येऊं रागा विनवीतों
नव्हे ख्रिस्ती धर्म हा तो योगपूर्ण। होय अवतीर्ण जगामाजीं
देवबाप ख्रिस्त आणि तुम्हीआम्ही। समाधीच्या धामीं विराजलों
म्हणा आम्हा ख्रिस्ती किंवा म्हणूं नका। आम्हा न ठाऊका भेदभाव"

किंवा—

सोडिली मीं जात, जात निर्मावया। असें देवराया न हो कधीं
सोडिलें सोंवळें, सोंवळें नेसाया। असें देवराया न हो कधीं
सोडिला मीं धर्म, धर्म जोडावया। असें देवराया न हो कधीं
× × × ×
दास म्हणे बापा तुझें मी लेंकरूं। शिकवीं हें करूं नातें खरें"

'लोकबंधु प्रभु येशू ख्रिस्त' ह्या आपल्या पुस्तकांत टिळक म्हणतात—

"एखादा नवा धर्म स्थापित करून जगांत असलेल्या बऱ्यावाईट धर्मांत आणखी एका धर्माची भर टाकावी असला हेतु प्रभु येशू ख्रिस्ताच्या अंतःकरणाला कधीं शिवलासुद्धां नाहीं. (मत्तय ५ १७, १८) तो समाजसुधारकहि नव्हता. त्याचा राजकारणाशींहि कांहीं संबंध नव्हता तो व्यक्तीव्यक्तींच्या अंतःकरणांत 'देवाचें राज्य,' घरोघर 'देवाचें कुटुंब' आणि राष्ट्राराष्ट्रांत 'देवाचा दरबार' स्थापित करावा म्हणून ह्या जगांत आला."

(पान २५) " प्रभु येशू ख्रिस्ताच्या संदेशाचा अर्थ असा होता, कीं यापुढें मनुष्याचें मोल मनुष्याला कळेल आणि क्रमाक्रमानें सर्व प्रकारची गुलामगिरी नाहीशी होईल. जगांत लोक नांवाची एक अत्यंत भव्य, जिच्यावर ईश्वराचा निरंतर पूर्ण अनुग्रह आहे अशी सत्ता उभी राहील, पत्नीचें दास्य नष्ट होऊन ती खरी खरी गृहराज्ञी बनेल व आपला मंत्रि जो पति त्याच्या साहाय्यानें गृहाचा स्वर्गसोपान बनवील.....यापुढें देशाभिमानाची जागा देशप्रेमाला मिळेल, अधिकार हें सेवेचें दुसरें सन्मानदर्शक नांव बनेल जगाचा कल विग्रहाकडे न राहतां संग्रहाकडे वळेल व विश्वकुटुंब ही नुसती कल्पना नसून इतिहासाचें अंतिम कार्य आहे अशी मनुष्याची खात्री होईल." ( पान २१ )

परंतु महाराष्ट्रांत टिळकांची योग्यता जाणणाऱ्यांचा अगदींच दुष्काळ पडलेला नव्हता व धर्मभेदामुळें सगळेच अंध बनले नव्हते ह्याचा पुरावा श्री. रेंदाळकर ह्यांनीं 'धर्मविचार' मासिकांत 'वनवासी फूल' ह्या काव्यावर दिलेल्या अभिप्रायांत मिळतो :—

" टिळक यांची कवितावधू अरण्यात वाढलेल्या निसर्गरमणीय शकुंतलेसारखी आहे. तिचें अंतरंग पवित्र असून सरळ आहे. तें इतकें सरळ आहे, कीं लौकिकदृष्ट्या त्यांत कित्येक स्थळीं वेडेपणाची झांकहि दिसून येते व आपल्याबरोबर वाचकांसहि ती वेडें करून सोडते' प्रकृत कवीच्या वाणींत एक प्रकारचें विलक्षण माधुर्य असून तें अवीट आहे. कल्पनाप्रवाह इतका जोरदार आहे, कीं वाचकांस बाह्य जगाची क्षणभर विस्मृति पडते. केशवसुतांप्रमाणें टिळकांचीहि कविता **आशा** आणि **आनंद** यांचा लाभ वाचकांस करून देते. हें काव्य ( वनवासी फूल ) केवळ वाचून टाकण्याच्या कोटींतील नव्हे. यांतील विचार केवळ बुद्धिचपलतेचे द्योतक नसून आचरणांत आणतां येण्यासारखे आहेत, कवीच्या पवित्र मानससरोवरांतून वहात चाललेली ही कल्पनासरिता अनेक पापी मनुष्यांस सुखवीत जात आहे गीता जितकी काव्य तितकेंच हेंहि काव्य आहे. या काव्याची भाषा मधुर, शब्द उचित, आणि रचना सरळ, बाळबोध आहे. विजयाचा समारोपहि मोठ्या

मजेनें केला आहे. मधून मधून गोंविलेले उदात्त विचार मनास तन्मय करून सोडतात, आणि कल्पना अत्यंत हृदयंगम आहे. त्यांनीं (टिळकांनीं) सर्व कवींत **टिळक** होऊन आपलें नांव सार्थ करावें, अशी प्रेमाची सूचना करून आम्ही मोठ्या प्रेमानें या प्रेमळ कवीची रजा घेतों."

टिळकांच्या पंचविसाव्या स्मृतिदिनानिमित्त ज्ञानप्रकाशांत प्रा वि. बा आंबेकर ह्यांनीं लिहिलेल्या एका लेखांतलि कांहीं भाग खालीं देत आहें त्यावरून दिसून येईल, कीं त्या पंचवीस वर्षांच्या कालावधींत टिळकांच्या बाबतींत पूर्वग्रहदूषितता सोडून लिहिणारे आणखीहि लोक पुढें आले होते.

प्रा. आंबेकर म्हणतात—

" धर्म आणि अध्यात्मवाद यांचा भर त्या काळांत विशेष होता हें ध्यानांत घेतलें तर त्या वेळच्या सर्व कार्यकर्त्यांच्या प्रयत्नांची आणि मनोरचनेची कल्पना करण्यास पुष्कळसें सांहाय्य झाल्याशिवाय राहणार नाहीं. रानडे—भांडारकरांना प्रार्थनासमाज स्थापण्याची आवश्यकता घटावी, लो. टिळकांना गीतारहस्य लिहावेसें वाटावें, राजकारणाचा प्रपंच धर्मबुद्धिच्या पावित्र्यानें केला जावा असें गोखल्यांनीं म्हणाव, रामदासकालाप्रमाण आजाहे एका राष्ट्रधर्माचें पुनरुत्थान व्हावें असें राजवाड्यांनीं प्रतिपादन करावें, हरिभाऊंनीं कर्मयोग यासारखी कादंबरी लिहावी, पांगारकरांना संतवाङ्मयानें वेडें करावें, शिवरामपंत परांजप्यांनीं हिंदुधर्माचा अभिमान उद्दीपित करावा, असले त्या काळचे वैयक्तिक व सामाजिक उद्योग पाहिले म्हणजे एकंदर वातावरणाची कल्पना करता येईल........धर्मभावनेची व धर्मजिज्ञासेची अनिवार व अतृप्त लालसा त्या वेळीं प्रत्येकाच्या मनावर परिणाम केल्याशिवाय राहिली नाहीं कविवर्य टिळक यांनीं धर्म व अध्यात्म यांचा अभ्यास करितां करितां शेवटीं वयाची तिशी पार पडतांना खिस्ती धर्मपंथ स्वीकारिला, त्याचें कारण वैयक्तिक लहर हें नसावें तर तो एक सामाजिक वातावरणाचा परिणाम असावा असें मानण्यास पुष्कळ जागा आहे यांत शंका नाहीं.

"—या सर्वांवरून तत्कालीन व इतर अनेक विचारी कार्यकर्त्यांप्रमाणें त्यांनीं धर्म ही एक कल्पना सामाजिक व राजकीय उद्धारासाठीं आवश्यक मानली होती व तिच्या आहारीं जाऊन त्यांनीं आपल्या कल्पनेप्रमाणें सामर्थ्यानुरूप जनसेवेचे प्रामाणिक मार्ग आंखले असे म्हणणेंच विशेष सयुक्तिक व न्यायाचें होईल "

टिळकांच्या धर्मान्तरानें त्यांना "दृश्य जगाच्या स्वार्थी संसारांत" कांहीं फायदा झाला नाहीं हें सूर्यप्रकाशाइतकें स्पष्ट झालेलें आहे कोणताहि ऐहिक फायदा नसता—उलट श्री. राजाध्यक्ष म्हणतात त्याप्रमाणें सामाजिक बाबतींत अस्पृश्य म्हणून झालेली ओढाताण सहन करून—व ती होणार हें माहीत असून—त्यांनीं धर्मान्तर केलें.( पान २२ परिच्छेद २ पहा )राजाच्या कोपापेक्षां समाजाचा कोप सहन करणें अधिक कठीण असतें. आपल्याला पटलें तें कोणाचें भय न धरता अंगिकारणें ह्याला केवढें अलोट धैर्य लागत असेल ह्याची कल्पनाच करावी. त्या वेळचे सामाजिक अन्याय दूर करायला धर्मातच आमूलाग्र बदल व्हायला पाहिजे ही खात्री पटतांच टिळकांनीं एका नवीन धर्मस्थापनेची तयारी चालवली व आपल्या नव्या धर्माची संपूर्ण रूपरेषा तयार केली. परंतु आपण बनविणार असेला धर्म पूर्णांशानें अस्तित्वांतच आहे हें जेव्हां त्याना दिसलें तेव्हां नूतन धर्मस्थापनेच्या कल्पनेचा त्याग करून शिवाय एका धर्मस्थापकाचा मान झुगारण्यांत त्यांनीं अलोट धैर्याबरोबर कमालीचा स्वार्थत्यागहि दाखविला आहे. ( परिशिष्ट २ पहा )

हा धर्मत्याग व स्वार्थत्याग म्हणजे त्यांची केवळ 'वैयक्तिक लहर' किंवा विक्षिप्तपणा हीं नव्हतीं. तशीं ती असतीं तर ख्रिस्ती झाल्यानंतर जी स्थिरता त्यांच्या अंगीं भिनलेली दिसते ती दिसली नसती आयुष्याच्या पूर्वार्धांत त्यांच्या अंगीं दिसणाऱ्या अस्थिरतेचा मागमूसहि उत्तरार्धांत राहिला नाहीं. जर हीं केवळ वैयक्तिक लहर किंवा विक्षिप्तपणा असतीं तर ते पुन्हा मुसलमान नाहींतर लर्स्पुंजी बनले असते. नाहींतर पुन्हा हिंदु तरी झाले असते.

" एकनाथांच्या काळांत मराठींत ग्रंथरचना करणें हा अन्याय समजला जात असे.रामदासांच्या आणि तुकारामांच्या काळांत हिंदूंनीं राजकारणाचे डाव टाकणें

किंवा शूद्रानें वेदान्तचर्चा करणें हा अपराध समजला जात असे, परंतु ह्या तिन्ही श्रेष्ठ पुरुषांनीं हीं जुलमी बंधनें झुगारून देऊन आत्मतेजाचा बाणा मिरविला व आपल्या काळांत त्या त्या क्षेत्रांत क्रान्ति घडवून आणली " (तुतारीचे पडसाद) आपल्या काळांत धर्मान्तर करून, धर्मान्तर म्हणजे देशान्तर नव्हे, धर्मान्तर म्हणजे संस्कृत्यन्त नव्हे व धर्मान्तर म्हणजे समाजान्तरहि नव्हे हें एक तत्त्व आचरणांत वठवून तें ख्रिस्ती व ख्रिस्तीतर लोकाच्या गळीं उतरविण्यासाठीं ते झगडले. केवढें हें क्रान्तिकारक तत्त्व आहे ! ही क्रान्ति ...

भारतांतील जातिभेदाबरोबर धर्मभेदहि नाहींसे होतील व भारतीय तेवढा एक हीच प्रमुख भावना कायम राहील "The experience of each new age requires a new confession and the world seems always waiting for its poet" येथें 'poet' च्या जागीं 'prophet' – 'संदेष्टा' – असा शब्द घालून हें इमर्सनचें वाक्य टिळकांना लागू करतां येईल. टिळक हे प्रामुख्यानें भक्तकवि होते व ... उल्लेखलेल्या भक्तकवींप्रमाणें ते एक क्रान्तिकारक 'संदेष्टे' होते.

धर्मान्तर म्हणजे संस्कृत्यन्तर नव्हे ह्या कल्पनेनेंच टिळकांनीं हिंदु संस्कृतीला आपला पहिला 'जुना करार' म्हटलें आहे हें जर श्री विष्णु मोरेश्वर महाजनांना माहीत असतें तर त्याना टिळकांची "हीं निःश्वासितें —" वगैरे पद्यपंक्तींतील विचार खटकले नसते महाजनांना आश्चर्य वाटतें, कीं—

> "यस्य निःश्वसित वेदाः" हें वेदवाक्य झुगारून ज्यांनीं वेदाना धिक्कारिलें (महाराष्ट्र साहित्यपत्रिका वर्ष २:२ पान १८) त्यांनींच असें कसें म्हणावें ?"

पण महाजनांना हें माहीत नाहीं, कीं टिळक वेदांना धिक्कारीत नसून त्याना आपला जुना करार समजतात व त्यांतच त्यांचें द्रष्टेपण आहे.

टिळक हे प्रामुख्यानें भक्तकवि होते. आपला प्रसिद्ध अभंगाञ्जलि लिहिला त्याच्या कितीक वर्षें आधीं त्यांनीं म्हटलें होतें—

> आतां रसज्ञानो विनंती तुम्हाला । मला निरोप्याला सांभाळावें
>
> निरोप जयाचा पहा त्याच्याकडे । नका माझ्याकडे ...

आणि हे अभंग लिहितांना —

नको बळ व्युत्पत्तीचें । नको साहित्यशास्त्राचें ॥ असें त्यांनीं म्हटलें आहे. तुकाराम महाराजांप्रमाणें "आपुलिया बळें नाहीं मी बोलत सखा कृपावंत वाचा त्याची." अशी त्यांची श्रद्धा होती.

नदी पात्रांतुन धावती । पात्र केवळ थोंडेमाती
मी तों भिकारी भिकारी । तुझा आत्मा सारें करी ॥

आणि

कार्य आमुचें हें बाप्पांचें । व्हावें एक कुटुंब जगाचें ॥

अभंगाञ्जलीची ही प्रस्तावना त्यांनीं सोळासतरा वर्षें आधीं गायिली होती ह्या मधल्या काळांत त्यांनीं भक्तिरसानें ओथंबलेलीं अशीं दोनशेंअडीचशें पद्यें रचलीं.

त्यामुळें "शेवटच्या **पांच** वर्षांत त्यांची धार्मिक बुद्धि बळावून तिनेंच त्यांचा सर्व काव्यप्रदेश व्यापून टाकला आणि टिळकाची कविता पुन्हा उलट खाऊन ओवी व अभंग ह्या साध्या मराठी वृत्तांत आणि जुन्या कवितेचा केवळ आत्माच अशा भक्तिरसांत रमली" हें श्री रामचंद्र महादेव मराठे ( अर्वाचीन मराठी वाङ्मयसेवक पान २९६ ) ह्यांचें विधान लंगडें पडतें.

वर दिलेले अभंग त्यांच्या 'प्रभूची प्रार्थना' नांवाच्या ६१ अभंगांच्या पुस्तकांतील आहेत. हे १९०१ च्या सुमारास लिहिले जाऊन १९०३ मध्यें पुस्तकरूपानें प्रसिद्ध झाले त्यांत टिळकांनीं म्हटलें आहे—

"तुला आळवितां उम्हाळे येतील । भक्तीचे होतील अभंग ते"

परंतु टिळकांच्या ह्या कवितेची साधारण वाचकांना ओळख नाहीं— तसें म्हटलें तर टिळकांचीहि ओळख नाहीं. कारण इतकीं भक्तिरसपरिप्लुत शेकडों गीतें लिहिणारे टिळक हें सारें ढोंगानेंच लिहीत होते असा शोध लावणारे टीकाकारहि आढळतात ' 'काव्यचर्चा' नावाच्या भारदस्त पुस्तकांत ह्या गीतांना 'लटका भाव आणणारीं दांभिक गीतें' किंवा 'ही अभंगरचना म्हणजे भक्तिरसाचें उत्कृष्ट निर्जीव चित्रच' म्हणण्यास कमी केलें नाहीं. ( पान २५३ )

टिळकांची खरी कविता म्हणजे त्यांनीं भक्तीचे उम्हाळे येऊन लिहिली ती. पण ती कविता मराठी वाचकांपुढें नाहीं, कोणीं बळें आणण्याचा प्रयत्न केला तर पूर्वग्रह आड येतो. ही कविता टिळकांची नसून दुसऱ्या कोणा भक्ताची आहे असा आभास उत्पन्न झाल्यावर मग मात्र हे माना डोलवून त्या कवितेचा आस्वाद घेतील. एकदोन असे प्रत्यक्ष प्रसंग घडलेले आहेत.

परलोकवासी हरिभक्तिपरायण लक्ष्मण रामचंद्र पांगारकरांची गोष्ट ऐक-ण्यासारखी आहे. कवि सोपानदेव चौधरी ह्यांनी एकदा बुवांना टिळकांची "**पुष्कळ अजुनी उणा**" ही कविता म्हणून दाखविली. बुवा ती ऐकत असतां इतके तल्लीन झाले, कीं ते डोलूं लागले. त्यांना वाटलें कोणा जुन्या संत कवीची ही कविता असावी. त्यांनीं तसें चौधरींना बोलून दाखविलें. परंतु जेव्हां चौधरींनीं त्यांना ही कविता टिळकांची आहे असें सांगितलें तेव्हां त्यांना आश्चर्य वाटलें व मोठा आनंद झाला. त्यानंतर त्यांनीं चौधरींकडून टिळकांच्या आणखी कित्येक भक्तिरसप्रधान कविता म्हणवून घेतल्या.

प्रो. माधदेव म्हणतात —

> "वर्ण्य विषयाच्या अंतरंगात टिळक शिरूं लागले म्हणजे त्यांचें हृदय, शांत अशा समयीं उन्हांत लीलेनें तळपणाऱ्या नृत्यप्रिय अशा लहरींप्रमाणें चमकतांना, हलतांना, खेळतांना दिसतें. त्या वेळेस त्यांना आपण ख्रिस्ती, आपण पंडित, आपण टिळक ही भावनाहि शिवत नाहीं — अशाच समाधींत टिळकांची बरीच कविता लिहिलेली आहे." (काव्यचर्चा : २४५)

पण माडखोलकरांना वाटतें कीं —

> "टिळकांच्या कल्पनेचें आकाश धर्माभिनिवेशाच्या टप्प्यावर हटकून टेक-लेलें दिसतें आपण कोणत्या धर्माचे आहों याचा विसर त्यांना कधींच पडला नाहीं." (काव्यविचार ११)

टिळकांच्या '**असा सदा संयोग असावा । चंद्र-चंद्रिका यांत जसा**' ह्या सुप्रसिद्ध गीताला त्यांच्या इतर कांहीं अभंगांबरोबर 'त्रिदल' नांवाच्या एका कवितेच्या पुस्तकांत, एका कवयित्रीच्या नावाखालीं प्रसिद्ध होण्याचा मान मिळाला आहे. '**ख्रिस्ता ख्रिस्ता प्राणविसाव्या**' ह्या शब्दांच्या ऐवजीं 'श्री ज्ञानेशा'चें नांव घालून बाकी मजकूर आहे तसा ठेवला आहे. आणि ह्या काव्याची एऱ्हवीं ज्या टीकाकारांनीं कांहीं कदर बाळगली नसती त्यांनाच तीं एका हिंदु बाईच्या नांवाखालीं प्रसिद्ध होतांच गोड वाटल्याचा लेखी पुरावा त्रिदलावर अभिप्रायाचें एक पुस्तक प्रसिद्ध झालें आहे त्यांत सांपडेल ह्या अभिप्रायाच्या दगडाखालीं महाराष्ट्रांतील थोर थोर वाङ्मयिकांचे हात अड-कल्याचें दिसून येईल.

टिळकांची खरी योग्यता न कळण्याची दोन प्रमुख कारणें घडलीं आहेत. एक, त्यांच्याविषयीं विचार करतांना त्यांच्या धर्मान्तरामुळें बनलेली पूर्वग्रहदूषित मनोवृत्ति व दुसरें 'केशवसुत संप्रदाय' म्हणून ओळखला जाणारा बागुलबुवा ( Bogy ).

'टिळकांची कविता' न वाचताच कित्येकांनीं टिळकांचें स्थान ठरवून टाकलें ! माझें हें म्हणणें धाष्टर्यानें वाटेल परंतु हातच्या कांकणाला आरसा लागत नाहीं. 'टिळकांची कविता' ह्या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या फक्त एका पुस्तकांतील कवितांखेरीज दुसऱ्या कवितांचा उल्लेख कितीशा टीकाकारांच्या टीकेंत येतो ? टिळकांची कविता म्हणजे त्या पुस्तकांतील ८२ स्फुटें आणि वनवासी फूल, बापाचे अश्रु, सुशीला, आणि माझी भार्या हीं खंडकाव्यें इतकीच नव्हे. टिळकांच्या कवितेंत अभंगाञ्जलींतील ३५६ अभंग येतात, भजनसंग्रहांतील सरासरी १०९ भजनें येतात, प्रभूच्या प्रार्थनेंतील ६१ अभंग येतात, उपासनासंगितांतील २५२ गीतें येतात. त्यांच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या बालोद्यानांतील लहानमोठीं ८६ बालगीतें येतात, ह्या व ह्याशिवाय निरनिराळ्या मासिकांतून व वर्तमानपत्रांतून एकएकदा प्रसिद्ध होऊन गेलेल्या कविता मिळून सरासरी १५०० स्फुटें निघतील ख्रिस्ती होण्यापूर्वींचीं, (पहिलें) बापाचें अश्रु, देवीचा प्रसाद तसेंच त्यांचें संपूर्ण कवितेस वाहिलेलें काव्यकुसुमाञ्जलि मासिक हीं हिशोबांत धरलीं नाहींत. शिवाय ख्रिस्तायनांतील ११ अध्याय म्हणजे सरासरीनें १५०० ओवी हीहि हिशोबांत धरली नाहीं. हीं सर्व लक्षांत घेतां टिळकांच्या १⁄२० कवितेपेक्षांहि कमी कविता वाचून हे टीकाकार त्यांचें स्थान ठरवायला पुढें सरसावतात ! आणि केशवसुत सांप्रदायाचा बागुलबुवा उभा करतांना व त्या संप्रदायांत आळेंपळें टिळकांना कोंबतांना किंबहुना त्यांना केशवसुतांच्या पट्टशिष्यत्वाची दीक्षा देतांना टिळकांच्या इतर कवितांकडे काणाडोळा करणें ह्या टीकाकारांना भागच आहे.

आपले स्तुतिपाठक टिळकांचे हे हाल करीत असलेले पाहून खुद्द केशवसुतांचा आत्मा तळमळत असेल असें मला वारंवार वाटतें.

टिळक जर ख्रिस्ती नसते तर त्यांच्यावर हा प्रसंग येता ना असेंहि मला पुष्कळदा वाटतें. टीकाकार पूर्वग्रहदूषित मनानें—आणि अगदीं न कळत; त्यांचीं अंतर्मनेंच तशा धाटणीचीं बनल्यानें—टिळकांच्या बाबतींत स्तुतियोग्य

असें कांहीं दिसलें तर तेथें ती केशवसुतांची केलेली उसनवारी आहे असा आभास उत्पन्न करूं शकतात. टिळकांच्या बंडखोरीचा आवेश माडखोलकरांना 'ल्टका' वाटतो ( काव्यचर्चा पृष्ठ १९२ ) तो ह्यामुळेंच.

टिळकांच्या बाबतींत इतका अन्याय होत गेलेला आहे, कीं 'प्रेमविषाचा प्याला म प्याला' व 'टिमकीवाला हा कली पहा अवतरला' ह्या टिळकांच्या दोन कविताच एकदा केशवसुतांच्या काव्यसमूहांत त्यांच्या चाहत्यांनीं कांहीं चौकशी न करता दडपून टाकल्या होत्या.

## टिळक व केशवसुत

ठोमरे किंवा दत्त ह्यांच्या संबंधीं टिळकांना जसा वात्सल्ययुक्त स्नेह वाटे तसाच किंवा थोडा अधिकच केशवसुतांसंबंधीं वाटे हे तिघेहि कवि टिळकांपेक्षा वयानें पुष्कळ लहान होते. टिळकांची व केशवसुतांची नागपुरास प्रथम गांठ पडली तेव्हां केशवसुत १७ वर्षांचे व टिळक २१ वर्षांचे होते. केशवसुत आपल्या पौगंडावस्थेंत ( age of adolescence ) होते, तर टिळक तींतून बाहेर पडले होते. ( भेट १८८३ः केशवसुत जन्म १८६६; टिळक जन्म १८६२ ) त्यांची गांठ प्रथम १८८३ सालीं पडली हें खुद्द टिळकांच्या एका श्लोकार्धावरून दिसून येतें ( कविता परिशिष्ट पान सहा ) १९०६ सालीं केशवसुतांवर लिहिलेल्या ह्या शोकगीतांत टिळक म्हणतात—

> झालीं आतां हळु हळु तथा पूर्ण तेवीस वर्षें
> जेव्हां तूं मीं बसुन कविता गाइल्या रम्य हर्षें

शिवाय केशवसुतांचे बंधु श्री. सीतारामपंत केशवसुतांच्या कवितेला लिहिलेल्या प्रस्तावनेंत म्हणतात, कीं १८८२ सालीं बडोद्यास व नंतर नागपुरास ते आले

> "नागपूर येथील ६/७ महिन्यांच्या निवासामध्यें केशवसुत यांना सुप्रसिद्ध कवि नारायण वामन टिळक यांच्या ओळखीचा व मैत्रीचा लाभ घडला .. केशवसुतांच्या कवित्वशक्तीला प्रथम चालना कै नारायण वामन टिळक यांच्या सहवासानें व संगतीनें मिळाली असें केशवसुत हे माझ्याशीं कधीं कधीं बोलल्याचें मला स्मरतें " ( पान ७ )

श्री. सीतारामपंत दामले हे इंग्रजी, संस्कृत व मराठीचे फार चांगले मर्मज्ञ असून वकील होते. केशवसुतांचे दुसरे बंधु प्रा. मोरो केशव दामले एम्. ए. ह्यांनी दिलेल्या माहितीवरून काव्यरत्नावलींत (१९०५) 'सालअखेर' ह्या शीर्षकाखालील संपादकीय लेखांत म्हटलें आहे.—

"सन १८८३ सालीं हे आपल्या मामांकडे नागपुरास तीनचार महिने होते. तेथें, हल्लीं ख्रिस्ती झालेले प्रसिद्ध कवि नारायण वामन टिळक यांचा सहवास घडला त्या वेळीं त्यांच्यांत कवितेचा उद्गम व स्फूर्ति दिसूं लागली पुढें हे पुण्यांत न्यू स्कूलमध्यें अभ्यासास राहिले तेथें इंग्रजी काव्यें त्यांनीं पुष्कळ वाचलीं व तेव्हांपासून हे कविता लिहिण्यास लागले"

श्री. सी के. दामले म्हणतात—

"वयाच्या १४/१५ वर्षांपासून त्यांना चांगले श्लोक व आर्या रचतां येत असत."

म्हणजे टिळकांची व त्यांची गांठ पडली (१८८३), त्याच्या आधीं २/३ वर्षें ते कविता लिहूं लागले होते व टिळकांच्या ६/७ महिन्यांच्या सहवासानें त्यांच्या कवित्वशक्तीला 'टिळकांच्या सहवासानें' 'स्फूर्ति' व 'चालना' मिळाली

वरील विधानें खुद्द केशवसुतांच्या बंधूंचीं आहेत. हे उभयतां बंधु बुद्धिमान् व चांगले शिकलेसवरलेले होते हेंहि लक्षांत घ्यावें.

'कुमारांचा साथी' कर्ते श्री. य. गो. नित्सुरे म्हणतात "युवकांचें वय (म्हणजे एकवीस वर्षें) नुकतेंच ओलांडल्यापासून तिशीच्या आसपास असणा-ऱ्यांना 'तरुण' ही संज्ञा देणें योग्य होईल." म्हणजे टिळक त्या वेळेस तरुण होते तर केशवसुत 'कुमार' होते श्री. नित्सुरे ह्यांच्या म्हणण्याप्रमाणें 'कुमारा'ची स्थिति अशी असते—

"बाल व प्रौढ यांच्यामध्यें उपेक्षेचें जिणें तो आज कंठीत आहे. आपण कोणत्या आश्रमांत (म्हणजे जीवनावस्थेंत) आहों व आपल्या आयुष्याचें

ध्येय कोणतें आहे याची त्याला स्पष्ट जाणीव नाहीं. कधीं तो बालाप्रमाणें वागतांना दिसतो, तर कधीं प्रौढाप्रमाणें वागतांना दिसतो." (पान ३)

अशा अवस्थेमध्यें असताना केशवसुत टिळकांच्या सान्निध्यांत आले होते, व त्यानंतरच "त्यांच्यांत कवितेचा उद्गम व स्फूर्ति दिसूं लागली" हें ध्यानांत ठेवल्यास केशवसुतांच्या कवित्वांत टिळकांचा केवढा हात होता ह्याची नीट कल्पना येईल.

दि १०-४-१९१० रोजीं लक्ष्मीबाईंना लिहिलेल्या एका खाजगी पत्रांत टिळक म्हणतात: (स्मृतिचित्रें भाग १ टिळकांचें हस्ताक्षर)

> "रा साठे, भास्कर, ठोमरे किंवा प वा पाटे, केशवसुत ह्यांच्या कवितांचें कौतुक करणाराच तुमच्या कवितेचें कौतुक करीत आहे ह्यांत नवल कोणतें? मी कोणाची उगीच प्रतिष्ठा वाढवीत नाहीं... मी काव्याच्या बाबतींत साऱ्या जगाचें साह्य करीत आलों आहें."

आणि ज्यांनीं ज्यांचें त्यांनीं ह्या बाबतींत साह्य केलें ते ते त्यांना आपले आप्तस्वकीय वाटत

५/७ महिन्यांच्या सहवासात दोघेहि कवि एकमेकांना आपल्या कविता वाचून दाखवीत केशवसुतांनीं आपल्या काव्यांनीं आपणासहि मागें टाकावें अशी प्रेमळ इच्छा टिळकांनीं खालील कवितेंत व्यक्त केली आहे:

> "ये ये कृष्णा! चढव अपुला सूर जो भौतिकाला
> वेंधी, जाई वरति वरतीं भेदुनी अंतराळा
> टाकीं मागें मज बघुं सख्या गाउं मे एकवार
> नाही माझी तुजविण कुणी हौस ही फेडणार"

टिळकांच्या हस्तलिखितांत खालील कविता मजजवळ आहे. तीवर K. K. Damle 17-7-96 असा इंग्रजींत मजकूर आहे.

> शहाणा-वेडा, अल्प-थोर, दोन्ही। कवी हा खराच जन्मोनी ॥ध्रु०॥
> झऱ्याच्या ताला रात्रंदिन धरुनी। कोकिल गातो मधुर वनीं ॥
> फुलांसह हासे, डोले कीं भुलुनी। द्रववी गिरिला मधुवचनीं ॥१॥

सांवलीमार्गी, धावे ये म्हणुनी । दावितो हस्तीं उचलोनी ॥
नवोन्नतदुर्गी, कवितासद्म वसुनी । चतुर्दश दृष्टि नेई भुवनी ॥२॥
रंग व्योमाचे हृद्या उघडोनी । दावितो अतुल्या निल जनीं ॥
प्रीति-शांतींच्या मूर्ति रम्य रचुनीं । नाचवी मार्गी नव म्हणुनीं ॥३॥
युवायुवती का बालतनू धरुनी । नाचतो कामरूप सुजनीं ॥
झिंगला फेला, सृष्टिरत्त फिरुनी । सोडिना रात्रंदिन करनीं ॥४॥

ह्या कवितेवरून टिळकांचें केशवसुतांवर केवढें प्रेम होतें तें दिसून येईल.

श्री. श्रीधर विनायक वर्तक आपल्या 'तुतारीचे फडसकर' ह्या पुस्तकांत म्हणतात. (पृ० १२१)

" महाराष्ट्रांतील त्या वेळचे श्रेष्ठ कवि रे. टिळक यांनी म्हटलें आहे—

'गात गात तो मावळला गात गात उदया आला'
'केशवसुत करि गानातें आम्हां मातें सांगातें'
'कविता गाया, कृष्णानें जी शिकवीली'

रे. टिळकांची केशवसुतांसंबंधींची स्तुति पाहिली म्हणजे मन थक्क झाल्याशिवाय राहात नाहीं. स्वतः श्रेष्ठ कवि असूनहि ते केशवसुतांची मुक्तकंठानें स्तुति गातात. "

त्यांत नवल कसलें? श्रेष्ठत्वाचें खरें लक्षणच आहे तें! केशवसुत, बालकवि, दत्त—इतकेंच काय पण ज्या गोविंदाग्रज कवींच्या सहवासानें टिळक व लक्ष्मीबाईसंबंधानें बालकवींच्या वृत्तींत संशय व चलबिचल निर्माण होत असे त्या गोविंदाग्रजांसंबंधींहि टिळकांनी प्रेम व आदरबुद्धीच व्यक्त केलेली आढळते.

'काव्यरत्नावलींत (१९१७ जानेवारी ते मार्च) केशवसुतांच्या २२ कविता पुनर्मुद्रित केलेल्या असून त्यास टिळकांची एक लहानशी प्रस्तावना आहे. तींत ते म्हणतात—

"केशवसुतांच्या प्रतिभेची वाढ कसकशी होत गेली हें लक्षांत येण्याइतका मला त्यांचा सहवास घडला आहे. इ. स १८८३ सालीं नागपुरास, इ. स. १८८८ किंवा १८८९ सालीं पुण्यास, व. १८९५-९६ सालीं मुंबईस आम्हाला दोनदोन चारचार महिने परस्परांच्या सहवासाचा लाभ घडला आहे."

केशवसुत, बालकवि ठोंबरे, लक्ष्मीबाई टिळक, रावसाहेब साठे वगैरे सर्वांबद्दल टिळकांना—अर्थात् काव्यसृष्टींत—पितृवत् प्रेम वाटे व 'काव्यरत्नावलींतील' त्यांची प्रस्तावना ह्याचेंच प्रत्यंतर होय.

आणि टिळकांशीं इतका जिव्हाळ्याचा व स्नेहाळ संबंध असलेला केशवसुतांसारखा प्रेमळ कविमित्र टिळकांच्या पावलावर पाऊल ठेवून त्यांच्या मागोमाग ख्रिस्ती होण्याच्या मार्गावर येऊन उभा राहतो ह्यांत तरी नवल कोणतें ! श्री. सीतारामपंत म्हणतात —

"ख्रिश्चन होण्याकडे आपल्या मनाची प्रवृत्ति होत चालली होती ही गोष्ट खुद्द केशवसुतांनींच पुढें कांहीं वर्षांनीं ओघाओघानेंच संभाषणामध्यें माझ्या जवळ बोलून दाखविली होती अर्थात् ती सांगोवांगी नसून विश्वसनीय आहे." ( केशवसुतांची कविता, चौथी आवृत्ति पृ० १३ )

२८ जून १९१९ रोजीं पुण्यास किर्लोस्कर थिएटरमध्यें टिळकांच्या निधना-निमित्त जी शोकसभा भरली होती तींत बोलतांनाहि श्री. सीतारामपंत दामले ह्यांनीं ह्या गोष्टीचा प्रामुख्यानें उल्लेख केला होता.

"? टिळकांचा व माझ्या वडील बंधूंचा नागपुरास असतांना फार परिचय झाला. ते आपल्या कविता एकमेकांस दाखवीत. त्यांचें परस्परांवर इतकें प्रेम होतें कीं ज्या वेळेस टिळक ख्रिस्ती झाले त्यावेळीं आपणहि ख्रिस्ती व्हावें असें त्यांच्या मनानें घेतलें." ( ज्ञानोदय २-६-१९ )

श्री. श्रीधर विनायक वर्तक आपल्या 'तुतारीचे पडसाद' मध्यें पुढें म्हणतात—

"हिंदुसमाजांतील कांहीं अत्यंत चमत्कारिक रूढि पाहून त्या समाजां-तून उठून जावें, असल्या तऱ्हेची वेडगळ कल्पना त्या वेळीं हिंदुस्थाना-च्या सगळ्या भागांतील विद्वान् लोकांत पसरली होती ; तिची झळ केशव-सुतांनाहि—त्यांचे बंधु लिहितात त्याप्रमाणें—लागली असेल, नाहीं असें नाहीं. पण केशवसुतांची मनोभूमिका ख्रिस्तीधर्माला केव्हांहि अनुकूल नव्हती व ती केव्हांहि तशी झाली नसती हें त्यांच्या काव्यावरून उघड दिसतें." (पृ० १०)

ह्यानंतर आपल्या म्हणण्याच्या पुष्टयर्थ 'आगबोटीच्या कांठाशीं उभ्या असलेल्या तरुणीस पाहून' केशवसुतांना स्फुरलेल्या कवितेचा निवाळा ते देतात.

ती संपूर्ण कविता वाचकांनीं पहावी. आगबोटीच्या कांठीं समुद्राच्या शोभेकडे पहात एक तरुणी उभी आहे तिच्याकडे पहातां पाहातां तिनें व तिच्या-बरोबर आपणहि समुद्रतळीं जावें अशी कवीला इच्छा होते ! त्या निष्पाप जीवाला मात्र असल्या तऱ्हेचे विचार-तरंग उठलेला कवि आपल्याकडे पहातो आहे ह्याची कल्पनाहि नाहीं.

तेथें गेल्यावर—

प्रवालांच्या शय्यें निजविंतिल त्या देवि अपणा
प्रवालोला ज्या हा त्वदधर गडे ! जिंकिल पण ;
तशी मोत्यांची त्या पसरितिल गे चादर वरी,
सरी ज्या मोत्यांना न तव रदनांची अणुभरी

आणि पुढें तर—

शिराखालीं तूझी भुजं मम गडे ! स्थापितिल हा,
तसा माझ्या कंठीं कर तव सखे ! सुन्दर अहा !
जलस्था त्या देवी चरण अपुले गुंतविंतिल
सुखें लाडानें त्या निकट अमुची स्पर्शविंतिल !

आणि इतका प्रकार झाल्यावर—

समुद्राच्या पृष्ठीं—

कधा कोणी राष्ट्र प्रबळ दुसऱ्याला बुडविण्या
जहाजें मोठालीं करिल जरि तें सज्ज लढण्या,
तरी सांगोनीया प्रवर वरुणाला, खवळवूं
समुद्रा तेणें त्या सकल खलनौका चुथडवूं—

किंवा 'गुलामा आणाया निघतिल कुणी दुष्ट नर ते' तयाची 'अमुक खडकीं गलबतें' फोडूं व त्या 'नरांलागीं' 'ओढूनि करीं, समुद्राच्या खालीं दडपनि भरूं नक्रविवरीं.'

येवढ्या दोन गोष्टींवरून केशवसुत कधीं ख्रिस्ती झाले नसते असें श्री. वर्तक म्हणतात! त्यांना असें म्हणायचें असेल कीं दुसऱ्यांवर आक्रमण करणें व गुलामांचा व्यापार करणें हा ख्रिस्तीधर्माचा विशेष आहे तर तें साफ चुकीचें आहे हें त्यांनीं नवा करार वाचला असता तर, किंवा ह्या पापांशीं झुंजणाऱ्या ख्रिस्ती लोकांचीं चरित्रें वाचलीं असतीं तर सहज दिसून आलें असतें.

टिळकांचा ख्रिस्ती धर्म व आज ज्या पाश्चात्य संस्कृतीला ख्रिस्तीधर्म ह्या चुकीच्या नांवानें ओळखण्यात येतें तो ह्यांत फार तफावत होती. पाश्चात्यांनीं ख्रिस्तीधर्म स्वीकारतांना तो पूर्णपणें स्वीकारला नाहीं. रशियाचा बादशाह व्लॅडिमर ख्रिस्ती झाला व त्याच्या बरोबर सारा देश ख्रिस्ती झाला पण व्लॅडिमरनें ख्रिस्ती होतांना आपला अभिमान आपल्या बरोबर आणला. बाप्तिस्मा घ्यायचा असें ठरवितांच त्यानें कॉन्स्टँटिनोपलवर हल्ला करून तेथील मुख्य धर्माधिकाऱ्याला पकडून आणून त्याच्या हातून बाप्तिस्मा घेतला! त्या ख्रिस्तीधर्मस्वीकारांत नम्रता हा त्या धर्माचा विशेष हा असा बगळला गेला. शार्लमन बादशहानें सॅक्सन लोकांना जवळ जवळ बळजबरीनें ख्रिस्ती धर्माची दीक्षा दिली. त्या लोकांनीं एक अटीवर ख्रिस्ती होण्याचें कबूल केलें व ती अट बाप्तिस्म्याच्या वेळीं ते कळविणार होते. बाप्तिस्म्यासाठीं ते पाण्यांत उतरले तेव्हां त्यांनीं आपले उजवे हात पाण्याबाहेर उंच डोक्यावर धरले. ह्या हातांत ते शस्त्रें धरीत. ख्रिस्ती झाले तरी आपले हात मात्र त्यांनीं 'बाप्ती' दिले नाहींत. यूरोपमधील

क्षुद्रपिपासा ख्रिस्ती होऊनहि पूर्वीसारखीच कायम राहिली ह्यांत नवल काय! असा यूरपचा ख्रिस्ती धर्म आहे व तसाच तो इकडे आला.

केशवसुत हे ख्रिस्ती झाले असते तर ते टिळकांप्रमाणें ख्रिस्ती झाले असते आज ख्रिस्ती धर्म पाश्चात्य देशांपेक्षां भारतांतच अधिक असून अधिक शुद्ध स्वरूपात नांदत आहे. येशू ख्रिस्ताला [illegible] खांबावर खिळून मरावें लागलें—व त्यामुळें तो चिरायु झाला तद्वत् त्याचा धर्मालाहि आपल्या नांवाला 'खांबीं' खिळून मग जगावें लागेल कोट्यवधि लोकांत एक खरा ख्रिस्ती निपजतो. रशियात टॉल्स्टॉय तसा निपजला होता व त्याच्या पावलावर पावलें प्रथम गांधीजींनीं टाकलीं आणि गांधीजींनीं भारताला ख्रिस्ती धर्म शिकविला आज रशियांत व इतर ठिकाणीं कम्युनिझम ह्या नव्या नांवानें ख्रिस्ती धर्म पसरत आहे. त्यानें फक्त ख्रिस्ताची अनत्याचारी पद्धत जी गांधीजींनीं अनुसरली तिचा त्याग केल्यानें व परमेश्वराला त्यांतून वगळल्यानें त्याचें पावित्र्य नष्ट केलें आहे.

टिळकांचा बाप्तिस्मा १८९५ च्या सुरुवातीला झाला. पण ह्यापूर्वी काहीं काळ त्यांचें मुंबईस जाणें येणें असे. २० सप्टेंबर १८९४ च्या ज्ञानोदयांत टिळकांनीं लिहिलेले १२ श्लोक प्रसिद्ध झालेले आहेत. ती कविता कोणा ख्रिस्त-निंदकास उद्देशून लिहिली आहे. ह्यावरून टिळकांनीं ख्रिस्त स्वीकाराची तयारी आधींपासूनच अगदी [illegible] होती हे दिसून येतें. ह्याच सुमा-राची केशवसुतांची तुतारी ही कविता आहे

ह्या तुतारी कवितेसंबंधीं 'ब्राह्मण किंवा महार' ह्या प्रकरणांत अधिक विस्तारानें लिहिलें आहे. येथें एवढेंच सुचवायचें आहे कीं 'तुतारीं'त उमटलेले बायबलचे पडसाद पहाता ह्याच ठिकाणीं व ह्याच वेळेस टिळकांप्रमाणेंच केशव-सुतांच्याहि लिखाणावर बायबलचा परिणाम झालेला असावा अशी शंका येते. टिळकांच्या व केशवसुतांच्या लिखाणांत काहीं काहीं वेळेला जें साम्य दिसून येतें तें केशवसुत टिळकांचे चेले म्हणून किंवा टिळक केशवसुतांचे शिष्य म्हणून नसून दोघांच्याहि मनावर बायबलमधील येशू ख्रिस्ताच्या चरित्रानें व शिक्षणाने जो विलक्षण परिणाम केला त्यामुळें. केशवसुतांच्या कवितेंत गुलामगिरीच्या

प्रथेविषयीं जो तिटकारा आढळतो, आणि मजुरांविषयीं जो जिव्हाळा दृष्टीस पडतो त्याचा वारसा मिशनकडून आला असावा. केशवसुतांच्या कवितेवर सुरवातीपासूनच इंग्रजी कवितेची पकड होती, ती मुंबईच्या मुक्कामांत आणखी दृढ झाली असें प्रा पंडित आपल्या 'केशवसुतांच्या कवितेतील निराशा' ह्या लेखांत जें म्हणतात तें ज्ञानोदय कचेरी, बायबल व टिळक ह्यांनीं केशवसुतांवर पुष्कळच परिणाम केल्याचें मीं जें सूचित केलें आहे त्याला पोषकच आहे.

अर्थात् टिळकांच्या इतका बायबलचा परिणाम केशवसुतांवर झालेली नाहीं. हें झालें केशवसुतांना स्फूर्ति कशी मिळावी ह्यासंबंधीं आतां त्यांची काव्यें कशीं रचण्यांत आलीं त्यासंबंधीं सीतारामपंत दामले काय म्हणतात पहा. ते म्हणतात—

"केशवसुतांच्या कवितेच्या एकदर १३०-१४० प्रकरणांपैकीं बरींच प्रकरणे हीं अनेक इंग्रजी कवींच्या स्फुट प्रकरणांवरून सुचलेलीं असावीं हें वाङ्मयाचें अध्ययन करणाऱ्या कोणाहि विद्यार्थ्याला कळून येईल."

प्रा. भवानीशंकर पंडित आपल्या 'केशवसुतांच्या कवितेंतील निराशा' ह्या प्रबंधांत म्हणतात—

"Herrick च्या 'To Daffodiles and to Blossoms' चें 'जास्वंद आणि पारिजात' असें महाराष्ट्रीकरण करतांना त्यांना अवधान राहिलें नाहीं, आणि 'मरून मातींतच या पडाल, अज्ञात ऐशा थडग्यांत जाल' या ओळी ते लिहून गेले. या ओळींतील 'थडग्यांच्या उल्लेखामुळें महाराष्ट्रीकरण बरोबर झालें नाहीं.' 'A wit's a feather' यावरून सुचलेली 'कीर्ति म्हणजे काय रे? एक पीस, शिरीं लोकांच्या त्यास चढावयास' ही कल्पनाहि आपल्या समजाच्या दृष्टीनें हास्यास्पद आहे. कारण विजयाचें चिन्ह म्हणून पिसें टोपींत खोवण्याची चाल आपल्यांत नाहीं. 'कचाप्रत देवयानी' मधील 'घालून निराशेचें अंडें, आशा अहा उडुन गेली' ही कल्पनाहि पुराणकाळांतील कचेंत व केशवसुतांच्या जमान्यांत हास्यास्पदच होती. (महाराष्ट्र साहित्य-पत्रिका ज्या-मार्च १९५३ पृ० १२) तुतारीच्या आवाजाला ते 'किंकाळी' म्हणतात. वास्तविक माणूस घाबरला म्हणजे किंकाळी फोडतो."

आतां केशवसुतादि सर्वच आधुनिक कवींनीं आपली कविता कोणत्या दिशेनें लिहिली व ती प्राचीनांच्यापेक्षां निराळी कां हें 'काव्यचर्चा' ह्या पुस्तकांतील श्री. बाळकृष्ण अनंत भिडे ह्यांच्या 'मराठी काव्याची उत्क्रांति व केशवसुत' ह्या निबंधांत उत्कृष्ट रीतीनें चर्चिलें आहे. श्री भिडे म्हणतात—

"पाचदहा वर्षांच्या फरकानें केशवसुतांचे समकालीन असे बरेच, विदग्ध व ललित वाङ्मय प्रसवणारे कवि मासिकांत मिरवलेले आहेत... त्यांच्या विदग्ध व ललित काव्याचें बाह्यांग कितीहि निरनिराळें भासलें, तरी अन्तरंगाचा ठाव घेतल्यास त्यांत समान वृत्ति, व आकांक्षा आढळून येतात" (२१६)

"याच सुमारास धार्मिक, सामाजिक व राजकीय, चळवळीसहि चांगलें तोंड लागलें होतें. अर्थात् निसर्गभक्त व स्वभाववादी बनलेल्या आधुनिक कवींस मूर्तिपूजेवर, धार्मिक संस्कारांवर, जातिभेदावर, देवांच्या संख्येवर, रूढ मार्गानें जाणाऱ्या भाविकांवर आणि भटाभिक्षुकांवर कोरडे ओढण्यास स्फूर्ति झाली व ते भराभर तडफदार ललित वाङ्मय प्रसवूं लागले. सामाजिक चळवळीमुळें विधवांचे क्लेश, बालविधवा, विवाहसंबंधांत पूर्वप्रेमाचा अभाव, जरठकुमारी विवाह, स्त्रियांची गुलामगिरी व अज्ञान, प्रेमाची अवहेलना, कृत्रिम निर्बंध, इत्यादिक मनाला खळबळून टाकणारे विषय आधुनिक कवींना लाभले.. राष्ट्राचा आळस व अज्ञान झाडून, त्याच्या अंगांत नवचैतन्य आणण्याकरितां शाहिरबाण्याची खणखणीत काव्यरचना करण्यास व मराठेशाहींतील अनेक राष्ट्रभक्तीचे प्रसंग भडक रंगांत रंगविण्यास सुरवात केली. अशा प्रकारें पैदा होणारें काव्यवाङ्मय बहुतेक सर्व स्फुट स्वरूपाचें होतें ... एकदोन बैठकींत १०-१५ पंक्तींचें भावगीत लिहावें व तें थोडक्याच दिवसांत मासिकांत प्रसिद्ध व्हावें— (२१५-१६)

"तेव्हां या कवींनीं एकमेकांचें अनुकरण केलें, हें म्हणणें जितकें अप्रयोजक होईल, तितकेंच त्यांच्यापैकीं कोणी एकानें आपल्या अलौकिक कर्तबगारीनें व बुद्धिवैभवानें मराठीच्या काव्य वाङ्मयांत क्रांति घडवून

आणली, हें म्हणणेंहि अप्रयोजक ठरेल. नव्या वळणाचा प्रवाह केशवसुत व त्यांचे समकालीन कवि ह्यांच्या जन्माच्या पूर्वींच सुरू झाला होता. व हा प्रवाह अजूनहि नवीन जोमानें भरधोसांत चालू आहे." (२१६)

टिळक ख्रिस्ती झाल्यानें त्यांना त्यांच्या जाती'नें दूर लोटलें व त्यामुळें ज्या नवीन 'जातीं'त त्यांचा सहाजिक समावेश झाला ती त्यांना जवळची झाली व नित्य व्यवहारांत तिच्यांतील सदस्य त्यांच्या डोळ्यांपुढें दिसूं लागले. वर उद्धृत केलेल्या कवितेच्या कारणांपैकीं आतां त्यांना आपल्या कवित्वानें "मूर्तिपूजेवर, धार्मिक संस्कारावर, जातिभेदावर, देवाच्या संख्येवर रूढ मार्गानें जाणाऱ्या भाविकांवर आणि भटभिक्षुकांवर कोरडे ओढण्याची जरूरच पडली नाहीं. "विधवांचे क्लेश, बालविधवा, विवाहसंबंधांत पूर्व प्रेमाचा अभाव, जरठ कुमारी विवाह, स्त्रियांची गुलामगिरी— हीं त्या समाजांत जवळ जवळ नव्हतींच"

२८ डि. १८९३ च्या ज्ञानोदयात आलेली ही बातमी उद्बोधक आहे.

"ह्या वर्षी मॅट्रिक्युलेशनच्या परीक्षेंत २५ स्त्रिया पसार झाल्या, त्यात १ हिंदु, ९ पारसी व १५ ख्रिस्ती आहेत."

आजच्या खानेसुमारीचे आकडे पाहतां ख्रिस्ती लोक फक्त शेंकडा सवादोन आहेत १८९३ मध्यें तर ते ह्याच्या निम्म्यानेंहि नसतील त्या वेळची ही गोष्ट आहे. इतक्या लहान समाजांत स्त्रीशिक्षणाचें एवढें मोठें प्रमाण होतें. तेव्हां त्यावेळीं त्यांच्या पुढें ह्या अन्यायाचा प्रश्नच नव्हता जितका अन्याय अधिक तितका त्वेष अधिक. तेव्हां 'रणशिंग' किंवा 'बोंबाबोंब' ह्या कविता श्री. गो. गं पोतदार म्हणतात त्याप्रमाणें "केशवसुतांच्या तुतारीचे अधमानुकरण" आहेत असें म्हणायला जागाच नाहीं त्यांचा विषय अजिबात निराळा असून त्या विषयांत केशवसुतांच्या तुतारीचीं बंडखोरी शोभलीच नसती. ह्याच दोन कवितांवरून टिळकांना केशवसुतांचें शिष्यत्व पत्करायला लावलें गेलें असल्यानें पुढें त्याविषयीं थोडें अधिक विस्तृतपणें लिहिलें आहे. त्या दोन कवितांखेरीज असें दुसरें काय आहे कीं त्यामुळें केशवसुत व टिळक त्यांचे गुरु शिष्यत्वाचें नातें प्रस्थापित करून दाखवितां येईल ?

टिळक व केशवसुत ह्यांच्या कृतींत संख्या, रचना, ध्येय, हाताळलेले विषय, स्त्रीविषयक दृष्टिकोण, भक्ति व व्यक्तित्व ह्या प्रत्येक बाबतींत जमीनअस्मानाचा फरक आहे. परंतु ह्या गोष्टींकडे लक्ष न देतां टीकाकारांनीं टिळकांनी रचलेल्या शेकडों काव्यांतून हीं दोन काव्यें हुडकून त्यांत व तुतारींत वरवर दिसणाऱ्या साम्यावरून मारून मुटकून टिळकांना केशवसुतांचे शिष्य बनवून टाकलें

ह्या टीकाकारांचा समाचार घेतांना खुद्द कवींना झळ लागूं न देतां व विशेषतः त्या वेळच्या कवींमध्यें जो परस्पर प्रेमभाव होता तो ध्यानांत आणतां तो घेणें अत्यंत कठीण आहे. टिळकांचा तर केशवसुतांपासून बालकवींपर्यंत कितीतरी कवींशीं निकट मित्रभाव होता. तेव्हां टिळक व केशवसुत ह्यांच्यांतील फरक दाखवितांना ह्या गोष्टी मला विसरतां कामा नये हेंहि मी जाणून आहें.

**१. टिळकांची कविता संख्येनें विपुल आहे.** केशवसुतांची तशी नाहीं. केशवसुतांचे एक चहाते श्री. कमतनूरकर ह्या बाबतींत असें गणित मांडतात कीं केशवसुतांची एक कविता टिळकांच्या दहा कवितांबरोबर आहे! वाचकापुढें टिळकांची कविता आहे व तेच हें विधान बरोबर आहे कीं चूक आहे हें ठरवूं शकतील. आपण ह्या ठिकाणीं केवळ नीरस अशा आंकडेमोडींत थोडा वेळ घालवूं. हें गणित सोडवितांना डॉ. माधवराव पटवर्धनांची थोडी आकडेवारी घ्यायची झाली तर—

'केशवसुतांची कविता विपुल नाहीं त्यांचा काव्यरचनाकाल वीस वर्षांचा असून तिसऱ्या आवृत्तींत त्यांचे एकूण १३२ चुटके प्रसिद्ध आहेत; आणखी २/३ अप्रसिद्ध असतील. एकंदर अदमासें १३५ चुटक्यांपैकीं १७ भाषान्तरित आहेत." (आर्वाचीन मराठी वाङ्मयसेवक पृ० १०५)

म्हणजे ११८ कवितांवर केशवसुतांची स्वतःची म्हणून छाप मारण्यास हरकत नाहीं. ह्याच्या दहापट म्हणजे ११८० इतक्या कविता जेव्हां टिळकांच्या खात्याला दाखवितां येतील तेव्हां टिळक केशवसुतांची बरोबरी करूं शकतील.

अगदींच पोरकटपणाचें हें गणित असल्याचें मी मान्य करतों पण तितक्याच बालिश गणिताचें तें उत्तर असल्यानें मी तरी काय करणार?

कमतनूरकरांना एवढेंच दाखवायचें आहे, कीं ११८० कविता वजा करूनहि (पृ० ६६) टिळकांच्या खात्यांत आणखी पुष्कळच शिल्लक राहाते

**२. रचनेनें सुबक आहे.** केशवसुतांची कविता क्लिष्ट व ओबडधोबड असल्याचें डॉ. माधवराव पटवर्धन, प्रा भवानीशंकर पंडित, श्री अमृत महादेव जोशी वगैरे टीकाकार म्हणतात (सह्याद्रि सप्टेंबर १९४०)

> " प्रथमदर्शनींच भाषेचें दारिद्र्य आणि त्यांत हेंगाडेपणाची भर, दूरान्वय आणि त्याला क्लिष्टतेची जोड, ओबडधोबड शब्दरचनेशीं संगनमत करणारी सैल पद्यरचना, अशा थाटाची केशवसुती कविता पाहिली म्हणजे अभ्यासू गलितगात्र होतो. समग्र कविता वाचण्याइतका उत्साह त्याच्या अंगीं राहूंच शकत नाहीं. नमुन्याच्या कांहीं स्थानाचें दिग्दर्शन करूं म्हटलें तरी तेंहि एक ग्रंथच होऊन बसेल "

ह्यापुढें त्यांनीं भाषेचें दारिद्र्य, हेंगाडेपणा, दूरान्वय, क्लिष्टपणा वगैरेंचे कॉलमभर नमुने दिले आहेत.

## ३. दोघांचीं ध्येयें निरनिराळीं आहेत—

श्री. 'किरात' म्हणतात (काव्यचर्चा पृ० ३७८)

"केशवसुत म्हणजे आगरकरांचा काव्यमय अवतार ! आणि आगरकर म्हणजे गद्यांत बोलणारे केशवसुत ! "

'टिळक जगाच्या गतिमान प्रवाहाशीं तदेकपर बनून विकासक्षमतेची पूजा करणारे; सृष्टि, निसर्ग आणि मानवता यांच्या साहजिक प्रवृत्तींबद्दल आस्था बाळगून उन्नति, उदात्तता आणि समावेशकता यांची जोपासना करणारे, विश्वांतील प्रागतिक सूत्रांशीं स्वत्वाचा समन्वय करून सर्वत्र निरामय आनंदमयता पाहणारे

तर

'केशवसुत जगाच्या गतिमान प्रवाहाशीं विरोध करून व्यथवादी बनणारे— सृष्टि, निसर्ग आणि मानवता यांच्या साहजिक प्रवृत्तींबद्दल उदासीन होत जाऊन

विषण्णता, वैफल्य आणि नैराश्य यांच्या आहारीं जाणारे, विश्वांतील प्रागतिक सूत्रांशीं स्वत्वाचा छांदिष्टपणें घटस्फोट करून सर्वत्र विकृत विषण्णता पाहणारे' असें या दोघांचें वर्णन एका विद्वान गृहस्थानें मला लिहिलेल्या एका खाजगी पत्रांत केलेलें आहे.

प्रा. डॉ. वा. भा पाठक म्हणतात—

"केशवसुतांना एकदा जग भिकार वाटलें तर टिळकांना ही भूमीच स्वर्ग आहे असें वाटलें.

'म्हणे जाऊं चला स्वर्गी' 'नको देवी' म्हणालों मी
तिथें नाहीं नवें कांहीं धरीना जें इथें भूमीं ॥'

कवि 'माधव' आपल्या टिळक-शोकगीतांत म्हणतात—

'वनीं रुष्ट प्रसूनाला कुणीं सद्बोध बोधावा ?
अतां जीवंत पोवाडा प्रवृत्तीचा कुणीं गावा ?
करावें तें कुणीं व्यक्त श्रमीं जें गुप्त सौंदर्य ?
जनालागीं कुणीं द्यावा मला सांगा असा धीर ?
मृतीं चैतन्य आणाया नुरे कोठेंच शाहीर !'

## ४ टिळक फुलांमुलांचेहि कवि होते तसे केशवसुत नव्हते.

टिळकांच्या उत्तेजनानें केशवसुतांनीं एकदाच एक शिशुगीत लिहिल्याचें मला ठाऊक आहे व तेंहि भाषान्तर आहे. टिळकांच्या शिशुगीतांचें एक १०० पानी पुस्तक आहे. केशवसुतांची घड्याळ ही कविता टिळकांच्या 'घड्याळ काय म्हणतें' ह्या दीर्घ कवितेच्या प्रसिद्धीनंतर नऊ वर्षांनतरचीच व 'मुलांस कोंडणाऱ्या एका पंतोजीस' ही कविता टिळकांच्या 'छडीदार पंतोजी'च्या वेळचीं आहे. पण हीं दोन्हीं शिशुगीतें नाहींत.

टिळकांच्या 'बालोद्यानाकडे'– ह्या प्रस्तावनेंत श्री. प्र. के. अत्रे म्हणतात —

'फुलांमुलांचे कवि' म्हणून त्यांचा पुष्कळ वेळां उल्लेख केला जातो. विपुल

धार्मिक काव्य रचणाऱ्या कवींच्या प्रतिभेचा तो फारच मोठा गौरव आहे असें मी समजतों. त्यांच्या 'अगदीं लहान मुलांसाठीं' लिहिलेल्या कविता तर सर्वच्या सर्वच उत्तम आहेत ! पस्तीसचाळीस वर्षांपूर्वी, महाराष्ट्रांत नवीन शिक्षणशास्त्राचा मागमूसहि नव्हता हर्बार्ट, फ्रोबेल आणि मॉंटिसोरी यांनीं युरोपीय शिक्षणांत जी महान् क्रांति घडवून आणली तिचे फारच थोडे पडसाद त्यावेळीं या देशांत उमटले होते. मुलांकडे बघण्याची पाश्चात्यांची नवीन दृष्टि इकडच्या समाजाला त्या वेळीं माहीत असणेंहि शक्य नव्हतें..... अशा परिस्थितींत लहान मुलांची काव्याची गरज निराळी आहे असें ओळखून त्यांच्यासाठीं निराळीं काव्यें लिहिण्याची अवश्यकता टिळकांना वाटली याबद्दल त्यांच्या बुद्धिमत्तेचें कौतुक करावें तेवढें थोडेंच आहे.... मुलांच्या शिक्षणासंबंधीं स्वतंत्रपणें विचार करून त्याबद्दलचें तत्त्वज्ञान त्यांनीं निश्चितपणें ठरवलें होतें.

> पोरें हीं न परंतु कल्पतरु हे, आधार हे आपुले
> हे देतील फळें अनर्घ्य जरि ह्या अत्यादरें जोपलें
> ह्या बाळांत कवीश, पंडित, महायोद्धे तसे सन्मणी
> नाना वृक्ष जसे लपून बसतो अत्यल्प बीजांतुनी

या एका श्लोकांत वर्ड्स्वर्थ आणि फ्रोबेल यांच्या बालविषयक तत्त्वज्ञानाचा मनोहर समन्वय टिळकांनीं घालून दिलेला दिसून येतो."

**५ – टिळकांचा स्त्रीविषयक दृष्टिकोण अत्यंत पवित्र आहे.** केशवसुतांनीं 'आगबोटीच्या काठाशीं उभ्या असलेल्या तरुणी'चे जे हाल केले त्यासंबंधीं (पृ० ७०,७२) वर आपण पाहिलच आहे असालाच उत्तान शृंगार त्यांच्या स्वप्न' किंवा 'अपरकवितादैवत' ह्या काव्यांत पहावयाला मिळेल. स्वतःच्या पत्नीविषयीं किंवा एकंदर स्त्रीजातीविषयीं टिळकांच्या दृष्टींत केवढें मांगल्य वसत होतें हें पुढें 'टिळक व लक्ष्मीबाई' ह्या प्रकरणांत अधिक विस्तारानें दाखविलें आहे. ह्या बाबतींत डॉ. बा. भा पाठक ह्यांनीं केलेलें सूक्ष्म निरीक्षण वाचकांना चांगलें मार्गदर्शन करील. ('टीका आणि टीकाकार' पृ० ३२९–३१०)

केशवसुतांना आपल्या प्रियतमेपासून बौद्धिक आनंद लुटण्याची संवय लागली होती असें दिसत नाहीं. त्याची प्रेयसी सामान्य बुद्धिमत्तेची पण शारीरिक सौंदर्यानें रसिकाचें मन आकर्षून घेणारी सामान्य स्त्री आहे तिच्या आंतर गुणांचा—स्वभावाचा—ध्यास टिळकांप्रमाणें केशवसुतांना लागला नव्हता केशवसुतांची प्रेमगीतें लौकिक स्वरूपाचीं वाटतात. टिळक हे उच्च पातळीवर उभे राहून प्रेमव्यक्तीकडे आदर्शदृष्टीनें पाहतात केशवसुतांचें तसें नाहीं. टिळकांप्रमाणें प्रियेकडे पाहण्याची केशवसुतांची दृष्टि केवळ स्थितप्रज्ञाची नाहीं. ‘मी पाहिली एक सुरम्य बाला, वर्णूं कसा त्या स्मरसंपदेला! वृक्षावरी वीज जशीं पडावी, त्याच्या स्थितींतच तिची महती पाहावी’ असें ते म्हणतात. ही बाला काल्पनिक समजावी कीं, वास्तविक जगांतल्या एकाद्या ‘स्मरसंपदे’नें त्यांना वेडें केलें होतें हें समजणें कठीण आहे. ‘मनोहारिणी’ या कवितेंतहि स्त्रीच्या बाह्य सौंदर्यानें ते मोहून जातात हें स्पष्ट दिसतें बाकीच्या बऱ्याचशा कवितांतून त्यांच्या स्वतःच्या प्रियव्यक्तीविषयींच्या विरहभावनाच प्रकर्षानें आढळतात. इंग्रजी कवींच्या एतद्विषयक कल्पनांचा उसना आविष्कार त्यांनीं केला असें दिसत नाहीं ह्याच्या उलट शारीरिक लावण्यापेक्षा आंतरसौंदर्याचा ध्यास टिळकांना विशेष लागलेला होता. प्रेयसीच्या दर्शनानें त्यांच्या अंतःकरणात ‘नवसंजीवन,’ ‘मोठे हेतु,’ ‘धैर्य,’ अनुरति,’ ‘दुर्वासनांचा विलय,’ ‘रसज्ञ्येय,’ ‘पूज्यबुद्धि,’ इत्यादि विलोभनीय गुण जागृत होतात. उदाहरणार्थ, त्यांची ‘माझी भार्या’ ही कविता पहा आत्यंतिक सद्गुणांचा आरोप टिळक आपल्या प्रियतमेवर करितात त्यामुळें तिचें स्वाभावचित्र अलौकिक वाटतें. उदाहरणार्थ, ‘विरह’ ‘शुद्धप्रेम आणि वियोग’ या कवितेंत ज्या व्यक्तीशीं त्यांचा विरह झालेला आहे त्या व्यक्तीसंबंधीं त्यांनीं अतिशयोक्तिपर उद्गार काढले आहेत. सृष्टींतील तारका, फुलें किंवा वाङ्मयांतील काव्यें इत्यादि दृश्य किंवा अदृश्य सौंदर्यापासून व्हावयाचा आनंद प्रेमविरहामुळें त्यांना लाभत नाहीं टिळकांच्या प्रेमगीतांत नेहमीं त्यांचा ध्येयवाद व सात्त्विक भाव प्रगट होतो. धर्मान्तरामुळें ते ज्या मनमोकळ्या वातावरणांत वाढले त्याचा गोड परिणाम त्यांच्या स्त्रीविषयक कल्पनेंत झालेला दिसतो. पौर्वात्य संस्कृतींतील केवळ रूढकल्पनांना त्यांनीं

निषेधच केला आहे. विवाहसंस्थेविषयीं त्यांना आदर आहे पण "होम पुरवावा खेळ करुनि घ्यावा। पुढें नशिबाला दोष सर्व द्यावा" हा 'भरतखंडांतील विवाहाचा अर्थ' त्यांना मान्य नव्हता. स्त्रीवर होणाऱ्या अन्यायामुळें त्यांना विषाद वाटतो 'स्त्रीस्वातंत्र्या'च्या कल्पनांचा पुरस्कार त्यांनीं आपल्या प्रेमगीतांतून ठिकठिकाणीं केला आहे स्त्रीपुरुष हीं संसाररथाचीं दोन चक्रें आहेत, किंबहुना पुरुष केवळ स्त्रीचें सारथ्य करतो प्रेमाच्या क्रीडांगणात दोघांनीं निःसंकोचपणें नर्तन करावें कारण कीं एकनिष्ठ प्रेमांत कोठलें अंतर नसतें व उपकारहि नसतो व्यवहाराच्या कृत्रिम कुंपणांत प्रीतीची वेल वाढत नाहीं. प्रेमाचें अद्वैत व्योमधरेच्या चुंबनासारखेंच अक्षय टिकतें. ही प्रेमसमाधि म्हणजेच खरोखर मुक्ति किंवा जीविताचें सार्थक. आवड आणि प्रेम यांच्यांत ऐक्य आहे ममता हीच सौंदर्याला जन्म देते प्रीतीचें पोषण अश्रुजलानें होतें. पात्र सोन्याचें किंवा मृत्तिकेचें कसलेंहि असलें तरी त्यांना पात्रांतील अमृताचें वेड लागतें ह्या सर्व उच्च कल्पना, टिळकांचा प्रेमगीतांतील आदर्शवाद उघड करतात. ते केव्हांहि खालच्या पातळीवर येऊन केशवसुतांप्रमाणें प्रियेला उद्देशून—'बोटें मोडु नको, तसे मजवरी डोळे वटारूं नको, अव्हेरून मदीय चित्त पुरतें देऊं नको लावुन' असे उद्गार काढीत नाहींत. केशवसुतांची 'समृद्धि आणि प्रीति' या कवितेंतील भूमिका वास्तविक जगांत वावरणाऱ्या प्रियकराची आहे. त्यांची प्रीतीची भाषा लौकिक आहे. "तेथें सेविल कोण आश्रमफलें मीं एकटा राहुनी" असें ते विचारतात. टिळक प्रेमाचे शुद्ध आणि वैषयिक असे दोन भाग पाडतात केशवसुत शारीरिक सौंदर्याचीं गीतें गातात, आणि ते विशुद्ध प्रेमाचेंच एक अंग आहे असें मानितात. टिळकांची वृत्ति प्रेमगीतें लिहितांना कधीं कधीं बहिर्मुख होते. केशवसुत बहुधा अंतर्मुख होतात. 'स्मरण आणि उत्कंठा' या कवितेच्या शेवटीं केशवसुत म्हणतात. "घेई ध्यास तुझा म्हणून मज दे निद्रा गडे सोडुन। तेणें दुर्लभ गे तुझें अहह तें स्वप्नांतहि दर्शन." उलट 'शुद्ध प्रेम आणि वियोग' या कवितेंत टिळकांनीं म्हटलें आहे. "ते तूझें गे चलनवलन प्रेमरंगें शुभांगी। पाहोनीयां मनिं सहज हो पूज्यबुद्धीच जागी." वियोगावस्थेंत असतांना

एका कवीला प्रेयसीच्या चिंतनानें झोंप येत नाहीं आणि त्यामुळें तिच्या स्वप्नांतल्या दर्शनालाहि तो अंचवतो, तर उलट आपल्या प्रियेच्या कल्पनेनें मनांत निर्माण केलेल्या हालचालीमुळें दुसऱ्याच्या मनात विरहावस्थेंतहि पूज्यबुद्धि जागृत होते. दोघाहि कवींच्या कल्पनेंत वास्तविकताच दिसते पण एकाचा अनुभव सर्वसाधारण व्यक्तींना येणारा आहे तर दुसऱ्याचा अनुभव असामान्य व्यक्तींनाच येऊं शकणारा आहे ''

६ - **टिळक हे संतकवि होते.** भक्ति हा त्यांच्या काव्याचा आत्मा आहे. त्यांचीं उत्तमोत्तम पद्यें 'भक्तीचे उम्हाळे' येऊन लिहिलीं होतीं. (४० ते ४७ पानें पहावीं.) पण त्यांची भक्ति म्हणजे नुसतें टाळ कुटीत बसणें नव्हतें. ते म्हणत 'देशांची खरी उन्नति ख्रिस्तांचें शिक्षण **आचरणांत** आणल्याशिवाय होणार नाहीं. हिंदुस्थान ग्रंथापेक्षां किंवा पंथापेक्षा व्यक्ताकडे लक्ष देतो. **नव्हे ख्रिस्ती ख्रिस्ती। परी ख्रिस्त ख्रिस्त। पाहिजे सतत उभा केला** असें ते धर्मबांधवांना सांगं लागले. ख्रिस्ताला त्यांची प्रार्थना अशी असे कीं **माझा आत्मा जसा आरसा। पाहो जन त्यामाजि तुला.**' (स्मृतिचित्रें. भाग ३ पृ० २३)

" केशवसुतांचा '**तुझें नाम मुखीं**' हा एकच अभंग ईश्वरास उद्देशून आहे. निराकार ईश्वराविषयीं का होईना पण जिवंत भक्ति ज्याच्या अंतःकरणात आहे त्या कवीच्या तोंडून एकच भक्तिपर कविता निघेल असें वाटत नाहीं. शिवाय ही कविता केशवसुतांची नसावी अशी शंका रा. राहाळकर यांनीं स्पष्टपणें व्यक्त करुन ठेविली आहे, तिचें निराकरणहि केशवसुतांच्या कवितेच्या संपादकांनीं केलेलें नाहीं." (अ म वा १२८) ह्याबाबतींत प्रा भवानीशंकर पंडित एका खाजगी पत्रांत म्हणतात 'मनोरंजन पु० ११ भा० ७ यांत'— केशवसुत महादेवाच्या पिंडीवर नाचल्याचा उल्लेख आहे केशवसुतांच्या नास्तिक्याबद्दल त्याचे ज्येष्ठ स्नेही कै. किरात कवि म्हणजे श्री. सोमण ह्यांनीं त्यांना म्हणावें 'तुम्ही सश्रद्ध व्हा, अंतर्मुख बना म्हणजे कांहीं काळानें तुमची अंतर्वाणीच तुम्हास ईश्वराचें आस्तित्व पटवून देईल'

खरें पाहतां केशवसुत हे प्रेमाचे कवि होते. व तें त्यांचें प्रेम स्त्रीविषयक प्रेम होतें डॉ माधवराव पटवर्धन म्हणतात· (अ. म वा १०७)

" परंतु तुतारीच्या किंकाळीनें बधिर झालेल्या रसिकांना या प्रेमगीतां-तील जिवंत कोमल करुणरव ऐकूं येत नाहीं, आणि महाराष्ट्र केशवसुतांना प्रेमाचा पहिला शाहीर न समजतां त्यांना बंडखोर क्रान्तीचा कवि समजतो"

श्री. अमृत महादेव जोशी म्हणतात— (सह्याद्रि सप्टेंबर १९४०)

" केशवसुतांच्या कवित्वांत त्यांच्या प्रीतिप्रेमशृंगाराच्या कविता... मनोविश्लेषणाच्या दृष्टीनें मोठ्या उत्तेजक अशा उतरल्या गेल्या आहेत. याच कवितांतूल त्याचें खरेंखुरें कवित्व वाचकांच्या अंतःकरणाला स्पर्श शकतें "

पण असल्या कविता टिळकांनीं लिहिल्या नाहींत त्यांची वृत्ति अशी होती, कीं त्यांना त्या लिहितांहि आल्या नसत्या. टिळक हेहि प्रेमाचे कवि होते पण तें फार निराळ्या अर्थानें त्यांच्या प्रेमाची परिणति भक्तींत होत होती तर केशवसुतांच्या प्रेमाची परिणति शृंगारांत होत होती. प्रा. राजाध्यक्ष आपल्या '५ कवि' ह्या पुस्तकांत म्हणतात (पृ० ४०) " टिळकांच्या प्रेमविषयक कवितांचा नूर इतका सोज्वळ आहे, कीं त्याना प्रेमगीतें म्हणताना मन कचरवें, इतकें काव्यक्षेत्रांत प्रेमाचें उत्तानतेशीं साहचर्य आहे."

प वा. प्रा. र. श्री जोगळेकर म्हणतात " कवीच्या काव्यांत जीवन भरलेलें असतें तर संतांच्या जीवनांत काव्य फुललेलें असतें' (लोकमान्य १९–४३–६) हें म्हणणें टिळक व केशवसुत ह्यांना अगदीं तंतोतंत लागू पडते "

७. पण ह्या दोन कवींत मख्य फरक आहे तो त्यांच्या **व्यक्तिमत्त्वांत** ! टिळकांचें काव्य त्यांचें चरित्रच होतें तर केशवसुतांचें काव्य शेक्स्पियर प्रमाणें आपल्या विषयापासून अलिप्त राहून लिहिलेलें होतें. शेक्पियरनें मॅक्बेथ, आयागो, हॅम्लेट वगैरे अद्वितीय व्यक्तिचित्रें निर्माण करून आपल्या बुद्धि-चापल्याची कमाल केली आहे. पण स्वत. शेक्स्पियर ह्यापैकीं एकहि नव्हता टिळकांचें काव्य त्या कोटींतील नव्हतें 'घरोंघर बाप घरोंघर आई घरोंघर ताई भाई माझे' अशी वृत्ति बनून तसें वर्तन घडल्यानंतर मगच ती कविता लिहिली गेली. केशवसुत जर त्या जातीचे कवि असते तर ते सेनापति बापट नाहींतर साने गुरुजी बनलें असते. केशवसुत राहिले नसते

वरील विवेचनावरून स्पष्ट दिसून येईल कीं टिळक व केशवसुत ह्यांच्या मध्यें कोणत्याहि तऱ्हेचें साम्य नसून टिळकांनीं केशवसुतांची उसनवारी करणं किंवा त्यांचें शिष्यत्व पत्करणें अगदींच अशक्य होतें. 'केशवसुतांची साद ऐकून थरारलेले कवि' ते नव्हते किंवा केशवसुतांनीं उभारलेल्या 'आघाडीवर' धावपळ करीत येऊन ते उभे राहिले नव्हते.

इतकेंच नव्हे तर पुण्यास गोविंदाग्रजांनीं स्थापन केलेल्या 'तुतारी मंडळाचे' टिळक सभासदहि नव्हते- असें बालकवींवर त्यांनीं लिहिलेल्या मृत्युलेखावरून ( मनोरंजन · जून १९१८ ) दिसून येतें टिळक म्हणतात —

> "प्रसिद्ध कवि 'गोविंदाग्रज,' महाराष्ट्र नाटक मंडळीचे मालक श्रीयुत कारखानवीस, भास्कर मोरेश्वर कीर्तनें इत्यादि कविमंडळानें नवीनच स्थापिलेल्या तुतारी मंडळाचे ते सभासद झाले हें तुतारीमंडळ कवि 'केशवसुत यांच्या सन्मानार्थ स्थापण्यात आलें होतें. तें अजुन आहे किंवा मोडलें हें आम्हाला ठाऊक नाहीं."

तेव्हां श्री वाळिंबे व प्रा. राजाध्यक्ष ह्यांचा जो समज आहे कीं टिळक तुतारी मंडळाचे सभासद होते तोहि चुकीचा असल्याचें वरील अवतरणावरून दिसून येईल. तुतारी मंडळाचे टिळक सभासद होते हा गैरसमजहि टिळकांनीं 'रणशिंग' व 'बोबाबोंब' ह्या कविता केशवसुतांचें 'अधम' 'अंधानुकरण' करून रचल्या आहेत ह्या म्हणण्यास कारणीभूत झाला असावा. ( पृ. ७७ ) ज्या सुमारास केशवसुतांची 'तुतारी' कविता लिहिली गेली त्या सुमारास म्हणजे मुंबईस टिळक केशवसुताच्या गाठीभेटी होत तेव्हां— (पृ० ७१) टिळकांनीं तसें अनुकरण करणें साहजिक होतें, 'तुतारी' नंतर **२१ वर्षांनीं** नव्हे. ( ह्या दोन कवितांविषयीं परिशिष्ट २ मधील शेवटला परिच्छेद पहावा )

आपण कोणाचे शिष्य नसल्याचें खुद्द टिळकांनींच ज्ञानोदयांत एक स्फुट लिहून एकदा प्रसिद्ध केलें होतें. ( २ एप्रिल १९१४ )

"खिस्तायनाला कोणींसें ज्ञानेश्वरी म्हटलें म्हणून एक ज्ञानेश्वरीचे अभिमानी कवि संतापून खिस्तायनाच्या कर्त्याला सपाटून शिव्या देत आहेत, तर इकडे एक हिंदी खिस्ती गृहस्थ कोण्यातरी एकाकी व्यक्तीच्या म्हणण्याला सर्वस्व मानून खिस्तायनाला व त्याच्या कर्त्याला स्वर्गापर्यंत नेऊन पोंचवीत आहेत! या दोन्ही व्यक्ति चुकत आहेत. प्रथमतः ज्ञानेश्वरीचा विषय तत्त्वज्ञान असून खिस्तायनाचा विषय चरित्र आहे. ह्याप्रमाणें ज्या काव्याचे विषय भिन्न आहेत, त्यांची तुलना करणें हेंच आधीं रास्त नाहीं. दुसरें– खिस्तायन अजून प्रसिद्ध झालें नाहीं, त्यातले फार थोडे उतारे कित्येक लोकांनीं पाहिले आहेत. तितक्यांवरून त्याच्यासंबंधानें बरेंवाईट मत बनविणें न्याय्य नाहीं. तिसरें — खिस्तायनाच्या कर्त्याला खिस्तायनाचा कर्ताच राहायाचें आहे. त्याचें व्यक्तित्व जसें असेल तसेंच त्याला पाहिजे आहे. वाल्मीकि, कालिदास, ज्ञानेश्वर, तुकाराम, मिल्टन, शेक्स्पियर इत्यादि महाकवींचें यश तर त्याला नकोच आहे, पण त्यापेक्षां खालच्या दर्जाच्या कवींकडेहि त्याचें लक्ष नाहीं. बरा, वाईट, जसा असेन तसा माझा मीच राहणार हेंचि त्याची प्रतिज्ञा आहे. तो कल्पवृक्षहि नाहीं आणि एरंडहि नाहीं. ह्या दोन्ही नांवाची त्याला किंमत नाहीं. त्याचें नांव तें त्याचें आहे. त्याचें स्वत्व त्याचें आहे"

ह्या सांप्रदायिकांसंबंधानें 'दत्तांच्या कविते'ला लिहिलेल्या प्रस्तावनेंत त्यांचे सुपुत्र श्री. विठ्ठलराव घाटे म्हणतात—

"अलीकडे केशवसुत गुरु होते, व त्यांच्या बरोबरीचे व नंतरचे कवि त्यांचे चेले होते, किंवा केशवसुतांनीं महाराष्ट्र काव्यांत नवजीवन आणलें व इतर कवि त्या पाण्यावर पोसले गेले, अशा प्रकारची भाषा व 'केशवसुतांचा सांप्रदाय' असे शब्द ऐकूं येऊं लागले आहेत व केशवसुतांच्या लोकप्रियतेमुळें त्यांना मान्यताहि मिळते. टिळक, विनायक, बालकवि, तांबे हे जीवंत प्रतिभेचे कवि आहेत. त्यांच्या काव्यावर, त्यांतील विचारावर भाषेवर त्या त्या कवीच्या व्यक्तीचे, त्याच्या अनुभवाचे, वाचनाचे, परिस्थितीचे संस्कार घडून प्रत्येकाच्या काव्यावर त्याचें शिक्कामोर्तब झालें आहे. केशवसुतांस नवजीवनाचे जनक म्हणण्यापेक्षा भारतवर्षाच्या नवयुगांत

ज्या अभिनव व परिणामकारी घटना झाल्या, जे जीवन-विचार खेळू लागले, जे महात्मे या नवीन विचारांस उच्चारूं व आचरूं लागले, त्या सर्वांचा केशवसुतांच्या मनावर परिणाम घडला तसा दुसऱ्या कवींच्या मनावरहि घडला असेल असें कां मानूं नये ? केशवसुतांच्या काव्यांत धर्माविषयीं, समाजाविषयीं, नीतीविषयीं, सृष्टीविषयीं कांही विशिष्ट मतें आहेत व इतर कवींनीं त्याचें अनुकरण केलें असें कोणीं सिद्ध केलें आहे का ? या सर्व मंडळींत केशवसुतांची कविता श्रेष्ठ होती, स्फूर्ति जाज्वल्य होती, हें सिद्ध करण्यासाठीं इतर कवींना परभृत बनविणें हाच एक मार्ग आहे काय ? भाऊ वडील म्हणून तो बाप होत नाहीं........ ...अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे केशवसुतांचें श्रेष्ठत्व आम्हीं नव्या पिढीनें मान्य केलें आहे. वीस वर्षांपूर्वी (आता ५० वर्षांपूर्वी) बहुजनसमाजास किंवा कवींना केशवसुतांमध्यें सर्व कवींपेक्षां कांहीं अपूर्व आहे असें वाटत नव्हतें व केशवसुत कवींना स्फूर्ति व ध्येय पुरविणारें केंद्रस्थान झाले नव्हते.”

केशवसुतांची स्तुतिस्तोत्रें जेव्हां गडकऱ्यांच्या तोंडातून बाहेर पडूं लागली तेव्हा, गडकरी वाङ्मयाची मोहिनी पडलेल्या सगळ्याच वाचकांना केशवसुतांची माहिती झाली. **ह्यापूर्वी (१९१५-१६ च्या पूर्वी) केशवसुतांची माहितीहि फारशी कोणाला नव्हती.** श्री. दत्तोपंत पोतदार म्हणतात —

“केशवसुतांचा संप्रदाय ! ही भाषा मला वाटतें ज्यावेळीं राम गणेश गडकरी यांची कीर्ति शिगेला पोंचली होती त्या काळीं केशवसुतांचे चेले म्हणून गडकरी यांचे उद्गार पाहून, चालू झाली. मीं ती अफाट चर्चा काळजीपूर्वक अभ्यासिली नाहीं पण केशवसुतांची कविता प्रसिद्ध करण्यास कारणीभूत झालेले त्यांचे निस्सीम भक्त माझे बालमित्र कै. दिवाकर व त्यांचे मार्गदर्शक गु. कै. प्रि. वा. ब. पटवर्धन, अनंततनय, आणि त्यांच्या पुरस्कारानें चाललेलीं नवीन कविमंडळें, मग त्यांतून निघालेला केशवसुतस्मृतिदिन उभा राहिला तो त्यांच्या पश्चात् टीकाकारांनीं भक्तांनीं आमच्या समक्ष उभा केलेला मीं पाहिला. टिळक ख्रिस्ती तेव्हां त्यांचें ख्रिस्ती वाङ्मय तितकेसें विचारांत घेतलें नसल्यास नवल नाहीं. पण कांहीं

आपल्यासारखे ज्ञानोदय (आणि सुबोधपत्रिका) पत्रांतून टिळकांचे भक्तिरसपूर्ण अभंग प्रसिद्ध होत असत ते वाचून त्यांना तुकारामाची चुणूक दाखविणारे म्हणून तेव्हांच ओळखीत असत तेव्हां नारायणराव टिळकांची स्फूर्ति उसनी आम्ही कशी म्हणणार ? " ( ३०-४-५२ खाजगी पत्र )

प्रा. भवानीशंकर पंडित म्हणतात—

" टिळकांचें धर्मान्तर व त्यामुळें झालेला अपसमज, केशवसुताचा अपमृत्यु व मराठीत आधुनिक कवींची कविता (स्फुट) प्रथमच आपल्यांनी पुस्तकरूपानें आणलेली—तिच्यावर डॉ गुणे, रहाळकर, प्रि राजवाडे यांचे मनोरंजनांत व ना म भिडे यांच्या उर्वेत गुणग्रहणात्मक लेख. गोविंदाग्रजांची ' केशवसुत कसचे मेले। निघतील तयाचे चेले। केशवपुत्राचा महशूर। गोविंदाग्रज चेला सच्चा। ' इत्यादि केलेला गाजावाजा, माडखोलकर, श्री बा. रानडे वगैरेंनी रूढ केलेला ' केशवसुत संप्रदाय ' किंवा ' परंपरा ' हा शब्द, गोविंदाग्रजांचें तुतारी मंडळ, स्वतः टिळकांनी केलेलें केशवसुतांचें गौरव—त्यामुळें ते केशवसुतांचे अनुयायी असावेत असा अकारण गैरसमज — "

टिळकांनीं केशवसुतांचें खरोखरच अगदीं पहिल्यापासून गौरव केलें.

केशवसुतांच्या कीर्तिमंदिराचा पाया टिळकांनींच खणला. १८९६ सालीं त्यांनीं आपली केशवसुतांवरील पहिली कविता लिहिली परंतु एखादी इमारत बांधतांना ढांसळूं लागली म्हणजे तिच्यात बळी देण्याची प्रथा असते म्हणतात तसा बळी पुढील कारागिरांना हवा होता. तेव्हां त्यांनीं टिळकांनाच उचलून त्यांत चिणलें टिळकांच्या धर्मान्तरामुळें तें करणें त्यांना सोपेंहि होतें. त्या कारागिरांत कित्येक डोळस होते, कित्येक अंध होते. कित्येक लबाड होते तर कित्येक भित्रे होते आणि वाचक ह्या आंतल्या गोष्टी माहीत नसल्यानें मिटक्या मारून त्यांचें लिखाण वाचीत होते. ह्या टीकाकारांची वर्गवारी करून नामनिर्देश करतां येईल परंतु तें मी वाचकांवर सोंपवितों. त्यावर कोणाला एखादा दीर्घ प्रबंध देखील लिहितां येईल

खुद्द केशवसुतांनीं आपला संप्रदाय स्थापन केला नव्हता कीं अमुक अमुक माझे शिष्य आहेत असें जाहीर केलें नव्हतें. कवि म्हणून केशवसुतांची योग्यता फार मोठी आहे. त्यांच्या कवितेनें मला एकदां वेडें केलें होतें " तुतारी, स्फूर्ति, नवा शिपाई, गोफण, निशाणाची प्रशंसा इत्यादि त्यांच्या कवितांत ओज आहे तें वाचकाच्या नसानसांत नवरक्ताचा संचार करतें आणि त्याला पुरुषार्थास प्रवृत्त करतें " हें श्री भवानीशंकर पंडितांचें म्हणणें मला पूर्णांशानें पटतें परंतु तेवढ्यानें चिकित्सक दृष्टि मंदावू देणें मूर्खपणाचें होईल.

# टिळक पतिपत्नी

मराठी वाङ्मयांत कांहीं विशेष कामगिरी केलेल्या कित्येक विद्वानांना मीं खालील शब्द सोडलेला धडा पाठविला होता. त्यांचीं आलेलीं उत्तरेंहि येथें देत आहें.

माझा शब्द सोडलेला धडा असा होता

" लक्ष्मीबाई जितक्या प्रतिव्रता होत्या तितकेच टिळक——होते लक्ष्मीबाईंचें पातिव्रत्य जितकें जाज्वल्य होतें तितकेंच टिळकांचें —— जाज्वल्य होतें."

ह्यावर आलेलीं उत्तरें

**प्रिं. कृ. पां. कुलकर्णी** ( मराठी व्युत्पत्तिकोशकर्ते ) :

पातिव्रत्य ' ह्या शब्दाला प्रतियोगी असा पत्नीव्रत किंवा पातिव्रत्य असा शब्द तयार करावयास हरकत नाहीं. परंतु तसा आजवर कोणीं केला नाहीं, व वापरलाहि नाहीं. पतिव्रता ह्याच्या जोडीला पत्नीव्रत असा शब्द कोणीतरी एकदादोनदां वापरलेला मला आठवतो रूढ मात्र नाहीं. परंतु तसा कोणी केला तर त्यांत वावगें नाहीं नवीन म्हणून मान्य होईल माझ्या मतानें सुचविलेल्या जागीं पत्निनिष्ठ हा शब्द योग्य होईल. ' लक्ष्मीबाई जितक्या पतिव्रता होत्या तितकेंच टिळक हे पत्नीनिष्ठ होते. लक्ष्मीबाईंचें पातिव्रत्य जितकें जाज्वल्य तितकेंच टिळकांचें पत्निनिष्ठत्व जाज्वल्य होतें, असें वाक्य होईल, परंतु हें वाक्य जरा शिथिल झालेलें दिसतें कारण **दोन्ही शब्द सारख्या जोराचे व वजनाचे नाहींत. दोहोंच्या उच्चारांत सारखा जोर नाहीं** अर्थात मात्र आहे. मी म्हणतों तुम्ही पत्नीव्रत असा शब्द कां न तयार करावा !

**महामहोपाध्याय द. वा पोतदार**

जो प्रश्न तुम्हाला पडला आहे तोच मलाहि पडलेला आहे **माझ्या मनाला मी तो प्रश्न आज अनेक वर्षे विचारीत आहें.** व्रत-रूपानें ' पत्नीव्रत ' हा प्रयोग ओसंडून जाईल इतका दिसतो पण पत्नी

केन्द्र समजून **पत्नीनें तिचें व्रत करायचें अशी आमची जुनी मांडणीच नाहीं.** पत्नी अर्धांगी म्हटली आहे तरी पुरुष 'अर्धांगी' म्हटला नाहीं. तशी कल्पना आहे पण ती गुप्त असल्या सारखीच आहे. थोडें परंपरनें, थोडें नवीनच म्हटलें तरी चिंता नाहीं पत्निपरायण ( व असे शब्द ) वापरावे.

## श्री न. र. फाटक

पातिव्रत्य हा शब्द पतिव्रता या स्त्रीलिंगी शब्दाचा भाववाचक असल्यामुळें त्याला जें रूप आलें आहे तें पत्नीव्रत या शब्दाला प्राप्त होत नाहीं. रामाचें 'एक पत्नीव्रत' विख्यात आहे व तोच शब्द आपण टिळकांसंबंधानें वापरावा. त्याला कमलाच, म्हणजे संस्कृत भाषेचा किंवा लोकव्यवहाराचा प्रतिबंध नाहीं.

हिंदु बायकांना दुसऱ्या पतीचा संबंध कल्पनेंतहि पूर्वीं शिवत नसल्या-मुळें त्यांना पतिव्रता म्हणजे ( एक पतिव्रता ) हा शब्द चालत होता. पुरुषांची स्थिति तशी नव्हती म्हणून एक या शब्दानें त्यांच्या पत्नीव्रता-ला स्पष्ट करणें अवश्य होतें

## श्री. भवानीशंकर पंडित

ते 'एकपत्नीव्रत होते' किंवा 'पत्नीपरायण होते' किंवा त्याचें 'एक पत्नित्वाचें व्रत' किंवा 'पत्नीपरायणता' असे प्रयोग करण्यास हरकत नाहीं.

## श्री. ग. त्र्यं. माडखोलकर

माझे तरुण मित्र 'राष्ट्रशक्ती'चे संपादक, येथील सुप्रसिद्ध संस्कृत पंडित आणि 'संस्कृत' 'भवितव्यत्'चे संपादक प्रो श्री. भा. वर्णेकर यांना आपलें पत्र दाखविलें. ते रामायण पाहून एक दोन दिवसांत अधि-कृत सुचवितील.

दरम्यान त्यांनीं 'एकपत्नीव्रत' या प्रचलित शब्दाला धरून 'पत्नीव्रती' 'पत्नीनिष्ठ,' 'एकपत्नीव्रतत्व' वगैरे शब्द सुचविले आहेत."

वरील उत्तरात एक गोष्ट—जी मीं अपेक्षिली होती तीच—स्पष्ट होते की भारतांतील स्त्री आपल्या पतीच्या बाबतींत जी निष्ठा, जें पावित्र्य, जें एकपत्नीव्रत पाळते तें पुरुष पाळीत नाहीं व त्यामुळें भाषेंत—निदान मराठी भाषेंत तरी—पतिव्रता व पातिव्रत्य ह्यांना जोडीदार शब्द नाहींत

त्या बाबतींत टिळकांनीं जी क्रान्ति केली आहे तिला मराठी भाषेंत तोड नाहीं अर्थात् टिळकांच्या ह्या क्रान्तींत नगारेतुताऱ्या नाहींत, आरडाओरडा नाहीं, कंठशोष नाहीं, कांहीं नाहीं. पण ही क्रान्ति श्री राजाध्यक्षांनीं ओळखली. ते म्हणतात—

> " सहसा काव्याला घराबाहेरचें वारेंच अधिक मानवतें आणि टिळकांचें घर ज्या व्यक्तींत केंद्रित झालें होतें त्या 'कुणीतरी' विषयीं त्यांनीं अनेक रसाळ कविता लिहिल्या. त्याचा नूर इतका सोज्वळ आहे, कीं त्यांना 'प्रेमगीतें' म्हणतांना मन कचरावें, इतकें काव्यक्षेत्रांतील प्रेमाचें उत्तानतेशीं साहचर्य आहे ! त्यांनीं स्त्रीला महारथी म्हटलें, संसारांतील तिचें स्थान ओळखलें, पण प्रेमाच्या तुफानी आवेगांत तिची अचाट स्तुति केली नाहीं !.. ... ('५ कवि' पृ० ४०)

पण टिळकाचें हें प्रेम वैषयिक नव्हतें. त्यांनीं ज्या स्त्रीवर आपल्या प्रेमाची पाखर घातली, जिच्या बाबत त्यांनीं 'पातिव्रत्य' पाळलें, ती कोणी लावण्यवती अप्सरा होती असें नाहीं. ह्याबाबत खुद्द त्यांची प्रेयसी आपल्या लावण्याबद्दल म्हणते—

> " माझें रूपरंग अगदी बेताचेंच होतें. बाकी नाकडोळे जरी रेखीव नव्हते तरी ते होते व अगदीं जागच्या जागीं होते. " (स्मृतिचित्रें भाग १ )

आणि टिळकानाहि त्याची जाणीव होती—

'न चंद्राची किंवा मुख न कमळाची करि सरी
न वर्ण स्वर्णाचा मदिय दयितेचा मद हरी
न तीच्या मध्याला बघुन हरि रानांत लपला
अती साधी रूपें मदिय गृहिणी एक अबला.

खरे ईश्वरदत्त सौंदर्याची देणगी नसली तरी सौंदर्यप्रसाधनांनीं तरी ती ती उणीव भरून काढते आहे का ?

नटावें कैसें तें मुळिंच न अहो, ठाउक तिला
न ती वेडी भोळी शिकलि कधिं मत्तेभगतिला
विलासांनीं युक्त स्मित नच तिचें, तें सहज ये
कटाक्षक्षेपाची रुचिर सरणी ती तिज न ये.
तिची वाणी साधी मधुर मजला मात्र गमते
शरीरीं तीच्या कीं, वचनिं न अलंकार लघु ते.
जिला लोकीं कोणी रसिक म्हणती ती तशि नसे
परी काव्याहोनी मज अधिक ती हो रुचतसे

(माझी भार्या १८८७ आवृत्ति)

श्री रेंदाळकर कवि वेळोवेळीं म्हणत असत कीं—

" शुद्ध प्रेमाचा विचार आधुनिक कवींत फक्त दोघांनींच केला आहे. व ते प. वा. केशवसुत व प वा रे. टिळक हे होत. " (मनोरंजन ज्या. १९२१ रेंदाळकरांचा मृत्युलेख. श्री भा ग नवरे )

प्रा राजाध्यक्ष ह्या बाबतींत केशवसुतानाहि पुरे गुण द्यायला तयार नाहींत ते म्हणतात—

" टिळकांचें तें पत्नीप्रेम केशवसुतांच्या तसल्या कवितांप्रमाणें मादक नाहीं "

टिळकांनीं कुणीतरी ' विषयीं अनेक रसाळ कविता लिहिल्या. ' माझी भार्या काव्याच्या (१८८७) प्रस्तावनेंत टिळक म्हणतात—

" या काव्यांत साधी, निष्कपट, मनाची सरळ आणि स्वपतीवर प्रेम करणारी अशी एक स्त्री कल्पून तिचें वर्णन, तिच्या पतीच्या मुखानें केलें आहे.... आपल्या या महाराष्ट्रांत असल्या बायका अद्यापि आहेत आमच्या पाहण्यांत आहेत. "

प्रस्तुत काव्य टिळकांनीं प्रथम १८८७ मध्यें प्रसिद्ध केलें. १९१४ सालीं टिळकांच्या कवितेंची जुळवाजुळव करतांना रे. भास्करराव उजगरे ह्यांनीं ह्या कवितेची नवी हस्तलिखित प्रत करून टिळकांना दाखविली त्या प्रतींत टिळकांनीं पुष्कळच फेरफार केले आहेत. पहिल्या काव्यांत ७५ श्लोक होते ते कमी करून सुधारलेल्या काव्यांत त्यांनीं फक्त ४१ श्लोक ठेवले. त्यांतहि पुष्कळ नवीन आहेत. जुन्या आवृत्तींत उघड उघड लक्ष्मीबाईंना उद्देशून जे श्लोक होते ते हीन गाळून टाकण्यांत आले आहेत. नवीन काव्य अधिक सफाईदार व प्रौढ झालें आहे

"केलें काव्य परंतु ह्यांत मम हो संबंध कांहीं नसे"

असें टिळकांनीं दोन्ही आवृत्तींत बजावलें असलें तरी पहिल्या आवृत्तींतील खालील कांहीं कांहीं ओळींवरून तें लक्ष्मीबाईंवर लिहिल्याचें अगदींच स्पष्ट होतें.

"स्वभावानें भारी चपळ वरती रागीट असे
दशामध्यें रोगी ! हरहर असा नाथ मिळतां
समाधानें नांदे कवण युवती ती न रुसता
परी माझी भार्या किती तरि समाधान धरिते"
"घरीं एके वेळीं चिमुटभरही धान्य नव्हतें
अशामध्यें आले अतिथि चवथे द्वारिं मम ते
तयीं आली माझ्या जवळ नयनें आधिं पुशिलीं
किती चातुर्यें ती हळुच वचना गोड वदली
स्वयें देतां झाली लवुतर अलंकार विकण्या
म्हणे 'मी सोन्याला पतिहुन उणें मानि' ललना-"
"'सख्या हा काव्याचा सतत अपणा छंद न बरा
सुचे ना त्या योगें धनद कधिं उद्योग दुसरा'"
"क्षुधा मी बोलावें कठिण वचनां त्या सुमतिला
परी त्या वेळीं ती लवण न घरीं काय करुं हो
न बोले ऐसे कीं---"
"पितामाता तीचीं सधन पहिल्यापासुन अती
मला कन्यादाना करुन अनुतापें विकल तीं
नको मी त्यांलागीं सतत अपमानास करिती---
प्रियेचें त्यांच्या ते मन न सहवासें बिघडलें."

(ह्यांतील 'पितामाता' असा उल्लेख आहे तो लक्ष्मीबाईंना मातापित्याच्या जागीं असलेल्या त्यांच्या आत्याबाई व खांबेटे ह्यांच्यासंबंधीं आहे.)

'केलें काव्य, परन्तु यांत मम हो' वगैरे चार धाम्यांच्या विरविरीत पडद्यां-तून सत्य बाहेर डोकावतें आहे हें स्मृतिचित्रांचा पहिला भाग ज्यांनीं वाचून पाहिला असेल त्यांच्या तेव्हाच ध्यानांत येईल

माझ्या माहितीप्रमाणें टिळकांची कविता भाग १ ह्यांतील 'तुम्हि कवी भिकारिण' (१७), 'माझी भार्या' (६१) 'महारथी' (६९), 'ओझरतें दर्शन' (७४), 'मला काय मिळालें आहे' (७६) व पुरवणींतील 'प्रियेचें पुनर्दर्शन' (पु. पा १) इतक्या कविता टिळकांनीं लक्ष्मीबाईंवर लिहिल्या आहेत.

ह्यापैकीं 'ओझरतें दर्शन' व 'प्रियेचें पुनर्दर्शन' ह्या दोन कवितांचे प्रसंग टिळकांनीं प्रिन्सिपल पाटणकरांना व मला सांगितलेले आहेत. लक्ष्मीबाई टिळकांकडे येण्याच्या आधीं पंढरपुरास टिळकांनीं त्यांना टांग्यातून जातांना ओझरतें पाहिलें त्यावर त्यांनीं पहिली कविता (पा ७४) लिहिली व जलाल-पुरास लक्ष्मीबाईंना भेटून आल्यानंतर दुसरी कविता (पु पा १) लिहिली

जळगांवला पहिलें कविसंमेलन भरलें लक्ष्मीबाई म्हणतात—

"जळगांवला जाण्याचा टिळक मला आग्रह करूं लागले. पण पोट दुखत होतें—तशांत घरांत म्हशी होत्या—त्यांच्याकडे माझें लक्ष—तेव्हां मी कशी जाणार? पण मीं एक कविता लिहून जळगांवच्या संमेलनास पाठवून दिली.'

ती कविता वाचून टिळकांचें मन भरून आलें त्यांनीं लक्ष्मीबाईंना उद्देशून 'तुम्हि कवी भिकारिण मी हो तुमच्या दारीं—असें म्हणणारीस' ही कविता लिहिली (पृ १७)

वरील कविता 'वेडागोळा पदरिं पडला त्याप्रति—' उद्देशून लिहिलेल्या आहेत. पण त्याच 'वेड्यागोळ्या'ला आपल्या शुद्ध प्रेमाच्या जोरावर टिळक कवींनीं मराठी वाङ्मयांत मानाचें स्थान मिळवून दिलेलें आहे. टिळकाच्या कवितेचा कवित्वाचा व व्यक्तित्वाचा परिणाम पुष्कळांवर झालेला आहे. त्याचें वर्णन लक्ष्मीबाईंच्या पति-पत्नी ह्या कवितेंत सांपडतें पण खुद्द लक्ष्मीबाईंवर जो परिणाम झाला त्याला मराठी वाङ्मयात तोड नाहीं. प्रा. पंडिताच्या माहिती प्रमाणें:

चवदाव्या शतकाच्या पूर्वार्धांत मुक्ताबाई व जनाबाई ह्या दोन नामवंत कवयित्री होऊन गेल्या निवृत्तिनाथ, ज्ञानदेव, सोपानदेव ह्यांची कनिष्ठ बहीण मुक्ताबाई, आपल्या बंधूंचा परिणाम तिच्यावर झाला असला तर नामदेव ह्या भक्त कविची दासी जनाबाई हिच्यावर व सर्वच नामदेव कुटुंबावर नामदेवांचा परिणाम झालेला दिसतो. त्यानंतर सतराव्या शतकांत श्री समर्थ रामदास ह्यांच्या प्रसिद्ध शिष्या वेणाबाई, बयाबाई व अंबाबाई ह्यांनीं समर्थांच्या प्रभावानें कवित्व केलें त्याच काळांत संत तुकारामाची शिष्या बहिणाबाई प्रसिद्धीला आली. पुढें विसाव्या शतकापर्यंत प्रसिद्ध अशा कवयित्री आढळत नाहींत. ह्या शतकांत मात्र टिळक, बेहेरे, रानडे इत्यादि कविकवयित्रींचीं जोडपीं प्रसिद्धीला आलीं. ह्यांतील बेहेरे किंवा रानडे ह्यांच्या पत्नी लक्ष्मीबाई टिळकांप्रमाणें ‘ वेडे गोळे ’ नव्हत्या. लक्ष्मीबाई बेहेरे ह्या तर आपल्या पतीची सुप्त प्रतिभा जागृत करण्यास कारणीभूत झाल्या तर मनोरमाबाई रानडे ह्या लग्नाच्या आधींपासून कवित्व करीत होत्या. तीच गोष्ट देशपांडे पतिपत्नींबद्दल म्हणतां येईल हीं युग्में परस्परावलंबी नसून त्यांतील घटक स्वतंत्र प्रतिभेचे होते. टिळक व लक्ष्मीबाई ह्यांच्या बाबतींत मात्र नामदेव-जनाबाईप्रमाणें एकाच्या प्रभावी व्यक्तित्वाचा परिणाम दुसऱ्यावर झाला असें म्हणतां येईल.

लक्ष्मीबाईंना आपल्या माहेरीं वाङ्मयाचें किंवा विद्वत्तेचें यत्किंचितहि बाळकडू मिळालेलें नव्हतें तरी—

> नदी सागरा मिळे, मिळे तों तदाकार ती होई
> तशी कन्यका स्वपतिकुलीं ती निविष्ट होउन जाई

ह्या लक्ष्मीबाईंच्या साक्यांत वर्णन केल्याप्रमाणें त्या टिळकांच्या जीवनांत एकरूप होऊन गेल्या टिळकांच्या व्यक्तित्वाचा हा महिमा केवढा मोठा म्हणावा! लक्ष्मीबाई ह्याबाबत म्हणतात—

> ‘ ह्यांत वाणायाचें झालें तर तें टिळकांनाच वाणलें पाहिजे ते माझे गुरु होतें. त्यांनीं मार्ग दाखविला, कीं त्या मार्गानें डोळे झांकून बेधडक पळण्याचें काम मात्र माझें असे.”

मात्र ह्यावरून लक्ष्मीबाई आपलें अस्तित्व अजिबात टिळकांच्या ठायीं गमावून बसल्या होत्या असा समज झाल्यास तो चुकीचा ठरेल. दोघांचें व्यक्तित्व कायम

होतें व म्हणूनच त्यांचें स्मृतिचित्रांत ठिकठिकाणीं वर्णिलेले खटके उडत परंतु त्या केवळ पृष्ठभागावर उठणाऱ्या लहरी होत्या त्याच्याबद्दल लक्ष्मीबाई म्हणतात—

"भवनिधिमधल्या सुखदुःखांच्या लहरींनीं भिजवोनी।
हीं प्रेमाची गांठ सोडिली अभेद्य विधि करोनी"

टिळक तर लक्ष्मीबाईंना 'महारथी' म्हणून त्यांचें सारथ्य करायला सदा तयार आहेत.

येनेन तव सारथी तुज जपेन जीवापरी
असो सरळ मार्ग, वा गिरि असो, असो वा दरी
जगाज्जनक-योजना, तशि मदीय उद्योगिता
रथा सबल अश्विनी, करूं नका विलंबा अता!
पहा 'इह' 'परत्र' हीं उभय रम्य चक्रें किती!
न केवळ विभूषणें, परि रथास देती गती,
सदा तुज पुढें उभा जुळुन मी करा सारथी,
त्यजून भय, हो पुढें! धर वधू सुवीरा धृति.

सारथ्यानें महारथीला 'आयुष्मत्' म्हणायचें बाकीचे 'महाराज' 'राजाधिराज' वगैरे म्हणत सारथी हा वडील असे हे सारथी वडिलापासून किंवा पितामहापासून असायचे दुर्योधनाच्या सारथ्यानें त्याच्या जिवावरचें संकट ओळखून, त्याच्या हुकमाची वाट न पाहताच त्याला रणांगणावरून सुखरूप पळवून आणलें होतें. शल्यानें कर्णाला शेवटला सर्पबाण सोडतांना संधान बदलण्याचा सल्ला दिला. अर्जुनाला तर कृष्णसारथ्यानें गीतेचा उपदेश केला सारथी हा नुसता 'कोचमन' नसे. तर त्याच्याकडे एक तऱ्हेचा वडिलकीचा अधिकार असावयाचा. टिळक त्रीला महारथी म्हणतात व पुरुषाकडे सारथ्याची भूमिका घेतात तीहि या वडीलकीची जाणीव ठेवूनच.

विद्वान् लोकांनीं आजपर्यंत मृदु विशेषणें देऊन या महारथीची मति 'भीरु' करून ठेवलेली आहे. परंतु कृष्णानें जसें अर्जुनाचा 'मोह' दूर करून त्याला ताळ्यावर आणलें तसेंच हा सारथीहि "त्यजुनि मोह हा समजुनी स्वरूपा निजा, स्वकार्यरत हो वधू —" म्हणून महारथीला कार्योन्मुख करण्याचा यत्न करतो.

टिळक: नको मज वित्त नको मज नाव
तुझ्यासाठीं घाव माथां पडो

भारताला हिंदुस्थान न म्हणता हिंदिस्थान म्हणण्याची प्रथा टिळकांनीं पाडली. ती बालकवींनीं उचलली होती. (बालकवींची समग्र कविता पृ० ५३ पृ० ५४ पद टीप) आपल्याला कविता करण्याची स्फूर्ति झाली ती मनोरंजनातील 'सृष्टीची भाऊबीज' ही कविता वाचून असें ठोमरे म्हणत असत. (मनोरंजन पृ. २३: भा. ५. पृ. ४२०)—परंतु एवढ्यावरून बालकवींची कविता टिळकांच्या कवितेसारखी आहे असें मुळींच नाहीं. खुद्द टिळकांच्याच म्हणण्याप्रमाणें—

"त्याची कविता त्याचीच आहे. कल्पनांचें सहजपण, रचनेचें सारल्य, आणि वर्णमाधुर्य हे त्यांच्या कवितेचे गुण म्हणजे त्यानाच ईश्वराकडून मिळालेली संपत्ति होती, 'अरुण,' 'संध्यारजनी,' 'निर्झरास,' 'फुलराणी' वगैरे त्यांच्या कविता निरंतर त्यांच्याच म्हणून अर्वाचीन विदग्ध वाङ्मयांत शोभणाऱ्या आहेत. ठोमऱ्यांना 'सृष्टीची भाऊबीज' रचणाराकडून कवित्वासंबंधीं फारसें साह्य झालें नाहीं; परंतु ते मात्र ही कविता रचणाराला अनेक प्रसंगीं स्फूर्तिदाते झाले आहेत."

टिळकांच्या निदान दोन कवितांच्या बाबतींत बालकवि टिळकांचे स्फूर्तिदाते नक्कीच झाले होते असें म्हणायाला हरकत नाहीं. त्या म्हणजे 'पांखरा येशिल का परतून' (टि. क. पृ १०७) व 'एका उन्मनस्काला पाहून' (टि. क. पृ. ११८) ह्या होत.

बालकवींवर टिळकांचा परिणाम झाला नसला तरी बालकवींचा टिळकांवर झाला होता असें म्हणणारे कांहीं विद्वान् निघाले होते! बालकवि टिळकांना 'अनेक प्रसंगीं' स्फूर्तिदाते झाले म्हणजे ते त्यांचे गुरु झाले असें नव्हे. केशवसुतांच्याबाबतींत टिळकांनीं भावनोत्कटतेच्या भरांत केलेल्या कांहीं विधानावरून

त्यांच्यावर जो अनवस्थेचा प्रसंग ओढवला त्याहिपेक्षां भयंकर प्रसंग ठोमऱ्यांच्याबाबतींत ओढवला होता. तो प्रसंग ता. ५ ५-१९२९ चा आहे. त्या वेळीं बालकवींच्या स्मृतिदिनानिमित्त नाशकास श्री. नाथ निफाडकर ह्यांनीं सभा भरवली होती तींत त्यांनीं व त्यांच्या मित्रमंडळीनें अशी एक शक्कल काढली, कीं नादमाधुर्याच्या दृष्टीनें 'वनवासी फुला'वर बालकवींच्या भाषेचा परिणाम झालेला आहे! टिळक व बालकवि ह्या दोघांना नगरास नित्य पाहणारे श्री. भा. ल पाटणकर ह्यांनीं सभेंत व नंतर लेखी उत्तरें देऊन त्यांना गप्प बसविलें.

श्री. पाटणकरांनीं तारीखवार दिलेलें उत्तर असें होतें—

"वनवासी फूल रे. टिळकांनीं ख्रिस्ती होण्यापूर्वी म्हणजे १८९५ पूर्वी लिहिलें होतें. श्री मित्र यांच्या आग्रहावरून १९०३-४ च्या दरम्यान त्यांनीं तें काव्य छापण्यासाठीं श्री. मित्र यांजकडे दिलें. १९०४ सालीं कुसुमगुच्छ या नांवाच्या कवितासंग्रहात तें 'एका फुलाचा इतिहास' या नांवानें छापलें गेलें. १९०९ सालीं त्याची सुधरलेली म्हणजे सुमारें १२०-१४० पंक्ती नव्या घालून तयार केलेली आवृत्ति 'वनवासी फूल' या नांवानें तयार झाली. त्याला आक्टोबर १९०९ मध्यें रा. सा. वा. गो. कानिटकर यांनीं प्रस्तावना लिहिली.

"बालकवि १९१० मध्यें रे. टिळकांकडे नगरास राहण्यास आले. १९०४ व १९०९ च्या 'वनवासी फुलां'तील भाषा शैली अगदीं एकसारखी आहे. .. उपरिनिर्दिष्ट पुस्तकें कोणाला पहावयाचीं असतील तर तीं माझ्याकडे पहावयास मिळतील"

हें तारखांचें मेंडोळें घशांत जाऊन टीकाकार चीत झाले होते तरीहि ते शेवटपर्यंत म्हणतच होते, कीं "पाटणकरांनीं दिलेल्या तारखांप्रमाणें अनेकांचा समज आहे. पण त्यांत सार सारस्य नाहीं." (कोहिनूर २५-५-१९२९)

बालकवींवर टिळकांचें पुत्रवत् प्रेम होतें. लक्ष्मीबाई तर त्यांना आईच्या जागीं होत्या. परंतु जुन्या एकत्र कुटुंबांत वडील माणसांबद्दल आपुलकी व आदर यादत असूनहि मैत्री नसे तसें टिळकांच्या बाबतींत ठोमऱ्यांचें होई. ठोमऱ्यांना

मनमोकळेपणा, त्याचें काव्यगायन, त्याचा विनोद, विद्वत्ता, आनंद हीं सारीं स्वैपाकघरांत चालत. ठोमरे स्वैपाकघरांत लक्ष्मीबाईशीं व अंगणांत आमच्याशीं बालकवि ह्या शब्दाच्या पहिल्या भागाचें तेवढें प्रदर्शन मोठें छान करीत पण तसें म्हटलें तर आम्ही कोणीच त्याची काव्यप्रान्तांतील भूक भागविण्यास समर्थ नव्हतों. टिळकांच्या वडीलपणाच्या नात्यानें होत असलेल्या दूरपणानें व आमच्या मानसिक पातळीचा थर त्या मानानें फारच खालचा असल्यानें, ठोमऱ्याना तेथें त्यांच्या काव्यजीवनांत शोभणारे मित्र लाभले नाहींत.

टिळकांच्या कांहीं कवितांचें स्फूर्तिस्थान बालकवि ठोमरे होते त्या 'पांखरा येशील का परतून' व 'एका उन्मनस्काला पाहून' ह्यांचें सूक्ष्म अवलोकन केल्यास टिळकांच्या व ठोमऱ्यांच्यामध्यें वात्सल्य व प्रेम, किंवा आदर व प्रेम हीं असलीं तरी 'मैत्री' नव्हती हें दिसून येईल तशी 'मैत्री' असावी असें टिळकाना फार वाटे पण वडिलकीचें नातें आड येई

वर उल्लेखलेल्या दोन्ही कविता बालकवींनाच उद्देशून लिहिल्या आहेत अशी आतां माझी खात्री झाली आहे. कारण मनोरंजनाच्या ( पृ. २३ ऊ. मा. ७ मे १९१९ ) च्या अंकात श्री. मित्रांनीं लिहिलेल्या बालकवींच्या मृत्युलेखांत ते म्हणतात—

"एकादी कविता लिहीत असताना किंवा एकाद्या कवितेचें स्पष्टीकरण करीत असतांना (बालकवींची) वृत्ति इतकी तल्लीन होत असे, कीं तें देहभान विसरून जात अशा वृत्तींत एकदा ते असताना त्यांना श्रीयुत टिळक यांनीं हळूच पाहून पुढें दिलेली '**एका विमनस्काला पाहून**' ही अत्यंत सुंदर कविता लिहिली"

व

"ठोमऱ्यांनीं अहमदनगर सोडल्यावर श्रीयुत टिळक यांनीं ज्ञानोदयांत एक कविता प्रसिद्ध केली तीवरून त्र्यंबकरावांवर श्रीयुत टिळक यांचें किती प्रेम होतें हें लक्षात येतें. ती कविता **पांखरा! येशील का परतून** ही होय."

ह्याच लेखाच्या पुढें टिळकांनीं लिहिलेला बालकवींचा मृत्युलेख आहे. तेव्हां हीं विधानें टिळकांच्या नजरेस आलेलीं होतीं ह्यांत शंका उरत नाहीं. व पुढें टिळक कांहीं काळ जिवंत होते. हीं खरीं नसतीं तर टिळकांना तीं खोडून काढण्यास अवधि होता.

ह्याशिवाय ह्या कविता बालकवींवरच लिहिल्या होत्या असें श्री भास्करराव उजगरे सांगत 'पांखरा येशिल का परतून' ही कविता जेव्हा पुणें येथें उजगऱ्यांच्या घरीं टिळकांनीं बालकवींना वाचून दाखविली तेव्हांची आठवण श्री. भा. ल. पाटणकर आपल्या 'बालकवींच्या समग्र कवितें'त (पृ० ३६) अशी देतात —

> "इ. स. १९१४ च्या जूनमध्ये बालकवि पुनः पुण्यास रहावयास गेले. ह्या सुमारास पांखरा, येशिल का परतून ?' ही टिळकांची सुप्रसिद्ध कविता प्रसिद्ध झाली. टिळकांना ही कविता मनोरंजनाच्या मुखपृष्ठावरील उडत्या पाखरावरुन सुचली असो किंवा पिंजऱ्यांतून उडालेल्या पक्ष्याला उद्देशून लिहिलेली असो पण ती लिहितांना नगर सोडून गेलेल्या बालकवि ठोमऱ्यांना म्हणून दाखविली तेव्हां ती ऐकतांना बालकवींचे डोळे भरून आले. कारण त्या कवितेंतील प्रत्येक ओळ बालकवींना लागू होई. बालकवींनाहि तें अक्षरशः पटलें ! अश्रूंनीं त्यांचे डोळे डबडबले व टिळकांना आपले अश्रू दिसूं नयेत म्हणून बालकवि आंतल्या खोलींत गेले."

ह्याच सुमारास श्री. मित्रांनीं टिळकांना देण्यासाठीं मजजवळ एक मोठें कॅलेंडर दिलें होतें त्यावर एका तरुणीचें चित्र असून पुढें एक पक्षी उडून जातो आहे असें दाखविलें होतें. हें चित्र नगरास आणून मीं टिळकांच्या टेबलासमोर भिंतीवर लावून ठेवलें होतें व कविता त्याच चित्रावरून त्यांना स्फुरली असावी असा माझा समज होता. परंतु खरें पाहता टिळकांच्या अंतर्मनांत बालकवींच असावेत असें श्री. पाटणकरांप्रमाणें मलाहि आतां वाटतें. पृ० १०४वर म्हटल्याप्रमाणें ठोमऱ्यांच्या काव्यजीवनांत शोभणारे मित्र त्यांना नगरांत लाभले नाहींत परंतु ती उणीव तेथल्या अत्यंत प्रेमळ अशा वातावरणानें भरून काढली होती. तेथें त्यांचा आपपरभाव नाहींसा होऊन जात असे. तेथें ते आपण कोणी

मोठे कवि आहों हें विसरून जात असत. तेथें त्यांचें जीवनच काव्य बनत असे. 'बालकांस मजजवळ येऊं द्या. त्यांना मना करूं नका, कारण स्वर्गाचें राज्यच असल्यांचें आहे.' हें ख्रिस्ताचें म्हणणें त्यांच्या तेथील जीवनाला तंतोतंत लागू पडे. येथें त्यांची बालवृत्ति पूर्णपणें अवतीर्ण होई. बालवृत्ताला संशय, व्याज, वक्रता, उपचार ह्यांचें फार मोठें वावडें असतें. ह्या गोष्टी ते नगर सोडून गेले म्हणजे त्यांच्या मनांत भरकून दिल्या जात व मग —

'ती स्वप्नसृष्टि जळाली,
गाण्याची तार गळाली
काजळी चढे वरखालीं—'

अशी ह्या 'कविबाळा'ची तऱ्हा व्हायची.

पुण्यास असे त्यांचियाच वयाचे व बरोबरीचे उत्तमोत्तम कविमित्र त्यांना मिळाले होते. पण तेथें ह्या भावड्या जीवाची काय ओढाताण होत असेल हें श्री कमतनूरकरांच्या एका पत्रावरून स्पष्ट होतें. श्री. कमतनूरकर गोविंदाग्रजांच्या टिळकांबद्दलच्या दृष्टिकोनाविषयीं लिहितात—

"आपण विश्वास ठेवा कै. कविवर्य टिळकांबद्दल, कवि म्हणून कै. गडकऱ्यांना गाढतर प्रीतीच होती. व्यक्ति या नात्यानें कै. टिळकांबद्दल असलेल्या आदराचे रंग पुष्कळसे पुसट व्हावयास, कै. टिळकांनीं कै. ठोमरे यांबद्दल जो पुढें पुढें दुरावा निर्माण केलेला होता—कै. ठोमरे यांच्याच निवेदना-वरून—तो दुरावाच कारणीभूत झालेला असावा—नव्हे होता."

हें पत्र वाचून कांहीं वेळ तर मी थक्कच होऊन बसलों. 'दुरावा' ह्या शब्दाचा अर्थ तरी काय? मी महाराष्ट्र-शब्दकोशांत तो शब्द काढून मुद्दाम पाहिला. त्याचा अर्थ कोशांत—१. दूरपणा, अंतर २. (दूरदेशीं भोगावे लागणारे) कष्ट असा सांपडला.

टिळकांनीं—आणि ठोमऱ्यांना दूर लोटलें किंवा कष्ट दिले हें त्या दोघांना ओळखून आतां लोटलेल्या पस्तीस वर्षांच्या काळांत मला एकदाहि—स्वप्नांतसुद्धां

वाटलें नाहीं. आणि श्री. कमतनूरकर म्हणतात कीं त्यांनीं हा 'दुराव्या'चा आरोप प्रत्यक्ष बालकवींच्या तोंडून, आपल्या स्वत:च्या कानांनीं, एकदाच नव्हे तर ३/४ वेळेस ऐकलेला आहे !

पृ० ७० वर मीं जें ध्वनित केलें आहे, कीं गडकऱ्यांमुळें ठोमरे विचलित होत होते ते असें :

कवितेंत गडकरी फार सुधारणावादी होते मात्र खरोखर खाजगी जीवनांत ते कसे होते हें त्यांचे अगदीं निकटचे मित्रच सांगूं शकतील. परंतु ठोमरे जेव्हां जेव्हां पुण्याहून आमच्याकडे परतत तेव्हा तेव्हां टिळककुटुंब आपल्याला 'बाटविण्या' साठीं आपल्यावर खोटें खोटें दिखाऊ प्रेम करतें ह्या संशयपिशाचानें झपाटून यायचे. त्याच काळांत गडकऱ्यांशीं अगदीं निकट संबंध आलेले श्री. वि. स. खांडेकर ह्यांना गडकऱ्यांच्या ह्या स्वभावासंबंधीं विचारतां ते लिहितात—

" मी गडकऱ्यांच्या सहवासांत दोन वर्षें होतों. त्यांच्या स्वभावांत भावना-प्रधानता व एकांगीपणा ह्या गोष्टी अधिक प्रमाणांत होत्या. काव्यांत प्रसादा-पेक्षां कल्पकतेकडेच त्यांचा ओढा अधिक असे, त्यामुळें ते कवि या नात्यानें केशवसुतांइतका मान टिळकांना ते[redacted]दत नसत हें खरें आहे परंतु या मतांत अप्रीतीपेक्षां आवडीनिवडीचाच भाग अधिक असावा कोटिबाजपणामुळें त्यांचें बोलणें अतिशयोक्तीचें असे त्यामुळें त्यांची वाक्यें न मतें पारखून घ्यावीं लागत ....... ......... .......बुद्धिदृष्ट्या सुधारक पण **भावनेच्या दृष्टीनें सनातनी अशी त्यांची वृत्ति होती.** लेखका-च्या वृत्तीकडे व मनाकडे आपण मानसशास्त्राच्या दृष्टीनें पाहिलें पाहिजे असें मला वाटतें "

श्री. खांडेकरांच्या सूचनेप्रमाणें येथें थोडें मानसशास्त्राच्या दृष्टीनेंच पाहूं या.

१ बालकवींना साहजिकपणें मधून मधून जी कडकडून भूक लागे ती बरोबरीच्या व आपल्या तोलाच्या मित्राची. 'जे मित्र आपल्या काव्यजीवनांत शिरू शकतील असे मित्र त्यांना हवे असत.

२. नगरास ह्या दृष्टीनें त्यांचे मित्र बनण्यासारखी एकच व्यक्ति म्हणजे टिळक होते. पण टिळक फारच वडील !—२९ वर्षांचें दोघांच्या वयांत अंतर ' मानमान्यतेनें त्यांची बरोबरी एका इंग्रजी पांचवी-सहावी इयत्ता शिकणाऱ्या विद्यार्थ्यांशीं कशी होणार ? त्यामुळें एक प्रकारचा न्यूनगंड आलेला. श्री सखारामपंतांनीं त्यांना अरे तुरे केल्यामुळें त्यांना केवढा राग आला होता हें स्मृतिचित्रांत पहायला मिळतें. टिळकांना ते मान देत खरे परंतु असल्या न्यून-गंडामुळें त्यांच्याशीं बरोबरीच्या नात्यानें—मैत्रीनें वागणें त्यांना शक्य होत नव्हतें.

३. पुण्यास त्यांना ही उणीव भासत नसे. व तेथें गेल्यावर टिळकां-बद्दलच्या प्रेमामुळें व आदरामुळें त्यांना टिळकांनीं दुरावा उत्पन्न करून घेतला वगैरे भावनेनें पछाडावें व हें मित्रप्रेम टिळकांत कां प्राप्त होत नाहीं ह्या विचारा-नें त्यांना बेचैन करावें. ह्या वेळीं गोविंदाग्रज वगैरे त्यांच्या मित्रांनीं त्यांची मन-स्थिति नीट ओळखून जर त्यांचे गैरसमज दूर करण्याचे प्रयत्न केले असते तर बाल-कवींच्या न्यूनगंडानें उत्पन्न केलेला टिळकांबद्दलचा दुरावा नाहींसा झाला असता. परंतु श्री. खांडेकर म्हणतात त्याप्रमाणें गोविंदाग्रज हे 'बुद्धिदृष्ट्या सुधारक पण भावनेच्या दृष्टीनें सनातनी' असल्यानें ठोमऱ्यांच्या मनांत उठलेलें वादळ त्यांच्या सहवासात शमण्याच्या ऐवजीं अधिकच भडके टिळक आपल्याला दूर ठेवतात ही भलतीच कल्पना बालकवींच्या मनांत येणें नाहींतर अशक्यच वाटली असती. टिळकांना 'तुतारी मंडळा'चा राग आलेला असावा. आपल्या पासून त्या मंडळानें अशा रीतीनें आपल्या लाडक्या बालकवीला हिरावून घेण्याचा प्रयत्न केला असें त्यांना वाटत असावें. त्यांनीं बालकवींच्या मृत्यूनंतर त्यांच्यावर जो लेख लिहिला आहे त्यांतील खालील कांहीं वाक्यांवरून मी हें म्हणतों. त्याच्या आधीं किंवा नंतर टिळकांच्या तोंडून किंवा लेखणींतून एकदाहि गोविंदाग्रज किंवा तुतारीमंडळ त्यांना कमीपणा येईल असे शब्द निघाल्याचें मीं ऐकलेलें नाहीं पण खालीं दिलेले शब्द टिळकांच्या आत्यंतिक मानसिक दुःखातून हृदय पिळवटून बाहेर पडलेले आहेत —

"काउपरप्रमाणें क्षुद्र कारणामुळें किंवा कधीं कधीं निष्कारणसुद्धां जिवाला कंटाळण्यापर्यंत विमनस्क होऊन बसण्याचा विकार (त्यांना) जडलेला

झाला हा दूर करण्याकरतां आम्हाला आणि त्यांना सुमारें दोन वर्षे एक-सारखे परिश्रम करावे लागले. १९१२ पासून त्याची ही वृत्ति सुधारत चालली, याचें कारण ते सांगत असत त्याप्रमाणें नगरास असतां त्यांच्या भोंवतीं पडलेल्या आशावादी व विनोदी मित्रांचा गराडा !"

स्वतः बालकवीच म्हणतात —

काहुन यत मला कळेना । उदासीनता ही हृदयाला
काय बोंचतें तें समजेना । हृदयाला, अंतर्हृदयाला

पण टिळकांचा जबरदस्त आशावाद व लक्ष्मीबाईंचा आल्हाददायक विनोद आमच्या घरचें वातावरण नेहमीं असें बनवून टाकीत कीं त्यांत बालकवींची ही व्यथा हळूहळू दूर होई असें करतां करतां आधीं मानसिक दृष्ट्या व नंतर शरीरानेंहि ते सुदृढ बनूं लागले. पथ्यपाण्यानें आपल्या एखाद्या 'पेशंट'ला बरें करीत आणावें व इतक्यांत कोणीतरी येऊन त्याला सपाटून कुपथ्य करायला लावावें, तसें हें होतें. असला भलताच प्रकार करणाऱ्याचा त्या पेशंटच्या वैद्याला केवढा राग येईल हें निराळें सांगायला नको बरें होत आलेल्या ह्या 'पेशंट' बद्दल टिळक पुढें म्हणतात —

"ठोमऱ्यांनीं आमच्या सहवासांत राहूं नये, अशी ज्यांची मनापासून इच्छा होती अशा कित्येक थोर माणसांनीं पुढें त्यांना पुण्यास नेलें. तेथें त्यांना या माणसांकडून कितपत साह्य झालें, हें आम्ही सांगत बसत नाहीं. इतकेंच सांगितलें म्हणजे पुरें, कीं या थोर माणसांचा आश्रय त्यांना लौकरच नकोसा वाटूं लागला —"

ह्यांत उल्लेखलेलीं थोर माणसें म्हणजे गडकरी नव्हत. ते त्या वेळीं थोर बनले नव्हते. त्या मार्गावर ते होते वर उल्लेखलेलीं थोर माणसें निराळीं होतीं.

१९११ सालीं ठोमरे केसरींत उपसंपादक होते. पुण्याशीं त्यांचा संबंध सनातन्यांच्या मध्यस्थीनें प्रथम आला. त्या वेळीं कारागृहवासांत असलेल्या लोकमान्यांची गादी श्री. न. चिं केळकर ह्यांच्याकडे आली होती. केळकर हे खाजगी जीवनात उदारमतवादी होते परंतु केसरीच्या राजकीय चौकटींतून ज्या गोष्टी त्यांना कराव्या लागत त्या मात्र पूर्णपणें सनातनी वृत्तीनें कराव्या लागत टिळकांचा उल्लेख

त्यांनीं लोकमान्यांच्या चरित्रांत 'दिवटा' असा केलेला आहे (लो० टि०चरित्र खंड १ पृ० १८) केसरीची परंपरा अशी आहे म्हणतात कीं संपादकमंडळांत चित्पावन ब्राह्मणांशिवाय इतरांना अजूनहि प्रवेशबंदी आहे. अशा पुराणमतवादी जाळ्यांत ठोमरे गुरफटले गेले. बालकवि अत्यंत भाबडे होते. त्यांच्या मनांत वरील परिस्थितीनें संकुचित जाळीं पुन्हा पुन्हा निर्माण होणें अगदीं संभवनीय होतें शिवाय १९१५ ते १९१८ पर्यंत पुण्याच्या वाङ्मयीन जीवनांत केसरीकार केळकर, शिवरामपंत परांजपे इत्यादि लोकांचें प्रभावी प्राबल्य, जहाल राजकारणाच्या लोकप्रियतेमुळें निर्माण झालें होतें. ह्यामुळें पुण्यातील गडकरी, दिवाकर इत्यादि मंडळी केळकर-परांजप्यांच्या कलानें वागत असत. असल्या मित्रमंडळीच्या सहवासांत बालकवींची मनोवृत्ति विचलित होणें किंवा राष्ट्रवादी पुणेंकरांच्या मताचा स्वीकार करून बालकवींनीं टिळकांना हिंदुधर्मद्रोही व राष्ट्रभक्तींत हिणकस मानण्यास प्रवृत्त होणें अगदीं संभवनीय होतें.

श्री. कमतनूरकर ह्यांच्या म्हणण्याप्रमाणें बालकवींना टिळकांच्या वृत्तींत कांहीं 'दुरावा' घडून आल्याचें दिसलें असेल तर त्याला आणखीहि कारणें असूं शकतील.

(१) टिळकांचें बालकवींवर अपत्यनिर्विशेष प्रेम होतें त्यामुळें वडील ज्या वात्सल्ययुक्त धाकानें आपल्या मुलाशीं वागतात तसें टिळकांचें वर्तन कदाचित् झालें असावें. अर्थात् ते बालकवींच्या हिताच्या दृष्टीनेंच होतें. बालकवींनाहि टिळकांबद्दल आदर होता. परंतु मुलाला कधीं कधीं वडिलांचा धाक जसा अकारण वाटतो तसा तो बालकवींना वाटत असावा.

(२) बालकवींचें अकारण उदास होणे टिळकांना आवडत नसावें

(३) बालकवींनीं निदान मॅट्रिक तरी व्हावें अशी टिळकांची इच्छा होती. ती बालकवींनीं पूर्ण केली नव्हती

खरोखरच हा 'दुरावा' खरा असता तर पुन्हा पुणें सोडून बालकवि नगरास आले नसते, आणि टिळकांनीं 'पांखरा येशिल का परतून' असें त्यांना विचारलेंहि नसतें. खरें पाहिलें तर असें दिसतें कीं टिळकांचें गोविंदाग्रजांवरहि प्रेम होतें. टिळकांनीं संपादन केलेल्या अभिनवकाव्यमालेच्या दुसऱ्या भागांत

त्यांनीं गोविंदाग्रज व बालकवि ह्यांच्याच कविता सर्वांत अधिक घेतल्या आहेत. व गोविंदाग्रज वारल्याल्यावर, स्वत रुग्णालयांत पडलेल्या टिळकांनीं त्यांच्यावर शोकगीत रचलें.

टिळकाना बालकवींच्या अकालीं मृत्युमुळें केवढा धक्का बसला हें त्यांनीं लिहिलेल्या मृत्युलेखांतील शेवटल्या भागावरून स्पष्ट होतें—

"पण ते गेले ! त्यांच्या निर्याणासंबंधानें आम्हाला एक अक्षर लिहिवत नाही ! भयंकर ताप येऊन बेहोष असतांनासुद्धा ज्याला आईबरोबर लक्ष्मीबाईचें (आमच्या पत्नीचें) स्मरण होत होतें, ज्याला आमच्या मुलांचा हक्क तोच आम्हासंबंधानें आपला हक्क वाटत होता, आमच्या हातचें असतें तर ज्याला आपला जीव गहाण ठेवून आम्हीं मृत्यूच्या हातून सोडविलें असतें त्या आमच्या परमप्रिय बालकवींच्या निधनाचें वर्णन सध्यांतरी आम्हाला करवत नाही"

लक्ष्मीबाईच्या शब्दांत आमच्या घरचे बालकवि असे होते—

"तो मधून मधून भांडे तरी त्याच्यांत कपट नव्हतें. द्वेष नव्हता. स्वार्थ नव्हता. तो प्रेमळ, मनमिळाऊ, आनंदी, थट्टेखोर आणि थोडासा खोडकरहि होता. निदान आमच्या घरीं त्याचें बालपण कायम राहिलें होतें. तो आला म्हणजे नेहमीं कांहीं तरी गमती व्हायच्या. दंगामस्ती, झाडांवर चढणें, घरांवर उड्या मारणें, भांडणें, कागद घरभर करणें, कविता लिहिणें, त्या वाचून दाखविणें, त्या कोणीं मन लावून ऐकल्या नाहींत तर चिडून फाडून टाकणें, पुन्हा हसणें, गोष्टी लिहिणें, त्या वाचून दाखविणें, दुसऱ्यांच्या कविता आपल्या कवितांइतक्याच उत्साहानें म्हणणें, कांहीं गमतीच्या कविता असल्या म्हणजे त्यांची टर उडविणें, घरांत सभा भरविणें, जादूचे खेळ करणें, भास्कररावांच्या चष्म्यावर डोळा ठेवणें, माझ्या लिहिण्याची चेष्टा करणें, रात्रीं अंगणात निजलें म्हणजे चांदण्यांची मोजदाद करणें, त्या वांटून घेणें, वांटणी बरोबर झाली नाहीं म्हणजे भांडणें, घरांत पसारा करून ठेवणें, मी रागावलें म्हणजे तो आवरूं लागणें, टिळकांपुढें गंभीर तोंड करून बसणें..... ...कितीतरी गोष्टी डोळ्यापुढें उभ्या राहतात."

टिळकांच्या घरच्या बालकवींचें हें चित्र किती मनोरम आहे !

# उपसंहार

ऋण

प्रस्तुत पुस्तक लिहिणें हें एक फार मोठी जबाबदारीची कामगिरी होती. भारताच्या पंतप्रधानांना दुर्दैवें भारतांत परकीय देशाचा कोणी हस्तक, मिशनरीपणाचें पांघरूण घेऊन तेथील ख्रिस्ती लोकांना भारताविरुद्ध फूस देतांना सापडला असल्याचें प्रसिद्ध झालें. पुणें, नागपूर वगैरे भागांतील कांहीं पत्रांना मिशन, मिशनरी व कांहीं कांहीं बाटलेला ख्रिस्ती लोक ह्यांच्या विरुद्ध जनतेच्या मनांत अप्रीति उत्पन्न करण्यास चांगलें फावलें. अशा वेळीं हें पुस्तक लिहिलें जात आहे हें मी जाणून आहें. पण मीं लेखणी उचलली तेव्हांच ' मी व बाकी सारे ' असें गृहीत धरून ती उचलली.

ह्या प्रवासांत माझीं पावलें उंच पडत होतीं. पण पाहतां पाहतां मला दोन पक्ष मिळून मला अंतराळांत उचललें गेल्यासारखें वाटलें. माझा प्रवास अत्यंत सुलभ झाला. हे दोन पक्ष ह्मणजे माझ्या लिखाणांतून मीं लढाऊ-वृत्ति टाळावी असें शिकवणारा श्री. वामन नारायण देशपांडे ह्यांचा सौम्यपक्ष, तर सात्विक संताप आल्यास तें विसरूं नका असें बजावणारा प्रा. वि. बा. आंबेकर ह्यांचा आक्रमक पक्ष. ह्या दोन विरोधी मतांचा परिणाम मात्र माझा प्रवास संथ करण्यांत झाला. दोन्हींच्या साह्यामुळेंच मीं माझें लिहिणें तिखट होऊं दिलें नाहीं तसेंच आळणीहि होऊं दिलें नाहीं. ह्याचें सारें श्रेय ह्या दोन मित्रांनाच आहे.

प्रा. भवानीशंकर पंडितांनीं तर मला पत्रांचा रतीबच लावला होता. ह्या पुस्तकाला जर कोठें कोठें बाळसें दिसत असेल तर तो त्या पत्रांचाच परिणाम समजावा. माझ्या मातापित्यांची पुण्याईच खरोखरी ह्या पत्रांच्या रूपानें साहाय्याला येत असे, असें मला वाटे.

प्रा. डॉ. चा. भा. पाठक हे दोन दिवस मजजवळ बसून हें पुस्तक हस्तलिखितावस्थेंत वाचून गेले. त्यांनीं केलेल्या सूचना मला इतक्या महत्त्वाच्या वाटल्या कीं छापलेलीं आठ पानें रद्द करून त्यांच्या सूचनांचा अंगीकार करण्यासाठीं मीं तीं पुन्हा जुळवून घेतलीं.

---

माझे ज्येष्ठ मित्र प्रबोधनकार ठाकरे ह्यांनीं दिलेल्या उत्तेजनानें मीं ५६ पानांच्या पुढचें लिखाण मोठ्या मजेंत उरकलें. श्री. ठाकरे म्हणतात—

" अवघ्या ५६ पानांत आपल्या दिवंगत संत पित्याची इतकी कोरीव नि

रेखीव मूर्ति घडवणारा शिल्पकार सुपुत्र, ही सुद्धां महाराष्ट्रांतली एक अभिनंदनीय घटना म्हटली पाहिजे. फार फार आकर्षक चरित्रचित्र वठलें आहे. अशा कामाला जातीचें तर लागतेंच लागतें, पण जिव्हाळ्याचेंहि लागतें पुढचीं पानें तयार असल्यास पाठवा."

माझे जुने मित्र श्री. ग. त्र्यं. माडखोलकर ह्यांनीं पाठविलेल्या सूचनांचाहि मी विचार केला असता त्या अत्यंत महत्त्वाच्या आहेत ह्यांत शंका नाहीं. पण मूलतःच त्यांच्या व माझ्या दृष्टिकोनांत इतका फरक आहे कीं त्यांच्या म्हणण्याप्रमाणें करायचें म्हणजे पुस्तक प्रसिद्ध न करणें एवढाच मार्ग आतां उरतो. कारण त्यांच्या सूचना आल्या तेव्हां ९६ पानें पुस्तकाचीं, व २४ पानें परिशिष्टाचीं, छापून, घड्या घालून व जुळवूनहि झालीं होतीं. हें पत्र निदान १० दिवस आधीं माझ्या हातीं आलें असतें तर मात्र कदाचित् मीं लिहिलें आहे त्यापेक्षां निराळ्या तऱ्हेचें पुस्तक वाचकांना वाचायला मिळालें असतें. ह्या सूचना मीं लिहीत असलेल्या माझ्या दुसऱ्या एका पुस्तकासाठीं मात्र मी वापरणार आहें.

टिळकांच्या बाबतींत जें लिहिलें गेलें तें जुन्या जमान्यांत लिहिलें गेलें, आतां लोक तें सारें विसरून गेले आहेत आतां कोळसा उगाळण्यांत अर्थ नाहीं. असा त्यांचा दृष्टिकोन आहे. त्यांचें पत्र खालीं दिलें आहे. डॉ. मा. गो देशमुख ह्यांच्या पत्रावरून दुसरी बाजू दृष्टीस पडेल.

ह्या जुन्या टीकांना आतां महत्त्व नसेल पण ह्या जुन्या टीकाकारांचें मात्र महत्त्व कमी झालेलें नाहीं तें फार वाढलें आहे. त्यांच्या जुन्या टीका धूळ खात पडल्या नसून त्या आतां चांगल्या मुरल्या आहेत. त्या टीकांच्या महत्त्वामुळें नव्हे तर टीकाकारांच्या महत्त्वामुळें मला केव्हांतरी माझी बाजू मांडणें भाग होतें.

काळ बदलला आहे दृष्टिकोन बदलला आहे, व म्हणूनच ही संधि मला गमवायला नको होती. मीं लिहिलें आहे हें एकदाच लिहिलें जाणार होतें व तें मलाच लिहावें लागणार होतें. ही घटका जर मीं दवडली तर ती पुन्हा हातीं लागणार नाहीं—हें सारें जाणून, श्री माडखोलकरांच्या प्रेमळ व कळकळीच्या सूचनांनीं मनांत चलबिचल झाली असतांहि मी हें पुस्तक प्रसिद्ध करीत आहें. त्यांच्या सूचनांचा अवलंब करतां आला नाहीं तरी त्यांची प्रेमळ कळकळ मी कसा विसरेन? त्यांनीं माझ्या वडिलांवर आपल्या 'कविपंचकां'त केलेल्या तीव्र हल्ल्यापासून आजपर्यंत आमच्या मैत्रींत कधीं खंड पडलेला नाहीं. आणि म्हणूनच त्यांच्या सूचनांत मला एवढा जिव्हाळा आढळतो.

आरंभी प्रस्तावनेंत केलेल्या आभारप्रदर्शनाखेरीज आणखी कांहीं मंडळींचा नामनिर्देश करून त्यांचे आभार मानल्यावाचून पुढे जाणे शक्य नाहीं श्री ग. न. कमतनूरकर, श्री माधव के काटदरे, श्री. ना. के. बेहेरे, श्री. वि. स. खांडेकर तसेंच श्री. त्रं. र. फाटक व श्री कृ पां कुळकर्णी यांच्याहि सल्ल्याचा मला फार उपयोग झाला. माझ्या दोन्ही चिरंजीवांनीं परिशिष्ट १ व २ लिहून दिलीं, त्यांचाहि मी ऋणी आहे.

## खुलासे

१ पृ० १वर टिळकांचें जन्मसाल १८६२ पडलें आहे तें १८६१ पाहिजे ही माहिती नाशिक हायस्कूलच्या रजिस्टरांतून मिळालेली होती व पुढे पृ० ८ वरील २५ जुलै १८७८ वगैरे वाचतां १८६१हाच सन बरोबर असल्याचे दिसून येईल. ह्यावरून पृ० ६७ वरील मजकुरांतहि 'केशवसुत १७ वर्षांचे व टिळक २२ वर्षांचे होते' असा बदल करून वाचावें लागेल.

२. पृ० १९-२० व परिशिष्ट २, पृ० १३ वरील पुनरुक्ति व पृ० ३१ व ८१ वरील पुनरुक्ति ह्या अपरिहार्य आहेत.

३ पृ० ४३ वर 'Secular' ह्याला 'धर्मातीत' असा शब्द वापरला आहे त्या ऐवजीं श्री. कृ. पां कुळकर्णी 'अविशिष्टधर्मी किंवा समसर्वधर्मी' असा शब्द सुचवितात.

४. पृ० ७४ वर जो भारतांतील ख्रिस्ती धर्माचा उल्लेख आहे तो तात्त्विक असून त्याचा अर्थ भारत 'बाटलेला' (भ्रष्ट झालेला) असा नसून अधिक ख्रिस्ती धर्माचीं तत्त्वें भारतानेंच अधिक शुद्धस्व-उज्ज्वल झाला असा आहे रूपांत आचरणांत आणलीं असा त्याचा अर्थ आहे. ह्या बाबतींत डॉ देशमुख ह्यांच्या शेवटीं दिलेल्या पत्रांतील ख्रिस्तीधर्मासंबंधीं उल्लेख वाचावा.

प्रा. भवानीशंकर पंडित आपल्या एका खाजगी पत्रांत म्हणतात —

> "टिळकांना ख्रिस्ती समाज किंवा राष्ट्र यापेक्षा ख्रिस्तदेवाविषयीं नितांत आदर होता. ख्रिस्ताचा अनुकार अखिल मानवांचा उद्धार करील अशी त्यांची धारणा होती आणि म्हणूनच त्यांनीं ख्रिस्ताचा अनुकार करण्यांत आपल्या देशानें पुढाकार घ्यावा—गुरुस्थान प्राप्त करावें—अशी इच्छा प्रगट केला आहे. महात्मा गांधी, साने गुरुजी, आचार्य विनोबाजी यांच्याहि लेखनांत ख्रिस्तदेवाच्या अनुकारासंबंधींचे आदेश प्रत्यक्षाप्रत्यक्ष आहेत. परंतु टिळकांनीं बाप्तिस्मा घेतला होता व इतरांनीं नव्हता हाच फरक."

५. पृ० ७९ वरील '.. टिळक जगाच्या गतिमान'—ते पृ० ८० वरील 'विकृत विपण्णता पाहणारे —' येथपावेतोंचा मजकूर प्रा. वि. बा. आंबेकर यांचा आहे.

त्यांनीं तो मजकूर फार वर्षांपूर्वी मला लिहून दिला होता. पण तें नक्की आठवत नव्हतें. प्रा. आंबेकरांनीं आपल्या संग्रहीं असलेली जुनी माहितीहि मला निरपेक्ष बुद्धीनें पुरवली व विशेषत: पृ॰ ६३ वरील महाराष्ट्र साहित्यपत्रिकेचा उल्लेख शोधून दिला. तसेंच पृ॰ १०९-११० वरील पुण्याच्या थोर लोकांची माहिती मला त्यांनींच पुरविली त्या बद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहें

## श्री. माडखोलकर व डॉ. देशमुख यांचीं पत्रें

श्री. माडखोलकर म्हणतात —

"मला असें वाटतें कीं, टिळकांच्या धर्मांतरामुळें त्यांना जो सामाजिक त्रास झाला किंवा वाङ्मयीन टीका सोसावी लागली, तिच्याबद्दल, सध्याच्या बदललेल्या परिस्थितींत, लिहिणें अनेक दृष्टींनीं योग्य होणार नाहीं. आपल्या समाजाच्या बहुतेक बाबतींतील जुन्या श्रद्धा जाऊन त्या जागीं नवीन निष्ठा येत आहेत त्यामुळे टिळकांच्या धर्मांतराला पुढील काळांत तादृश महत्त्व राहणार नाहीं दुसरें असें कीं ज्या काळांत त्यांनीं धर्मांतर केल्यामुळें त्रास आणि टीका झाली, त्या काळांतच काय, पण आजसुद्धां धर्मांतराचा उपयोग राष्ट्रद्रोही वृत्ति निर्माण करण्यासाठीं केला जातो, असें पं नेहरू यांच्यासारख्या निधर्मी राज्याच्या जनकानेंच खुद्द जाहीर केलें आहे. ही दुहेरी परिस्थिति लक्षांत घेऊन आपण धर्मांतराच्या संबंधींच्या वादाचा कोळसा आतां उगाळूं नये असें वाटतें. टिळकांचें धर्मांतर आणि त्यांची धर्मविषयक मतें हीं विवाद्य राहूं शकतात, ही गोष्ट, मला वाटतें, आपल्यालाहि विचारान्ती मान्य होईल. त्याहि दृष्टीनें चारित्रांत आतां हे वाद आणणें अप्रशस्त ठरेल.

"माझी चरित्राची कल्पना अशी आहे कीं, लक्ष्मीबाईंनीं आपल्या 'स्मृतिचित्रां'त त्यांच्या जीवनाचा जो भाग वर्णन केलेला नाहीं तो आपण वर्णन करावा. त्याचप्रमाणें ख्रिस्ती चर्चचें भारतीकरण करण्यासाठीं जे प्रयत्न त्यांनीं केले त्याचीहि संपूर्ण माहिती द्यावी. संक्रमणकालाच्या दृष्टीनें त्या कामगिरीला जास्त महत्त्व आहे. तसेंच अनेक कवितांचे उगम, पार्श्वभूमि, व्यक्तिविषयक [illegible] वगैरे ज्या काव्यविषयक माहितीच्या बाबी अद्याप लोकांपुढें आलेल्या नाहींत, त्याहि विस्तारानें द्याव्या."

वरीलपैकीं (१) लक्ष्मीबाईंनीं स्मृतिचित्रांत टिळकांबद्दल इतकें लिहिलें आहे कीं आतां मला फारच थोडें लिहायला उरलें आहे (२) टिळकांनीं हिंदी चर्चेंत्र भारतीकरण करण्यासाठीं जें काय केलें त्याचा संबंध त्यांच्या कवित्वाशीं

केवळ त्यांनीं जीं भक्तिरसप्रधान गाणीं रचलीं तेवढाच येतो. व त्याचा उल्लेख पृ० ६३–६४ व ६६ वर आलेला आहे. (३) टिळकांच्या कांहीं विवाद्य कवितांचे उगम, पार्श्वभूमि, व्यक्तिविषयक निर्देशाचा उलगडा परिशिष्ट ३ मध्यें दिलेला आहे.

ह्या पुस्तकाची १०४ पानें वाचून नागपूरच्या डॉ. मा गो देशमुखांनीं मला पाठविलेल्या पत्रातील कांहीं भाग खालीं देत आहें. पत्राच्या शेवटीं त्यांनीं म्हटलें आहे—

> "रे टिळकांची कविता त्यांच्या तावून सुलाखून निघालेल्या व्यक्तित्वाला शोभेशीं किंबहुना व्यक्तित्वाहूनहि थोर आहे."

येथें माझा प्रामाणिक मतभेद आहे. टिळकांचें व्यक्तित्व त्यांच्या काव्याहून थोर होतें असें मला वाटतें.

> "पण तौलनिक दृष्ट्या 'केशवसुतां'चें वैशिष्ट्य व वेगळेंपण आबाधित राहतें. अभिरुचीबाबत 'Comparisons are odious' हेंच खरें, हें माझें वैयक्तिक मत आहे"

केशवसुताची व टिळकांची तुलना करून केशवसुतांपेक्षां टिळक **कसे कसे भिन्न होते** हें दाखविण्याचा मीं प्रयत्न केला आहे टिळकांच्या टीकाकारांनीं मात्र आजपर्यंत असें कांहींहि न करतां टिळक केशवसुतांचे शिष्य होते एवढी एकच टिमकी एकसारखी वाजविली आहे ते तसें नाहींत हें दर्शविण्यासाठींच मला तुलनेचा मार्ग स्वीकारणें भाग होतें. तेव्हां टिळकांच्या टीकाकारांपेक्षां माझा मार्ग अधिक प्रामाणिक आहे हें सहज पटण्यासारखें आहे.

डॉ. देशमुख आपल्या पत्रात अन्यत्र म्हणतात—

> "रे टिळकांची धर्मविषयक म्हणजे 'ख्रिस्ती'पणाबाबतचीं मतें आपल्या ग्रंथाच्या वाचनानें अधिक स्पष्टपणें कळून आलीं व त्यावरून माझ्या सारख्याचें धर्मविषयक ध्येय रे. टिळकांहून कांहींच वेगळें नसल्या-मुळें मला स्वतःला जर त्या अर्थी कोणीं 'ख्रिस्ती' म्हटलें तर मला मुळींच खेद होणार नाहीं किंबहुना अभिमान वाटेल. आजच्या पिढींतील बहु-सख्य तरुणांचें माझ्यासारखेंच मत आहे. तें कदाचित् वेगळ्या शब्दात मांडलें जाईल. हें आर्जवपूर्क लिहावयाचें तें एवढ्यासाठींच, कीं रे. टिळकांच्या तथाकथित 'धर्मान्तरा'विषयीं त्यांच्या टीकाकारांनीं जें जें कांहीं लिहिलें होतें त्यांतील आपण उद्धृत केलेला भाग नवीनांना केवळ अमान्य आहे एवढेंच नव्हे तर त्यांचा समाचार आपण फारच सौम्य प्रकारें केला आहे हा अभिप्राय स्पष्ट व्हावा."

# परिशिष्ट १

## टिळक व श्री. द. के. केळकर*

( ध्रुव देवदत्त टिळक )

श्री. द. के. केळकर हे एक अत्यंत समतोल विचारांचे लेखक असल्याचें प्रसिद्ध आहे. पण त्यानाहि 'काव्यालोचना' चा मार्ग चालतांना मध्येंच जरा वांकडी वाट करून टिळकांच्या ख्रिस्तीपणास अप्रत्यक्ष कोपरखळी देण्याचा मोह आवरला नाहीं. ह्याला काहीं दर्शनी सबब [illegible] म्हणून स्वतः ममज्ञ व विद्वान् असूनहि प्रसंगीं वेड घेऊन पेडगांवास जायला त्यांनीं कमी केलेलें नाहीं. ह्यामुळें 'कविप्रतिभा हें ईश्वरी देणें आहे' ह्या कल्पनेचें खंडन करताना त्यांनीं टिळकांवर जी टीका केली आहे ती प्रसंगीं अगदींच उथळ भासते. जरा खोलवर विचार केला असतां, ह्या टीकेच्या मुळाशीं टिळकांच्या धर्मांतरामुळें वाटणारें वैषम्यच आहे हें सहज समजणार आहे.

प्रा. केळकर ह्या प्रकरणांत म्हणतात—

" कवीच्या आत्मप्रत्ययाची ह्याच्या पुढील पायरी म्हणजे स्वत:ची प्रतिभा ही ईश्वरी तेजाची साक्षात् मूर्ति होय असें मानण्याची प्रवृत्ति होय ही रेव्ह. टिळकांच्या काव्यात व्यक्त झाली आहे. कवि वृद्धापकाळीं स्वतःमध्यें ख्रिस्ताचें तेज संचरित झालें आहे असें उघडपणें व्याख्यानांतहि सांगत असत. त्याच ईश्वरी अवताराचा थाटानें आपल्या पवित्र, सोंवळ्या, काव्यास चेकिकीरपणें स्पर्श करून विटाळवं [illegible]
तात—

---

* पान ५१ वरील मजकुरानें श्री. केळकराचें 'काव्यालोचन' केसरींतच सेवटें प्रसिद्ध झालें असा समज कदाचित होईल हें पुस्तक केसरी, विविध-ज्ञानविस्तार व रत्नाकर अशा तीन नियतकालिकात प्रसिद्ध झालें होतें.

'कोमल कौशल्यें नटला' " इ. इ.

वास्तविक पाहतां 'आपलें काव्य ईश्वरी निःश्वसित आहे' ही टिळकांची कल्पना व 'आम्ही देवाचे लाडके आहों' ही केशवसुतांची कल्पना ह्यामागील मनोभूमिकेंत कांहींच फरक नाहीं. असला तर एवढाच कीं ज्या दर्पावर प्रा. मजकुरांचा आक्षेप आहे तो दर्प टिळकांपेक्षा केशवसुतांचे ठायींच अधिक आहे. खरें म्हणजे टिळकांवर काहीं आक्षेप घ्यायला हवा होता तो नशिबानें सांपडला. परंतु ज्या वृत्तीवर आक्षेप घ्यायचा ती वृत्ति केशवसुतादि अनेक कवींची असल्यानें टिळकांना वेगळें करण्यासाठीं कांहीं आणखी खास कारण काढणें अपरिहार्य झालें आणि 'कवींच्या आत्मप्रत्ययाची ह्याच्या पुढील पायरी' हें वाक्य घालून तें कारण काढलें आहे. माझ्या मतें असल्या पायऱ्या ठरवितांना त्या केवळ शब्दसंहतीवरून न ठरवितां त्यांमागील मनोभूमिकेवरून ठरविणें योग्य होय.

वास्तविक 'माझीं काव्यें हीं ईश्वरी निःश्वासितें होत' ही कल्पना 'आपुलिया बळें नाहीं मीं बोलत सखा भगवत वाचा त्याची' ह्या तुकारामोक्तीच्या पलीकडली पायरी आहे ह्यावर कोण विश्वास ठेवील? तरी बरें कीं अन्यत्र हीच कल्पना मांडताना टिळकांनीं खुद्द तुकारामाचेच शब्द वापरले आहेत. (पहा: "त्याचा गर्व कशाचा? बोलविता तो धनी निराळा हो।")

खरें म्हणजे काहीं तरी निमित्त करून टिळकांना धारेवर धरणें हाच प्रा. मजकुराचा हेतु आहे. कारण केवळ २-४ पानेंच आधीं ते तुकारामाबद्दल म्हणतात—

"प्रतिभेची दुर्मिळ देणगी लाधलेला कवि खुद्द स्वतःच तिच्या स्वरूपाविषयीं भांबावून जाणेहि अस्वाभाविक नाहीं.

आणि तो भाविक असला तर हें दिव्य देणें ईश्वरानें कांहीं हेतूनें आपल्या स्वाधीन केलें असावें अशा भावनेनेंच तो बोलेल . . . आणि हें दिव्य देणें ईश्वरार्पण करून स्वतःस विनयपूर्वक निमित्तमात्र समजणें हें सुसंस्कृतीस व शालीनतेस साजेसेंच होय ."

हा तुकाराम व टिळक ह्यातला फरक ! तुकाराम तेवढा सुसंस्कृत व शालीन. टिळक मात्र ( वर दिलेला आर्याधे त्यांच्या कवितेंत असूनाहे ) तसे नाहींत ! खासा न्याय ! थोडक्यात म्हणजे टिळकांच्या कल्पनेप्रमाणेंच तुकारामाच्याहि आहेत मग त्याला ठपका का नाहीं ? ह्या आक्षेपास उत्तर म्हणून बिचाऱ्या टिळकांना मधल्यामध्यें—पर्यायानें का होईना असंस्कृत व शालीनताहीन ठरविलें आहे.

टिळक शालीन व सुसंस्कृत होतेच असा कोणी आग्रह धरून बसला तर त्यालाहि गप्प करण्यासाठीं प्रा. मजकुरांनीं आगखी पुढील टप्पा गाठला आहे—

" मात्र दिव्यत्वाच्या दिव्य तेजावर स्वतःच्या महत्त्वाची मशाल पेटवून घेण्याची अहमंन्य कल्पना ह्या संतकवींना स्पर्श देखील करिती झाली नाहीं."

तसेंच " त्यांची ( संतकवींची ) प्रतिभेच्या दिव्यत्वाविषयींची कल्पना प्रामाणिक होती. "

हा ह्या तुकाराम–टिळकांमधला आणखी एक फरक ! सुसंस्कृतपणा शालीनता हीं तर टिळकांत नव्हतींच. खेरीज ते अहंमन्य होते ! इतक्यानेंच संपलें नाहीं. प्रतिभेच्या दिव्यत्वाबाबींतची त्यांची कल्पना अप्रामाणिकहि होती. ह्या प्रकाराला ' नावडतीचें मीठ आळणी ' ह्या खेरीज दुसरें नांव मला तरी सुचत नाहीं.

हेंहि असो. प्रश्न येथें हा उपस्थित होतो कीं टिळकांनीं व्याख्यानांत जें सांगितलें तें भक्ताचा अनुभव म्हणून सांगितलें आहे, कीं कवीची मिरासदारी म्हणून सांगितलें आहे ? प्रा. मजकुरांनीं पुढील वाक्य बुद्ध्याच वाचकांची दिशाभूल करण्यासाठीं घातलें असावें असें म्हणण्याचें धारिष्ट करितों. तें वाक्य हें—

" कवी वृद्धापकाळीं स्वतःमध्यें खिस्ताचें तेज ..सांगत असत"

ह्यांत ' कवि ' हा शब्द वापरून, टिळक वरील विधान कवि ह्या भूमिकेवरून करीत असत असा आभास निर्माण केला आहे.

उपास्य देवतांचें तेज भक्तात संचरणें आणि खिस्तप्रभूनें आपल्या लाडक्या कवीच्या काव्यांत तेजोरूपानें संचार करणें ह्या दोन गोष्टी एक खचित नव्हेत.

वरील प्रश्नास चूपचाप बगल देण्यांत आलेली आहे. कारणीं काढलाच आक्षेप कीं भक्त व ईश्वर ह्या नात्यासंबधीं टिळकाचें मत कांहींहि असलें तरी तेंच मत कविप्रतिभा व ईश्वर ह्यांच्या नात्यासहि ते लागू करतात असें कसें म्हणतां येईल? व न आलें तर टिळकानीं केलेल्या खिस्तभक्तीविषयक विधानाचा प्रस्तुत विवेचनाशीं काय संबंध?

असा आक्षेप निघण्याचा संभव आहे हें आधींच ताडून लेखकानीं 'ह्याच ईश्वरी अवताराच्या थाटानें' इ. वाक्याचें जें ठिगळ लावलें आहे त्याचा 'ठिगळपणा' लपणारा नाहीं व त्याद्वारें ह्या चोटाची थुकी त्या चोटावर करण्याचा प्रयत्नहि लपणार नाहीं.

प्रतिपाद्य विषय सर्वस्वी भिन्न असताना मध्येंच टिळकांच्या खिस्तभक्तीची मचक टवाळी केली आहे हें तर खरेंच, खेरीज टिळकानीं स्वतःला (कवीच्या तसेंच भक्ताच्याहि भूमिकेवरून बोलतांना) खिस्ताचा अवतार कधीं व कसें म्हटलें हा प्रश्न शिल्लक उरतोच. ह्या प्रश्नाचें उत्तर एक प्रा. महाशयच जाणत. मजसारख्या सामान्य वाचकाना तरी प्रस्तुत विधान म्हणजे टिळकाच्या विचाराना जाणूनबुजून धादान्त चुकीचें व विकृत रूप देण्याचा प्रयत्न होय, असेंच वाटायचें.

सलोकता, समीपता, सरूपता व ह्या नतर ओघानेंच येणारी चौथी पायरी सायुज्यता ह्याची कांहींच माहिती प्रा. महाशयांना नसावी ह्यावर विश्वास ठेवणें कठीण आहे. असें असतां सायुज्यतेच्या अवस्थेचा

आस्वाद घेण्यात रंगलेल्या भक्तानें (कवीनें नव्हे) "पुन्हा ऊठला ख्रिस्त तो मीच आहे; शरीरीं तुझें रक्त खेळोनि राहे ॥" असें उपास्य-उपासकाच्या ऐक्याचें, अद्वैताचें स्वानुभवानें वर्णन केलें तर त्याची प्रा. महाशयांनीं गर्भित हेटाळणी कां करावी, 'हा स्वत:ला ख्रिस्ताचा अवतार समजतो' असें ह्या वृत्तीस विकृत रूप कां द्यावें, आणि भक्ताच्या वृत्तीचा प्रतिपाद्य विषयाशीं अर्थाअर्थी संबंध नसतांना, बुद्ध्याच तिची विवेच्य विषयाशीं गल्लत करून टिळकांना वाईट का ठरवावें हेंच समजत नाहीं.

ह्याहून खरी कमाल आहे ती पुढेंच आहे. 'पुरें जाणतों मीच माझें बल' ह्या कवितेंतील 'मी'चा अर्थ 'मानव प्राणी' असा आहे, कवि नव्हे व स्वतः रेव्ह. टिळक असा तर नव्हेच नव्हे. 'काव्यालोचना' च्या प्रसिद्धीपूर्वीं १७ वर्षे प्रसिद्ध झालेल्या 'टिळकांच्या कवितें'त वरील भूमिका अगदीं स्पष्ट करणारी टीप दिलेली आहे* परंतु टिळकांवर तुफान करण्याच्या भरांत नजरचुकीनें अगर सोयिस्करपणें तिकडे प्रा. मजकुरांचें दुर्लक्ष झालें आहे. फार करून हे दुर्लक्ष नजरचुकीनें झालें नसावें असें वाटतें व प्रा. मजकुरांच्या लेखनांत दिसून येणारा साक्षेपीपणा, टापटीप, जबाबदारपणा ह्यांची ज्यांना जाणीव आहे असे वाचक मला दुजोराच देतील.

मग हें झालें कसें? मला तरी एवढेंच वाटतें कीं धर्मांतरित टिळकांवरच्या रागाला वाट करून देतांना एक आवेशामुळें लेखकाला

---

*ती टीप प्रस्तुत पुस्तकांत वाचकांस सांपडलेच परंतु ते त्यांचे श्रम वाचावे म्हणून त्या टीपेंतील शेवटलें वाक्य येथें उद्धृत करितों. "कवीचे बोल व्यक्तिवाचक नसून स्वत:ला आपल्या परिस्थितीचा स्वामी मानणाऱ्या आदर्श व्यक्तीसंबंधीं आहेत." [कविता संग्रह पान १४१]

ह्या बारीक गोष्टींचें भान तरी राहिलें नसावें अगर भान असूनहि, "प्रसंगीं वेड घेऊन पेडगांवलाहि जाईन पण टिळकांवर येनकेन प्रकारेण आग पाखडीनच पाखडीन" असा त्यांनीं चंग बांधला असावा.

प्रस्तुत पुस्तकात टिळकांचा उल्लेख ४०० पानांत एकूण ४ वेळेस आहे व तो केवळ ही वादलीची, उथळ व खोडसाळ टीका करण्यासाठींच आहे. खेरीज 'सोंवळें काव्य' 'कंठ दाटून येणें' 'ईश्वरी अवताराच्या थाटानें' ह्या वाक्प्रयोगांतील खवचटपणा वेगळा स्पष्ट करायला नकोच

प्रा. केळकरावर अन्याय होऊ नये ह्या इच्छेनें ह्या लेखाची एक प्रत त्यांजकडे पाठवून, ह्यावर कांहीं म्हणणें असलें तर कळवावें अशी विनंती करण्यात आली होती. त्याप्रमाणें त्यांचें जें पत्र आलें त्यातील ह्या लेखाशीं संबद्ध असलेला भाग पुढें दिलेला आहे.

वरील लेखातील प्रमुख मुद्दे अधोरेखित केलें आहेत. त्याचा प्रा. केळकराचा खुलाशानें कितपत निरास झाला आहे तें वाचकांनींच ठरवावें.

——×——

## प्रा. केळकरांचें पत्र

" ..मी ईश्वराच्या जगत्कारणाच्या खऱ्या हेतुची पूर्तता मंगल' अशा प्रकारच्या उद्गारातील भावना मी पूर्णपणें आकलन करू शकत नाहीं. हीच आजहि माझी मनःस्थिति आहे. तुकाराम आपणास 'दिव्य दणे' लाधले आहे असे उद्गार काढतो तेव्हा मी त्याची स्तुति करतो व कविवर्य टिळक स्वतःला 'ईश्वराच्या हेतुची पूर्तता' म्हणतात तेव्हां मात्र त्याच्यावर टीका करतो असे जें आपण लिहिलें आहेत त्या बाबत मला येवढेंच म्हणावयाचे आहे तीन शतकापूर्वी तुकारामकाळीं जो धर्मभोळेपणा होता तो आजही तशाच्या तसा पुढे चालविणे मला योग्य वाटत नाहीं. 'सलोकता, समीपता, सरूपता व सायुज्यता ह्यांची कांहींच माहिती प्रा. महाशयांना नसावी' असें आपण लिहिता त्याबद्दल मी

मोकळेपणानें सांगतो 'सलोकता' वगैरेची शाब्दिक आर्थिक पुस्तकी माहिती मलाही आहे. अनुभव मात्र काडीचा नाहीं.

"शेवटी येवढेच लिहू इच्छितो कीं आपण जे 'टिळकाच्या वरील टीकेच्या मुळाशी टिळकांच्या धर्मांतरामुळें 'काव्यालोचनकारा'ना वाटणारे वैषम्यच आहे हें सहज समजणार आहे." असे लिहिले आहे ते मात्र मला सर्वस्वी नापसत आहे. कविवर्य टिळकाच्या विषयी मला योग्य वाटले ते मी लिहिले आहे. त्यांत धर्मांतराच्या वैषम्याचा कांहीं संबंध नाही हे मी स्पष्टपणे सांगतो. मग ते आपणास पटो अथवा न पटो. कळावे. लो. वि.

आपला

द्. के. केळकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ५१५१० वि:
ग्रंथांक नों. दि. २७।६।५०

# परिशिष्ट २

[ साने गुरुजी सेवापथकाच्या सालवड येथील शिबिरांत ९-८-५३ रोजीं टिळकांचा स्मृतिदिन साजरा झाला होता. त्या समयीं श्री. अशोक टिळक यांनीं केलेल्या भाषणांतील कांहीं भाग येथें दिलेला आहे.]

... टिळकांचें व लक्ष्मीबाईचें धर्मांतर हें येथें बसलेल्या बऱ्याच लोकांना अजूनहि बोचत असलेलें दिसतें. तेव्हां त्याविषयीं जरा विस्तारानें सांगायला हवें.

हिंदुस्थानात आज शेकडों पंथ नांदत आहेत. ते सर्व पंथ व त्यांचे प्रवर्तक हे आम्हाला जवळचेच वाटतात. आम्हाला परके वाटणारे धर्मपंथ दोनच—ख्रिस्ती आणि मुसलमान त्यांपैकीं मुसलमानांविषयीं कांहींच बोलण्याचें येथें कारण नाहीं. ख्रिस्ती धर्म व ख्रिस्ती लोक परके वाटण्याचीं कारणें अगदीं स्पष्ट आहेत.

पहिली गोष्ट म्हणजे ख्रिस्त जो हिंदुस्थानांत आला तो चुकीच्या मार्गानें आला. जर पॅलेस्टाईनमधून तो सरळ पूर्वेकडे वळला असता तर त्याचें स्वागत आम्हीं निराळ्या प्रकारें केलें असतें. वैदिक धर्माच्या मुळावर उठलेल्या गौतम बुद्धाला नाहीं का आम्ही ९ वा अवतार मानींत ? मग ख्रिस्ताची स्थापना १० व्या अवताराच्या जागीं होणें अगदीं शक्य होतें. पण ख्रिस्त आला तो via युरोप ! आणि त्यांतल्या त्यांत म्हणजे राजकीय सत्तेबरोबर ! आम्हाला ख्रिस्त दाखवला तो साहेबानें. त्यानें आम्हाला नवें आध्यात्मिक तत्त्व देणारा ख्रिस्त शिकविला, रोग बरे करणारा ख्रिस्त शिकविला, प्रार्थना-मंदिरांत बाजार भरवणाऱ्यांना कोरडे ओढून पिटाळून लावणारा ख्रिस्त दाखविला, आमच्या पापांसाठीं खांबावर मरणारा ख्रिस्त दाखवला, पण शिष्यांचे पाय धुणारा ख्रिस्त कांहीं दाखविला नाहीं. हा शिष्यांचे पाय धुणारा ख्रिस्त

साहेबाला फारसा मानवलेला नाहीं. त्याच्या गरम प्रकृतीला तो फारसा पचण्यासारखाहि नाहीं. आणि आज ख्रिस्त म्हटल्यानंतर आमच्या डोळ्यासमोर जो उभा राहतो तो सत्यवादी, परोपकारी, त्यागी पण शिष्यांचे पाय न धुणारा ख्रिस्त. दुसरें असें कीं, आमच्या मनोवृत्तीचेंच हें एक वैशिष्ट्य आहे, ऑस्ट्रेलिया व आफ्रिका हीं खंडेंच्या खंडें ख्रिस्ती झालीं आणि हिन्दुस्थानांत जेमतेम कोटी दोन कोटीच लोक ख्रिस्ती झाले. 'अहो कष्टी व भाराक्रान्त जनहो' अशी हाक मारल्यावर हिन्दु मन तेथें धांव घ्यायचें नाहीं. हा सन्मार्ग आहे असें कोणी सांगूं लागला तर तिकडे आमचें लक्ष जायचें नाहीं. Seek & Find हा आमचा मार्ग आहे. आमचे आम्ही शोधतो व अखेर आमचें आम्हाला सापडतें. आम्हाला कोणीं सांगावें लागत नाहीं; तर आम्हीच आमचा गुरु हुडकून काढतों आणि त्याच्या पायीं लागतों.

आज आपण ज्याला ख्रिस्ती धर्म म्हणतों त्यांत ह्या दोन्हीं गोष्टी नाहींत म्हणून टिळकांसारखा पंडित तेथें गेला तरी कसा याचें आपल्याला नवल वाटतें.

धर्माची आजची व्याख्या घेऊं नका. तिच्यांत राजकारण फार मिसळलेलें आहे. पण टिळक, बाबा पद्मनजी, पंडिता रमाबाई, नेहेम्या नीलकंठशास्त्री गोरे वगैरे विद्वान् लोकांच्या डोळ्यांपुढें धर्माची कल्पना कोणती होती याचा विचार करा. त्यांची व्याख्या तुमच्याआमच्या दृष्टीनें कदाचित् चुकीची ठरेलहि पण त्यांनीं धर्मांतर जें केलें तें त्यांच्या व्याख्येला अनुसरून केलें यांत मात्र संशय नाहीं.

त्यांच्या कल्पनेप्रमाणें धर्म म्हणजे आध्यात्मिक उन्नतीच्या मार्गी—मुक्तीचा सर्वांत जवळचा रस्ता The shortest out to Salvation हा shortest cut त्यांना ख्रिस्तामध्यें सांपडला. हा त्यांचा अपराध आणि आमचे आजतागाईत चाललेले शिव्याशाप हें त्यांना शासन.

नीलकंठशास्त्री गोरे हे काशीचे एक विद्वान् पंडित. त्यांनीं बायबल वाचलें तें मिशनेरींच्या भाषणांत त्यांना आडवण्यासाठींच. पण ख्रिस्ताच्या शिकवणीचा व चारित्र्याचा त्यांच्या मनावर परिणाम निराळा झाला. हा सैतानाचा पगडा दूर करण्यासाठीं त्यांनीं चंडी-पाठाचें अनुष्ठानहि करविलें असल्याचा उल्लेख थोरल्या शास्त्री बोवा-च्या चरित्रांत आढळतो. पण ह्या सर्वांचा कांहीं उपयोग न होतां शेवटीं स्वतःच्या मनाच्या शान्तीसाठीं त्यांना ख्रिस्ताच्या मागें धावावें-च लागलें. *

* यांचें नांव पूर्वाश्रमसंप्रदायाप्रमाणें वे. शा. सं. नीलकंठशास्त्री गोरे. यांनीं प्रथमतः थोडेसें वेदाध्ययन करून नंतर व्याकरण व न्याय अशा दोन शास्त्रांचा अभ्यास केला. अभ्यास चालला असतां ख्रिस्तीधर्मखंडनाकडे यांचें मन वळलें. याला कारण रस्त्यांत उभे राहून उपदेश करणारे ख्रिस्तभक्त झाले. त्यांच्या चालीप्रमाणें ते हिन्दुधर्माविरुद्ध अद्वातद्वा हवें तसें बोलतात, तें नीलकंठशास्त्री व त्यांचे सहाध्यायी यांस न रुचल्यामुळें त्यांनीं हिंदुधर्ममंडन व ख्रिस्तीधर्मखंडन यांविषयीं तोंडीं व लखी वादविवाद सुरू केला. त्या संबंधानें त्यांनीं संस्कृतांत व हिंदींत पुस्तकें लिहिलीं होतीं, व तीं छापून प्रसिद्धहि झालीं होतीं. पुष्कळ वेळां ख्रिस्तभक्तानें शास्त्री मजकूर यांनीं खंडन केलें. ख्रिस्ती शास्त्राचें चांगलें पर्यालोचन केल्याविना ख्रिस्तभक्तांचे पाय त्यांचेच गळ्यांत घालतां येत नाहींत, असें गोरेशास्त्री यांस वाटून त्यांनीं तें शास्त्र वाचण्याचें सुरू केलें. याच सुमारास आपण इंग्रजी भाषा शिकावी, अशाविषयीं त्यांची प्रवृत्ति झाली. बायबल वाचणेंच त्या उद्देशास चांगलें साहाय्य झालें. खंडन करण्याचे उद्देशानें जरी ते बायबल वाचूं लागले, तथापि कांहीं काळानें पवित्र आत्म्या 'नें त्यांजवर झडप घातली. हिन्दुधर्मा-वरची श्रद्धा उडाली. ख्रिस्तावांचून त्यास तरणोपाय दिसेना. कदाचित्

टिळकांनीसुद्धां धर्मान्तर करण्यापूर्वी आपला हा बेत जाहीर केला होता व त्या बाबतींत आपलें समाधान करून आपल्या बेताचें वैफल्य पटवून देण्यासाठीं आपल्या धर्मबांधवांना आवाहन केलें होतें. त्या वेळीं त्याची समजूत करायाला बरेच लोक आले. एक म्हणे तुला घर बांधून देतों दुसरा म्हणे तुला दत्तक घेतों. जणुं काय टिळक भाकरीसाठींच ख्रिस्ती होत होते. त्यावेळीं एकाहि विद्वानानें त्यांची आत्मिक भूक भागविण्याचा प्रयत्न केला नाहीं. ही गोष्ट फार ध्यानात घेण्याजोगी आहे. हिचा अर्थ येवढाच, कीं धर्मांतर हें आध्यात्मिक लाभासाठीं करावयाचें असतें ही गोष्ट तेव्हां आम्हाला——आमच्या मोठमोठ्या जाड्या पंडितांनाहि कळत नव्हती.

टिळकांनीं कांहीं पैशाच्या लाभासाठीं धर्मांतर केले असें म्हणण्यांत बिलकूल अर्थ नाहीं. कारण पैसा म्हणजे कांहीं मोलाची गोष्ट आहे हें त्याना कधींच कळलें नाहीं. व्यवहारात ते किती अजाण असत हें 'स्मृति-चित्रें' वाचणाऱ्यांना तरी मुद्दाम सांगावयाला नको. तुम्ही ख्रिस्ती झाला असता तुमची आजची उत्कट स्वदेशभक्ति कायम राहील काय ? अशी त्यांच्या कांहीं मित्रांनीं शंका घेतली असता त्यांनीं 'धर्मान्तर म्हणजे देशान्तर नव्हे' ह्या कवितेनें उत्तर दिलेलें आहे. †

---

असच्छास्त्रावलोकनानें बुद्धिभ्रंश झाला असेल, असें मनाला वाटून त्यानीं चंडीपाठ वगैरे अनुष्ठानें सुरू केलीं. परंतु त्यामुळें मन ताळ्यावर न येतां अधिकच भकलें. तेव्हां ख्रिस्ती धर्माचे सत्यतेची मनाला पूर्ण साक्ष पटून, पूर्ण विचारांतीं आपले वयाचे पंचविसावे वर्षीं त्यानीं ख्रिस्तीधर्मदीक्षावलंब केला. तेव्हापासून त्यांचें पूर्वाश्रमातील नांव रद्द होऊन, प्रस्तुत धर्मानुकूल असे रेवरेंड नेहिमाया गोरे हें नांव त्यानीं धारण केलें." (विविधज्ञानविस्तार वर्ष १० अंक ८ च्या आधारें लिहिलेल्या कृष्णशास्त्री चिपळूणकरांच्या चरित्रांतून हा उतारा घेतला आहे.)

† ही कविता 'स्मृतिचित्रें' भाग १ मध्यें शेवटीं दिलेली आहे.

तो काळच असा होता. आपल्या प्रचलित धर्मांत कांहींतरी त्रुटि आहे असें हिन्दुस्थानच्या मोठमोठ्या विचारवंतांना वाटूं लागलें होतें. पश्चिमेचा प्रकाश नव्यानेंच आला होता आणि त्यानें आम्हाला विचार करण्याची एक नवी दिशा दाखवून दिली होती. धर्मविषयक किती तरी नवे विचारप्रवाह त्या काळीं उत्पन्न झाले होते. दयानंद सरस्वती, देवेन्द्रनाथ टागोर, केशवचन्द्र सेन, आपल्याकडले न्या. रानडे, डॉ. भांडारकर, यांच्यासारखे विद्वान् लोक हे सारेच पर्यायानें प्रचलित धर्मांपासून दूर सरकत होते कीं नाहीं? आपली आत्मिक तहान भागवावयाला निरनिराळ्या विद्वान् मंडळींना निरनिराळे मार्ग सांपडले त्यांत टिळकादिकांना हा धर्मान्तराचा मार्ग सांपडला. तो त्यांनीं चोखाळला यांत गैर तें काय?

आतांच प्रा. माधव मनोहर म्हणाले कीं, टिळकांनीं आपला धर्मविषयक अनुभव लिहून ठेवलेला नाहीं. ही त्यांची समजूत बरोबर नाहीं. **A student's testimony** नावाचें एक पुस्तक टिळकांनीं लिहिलें होतें व त्यांनींच 'एका विद्यार्थ्याची साक्ष' म्हणून त्याचें भाषांतरहि प्रसिद्ध केलें होतें. सध्यां हीं दोन्ही पुस्तकें दुर्मिळ झालेलीं आहेत. त्यांत त्यांनीं आपला अनुभव ग्रथित केलेला आहे. प्रचलित धर्मांत कांहींतरी कमी आहे. त्यानें आपली तहान भागत नाहीं म्हणून टिळकांनीं निरनिराळ्या पंथांचा अभ्यास केला. नागपूरच्या रा. ब. बुटींच्या पदरीं असतांना त्यांना वेदवेदांगांचा अभ्यास करण्याची संधि मिळाली होती. हीं वेदांगे वाचल्यानंतरच त्यांची तहान अधिक वाढली होती हेंहि लक्षांत घेण्यासारखें आहे– पुढें त्यांनीं अनेक धर्मांचा अभ्यास केला — "— तथापि गौतमबुद्धाची व माझी गट्टी जमली व त्याच्या चुका सोडून त्याचें अनुकरण करण्याचा मीं विचार केला" असें त्यांनीं आपल्या 'साक्षींत म्हटलें आहे. शेवटीं प्रचलित पंथापैकीं कुठलाच पंथ पूर्ण (perfect) नाहीं म्हणून त्यांनीं नवीन पंथ स्थापण्याचा निश्चय केला आणि त्याची स्थूल रूपरेषा तयार केली.

१) जगाचा कर्ता कोणीतरी अंतःकरणविशिष्ट व्यक्ति आहे, व त्याला सर्व मनुष्यजाति लेकरांसारखी आहे.

२) सर्व धर्मशास्त्रें मनुष्यकृत असून ईश्वराचें ज्ञान करून देणारा एकच ग्रंथ आहे. तो ग्रंथ म्हणजे हें जग.

३) पूर्वजन्म व पुनर्जन्म मुळींच नाहींत.

४) देवाच्या ठिकाणीं भाव व इहपरत्र बंधुता हें सर्व धर्मांचें सार होय.

५) मूर्तिपूजेसारखें दुसरें पाप नाहीं.

असा आराखडा त्यांच्या मनात तयार झाला होता. त्याचा प्रचार करावयाला सुरवात करण्याच्या बेतात टिळक असतांना त्यांची एका युरोपियन गृहस्थाची गाठ पडली. त्यांचें संभाषण ऐकून तो त्यांना म्हणाला, "तुमच्याशीं बोलण्याची माझी पात्रता नाहीं, पण मला असें निश्चितपणें वाटते कीं आणखी दोन वर्षांत तुम्ही ख्रिस्ती व्हाल." त्यानें त्यांना बायबल दिलें व त्याचा अभ्यास करावयास सांगितलें. टिळकांनीं बायबल वाचावयाला घेतलें ते कांहीं मोठ्या आस्थेनें नव्हे. केवळ त्या गृहस्थाला वचन दिलें होतें तेवढें पाळण्यासाठीं. पण ते पुढें म्हणतात, "डोंगरावरील उपदेशापर्यंत मात्र मी आलों. त्या उपदेशांतील प्रीति, करुणा, व सत्य यांनीं रसाळलेल्या वाक्यरत्नास सोडून मला जाववेना." त्यांची खात्री पटली कीं ह्या धर्मापरता दुसरा धर्म स्थापन करणें अशक्य आहे आणि त्यांनीं पूर्ण विचारान्तीं ख्रिस्ती धर्म स्वीकारला.

रा. खानोलकरांनीं संपादन केलेल्या 'अर्वाचीन मराठी वाङ्मयसेवक' या ग्रंथामध्यें टिळकांवर श्री. रा. म. मराठे यांनीं एक निबंध लिहिलेला आहे. त्यांचा टिळकांविषयीं असा ग्रह दिसतो कीं टिळकांमध्यें कुठलें काम करण्याची धमकच नव्हती. म्हणून ते जन्मभर अनुकरणच करीत गेले. रा. मराठे म्हणतात "नवधर्म स्थापू अशा कल्पनेची भरारी मारणारे टिळक ख्रिस्ती धर्मात रुळले यावरून त्यांचें मन क्रान्तिकारक नव्हतें

तो काळच असा होता. आपल्या प्रचलित धर्मांत कांहींतरी त्रुटि आहे असे हिन्दुस्थानच्या मोठमोठ्या विचारवंताना वाटूं लागलें होतें. पश्चिमेचा प्रकाश नव्यानेंच आला होता आणि त्यानें आम्हाला विचार करण्याची एक नवी दिशा दाखवून दिली होती. धर्मविषयक किती तरी नवे विचारप्रवाह त्या काळीं उत्पन्न झाले होते. दयानंद सरस्वती, देवेन्द्रनाथ टागोर, केशवचन्द्र सेन, आपल्याकडले न्या. रानडे, डॉ. भांडारकर, यांच्यासारखे विद्वान् लोक हे सारेच पर्यायानें प्रचलित धर्मापासून दूर सरकत होते कीं नाहीं? आपली आत्मिक तहान भागवावयाला निरनिराळ्या विद्वान् मंडळींना निरनिराळे मार्ग सांपडले त्यात टिळकादिकाना हा धर्मान्तराचा मार्ग सापडला. तो त्यानीं चोखाळला यात गैर तें काय?

आताच प्रा. माधव मनोहर म्हणाले कीं, टिळकांनीं आपला धर्मविषयक अनुभव लिहून ठेवलेला नाहीं. ही त्याची समजूत बरोबर नाहीं. A student's testimony नावाचे एक पुस्तक टिळकांनीं लिहिलें होतें व त्यानींच 'एका विद्यार्थ्याची साक्ष' म्हणून त्याचें भाषांतरहि प्रसिद्ध केले होतें. सध्या हीं दोन्ही पुस्तकें दुर्मिळ झालेलीं आहेत. त्यात त्यानीं आपला अनुभव ग्रथित केलेला आहे. प्रचलित धर्मांत कांहींतरी कमी आहे. त्याने आपली तहान भागत नाहीं म्हणून टिळकांनीं निरनिराळ्या पंथांचा अभ्यास केला. नागपूरच्या रा. ब. बुटींच्या पदरीं असताना त्याना वेदवेदांगाचा अभ्यास करण्याची संधि मिळाली होती. हीं वेदांगें वाचल्यानंतरच त्याची तहान अधिक वाढली होती हेंहि लक्षात घेण्यासारखें आहे. पुढें त्यानीं अनेक धर्मांचा अभ्यास केला —
"— तथापि गौतमबुद्धाची व माझी गट्टी जमली व त्याच्या चुक्या सोडून त्याचें अनुकरण करण्याचा मीं विचार केला" असें त्यानीं आपल्या 'साक्षीं'त म्हटलें आहे. शेवटीं प्रचलित पंथापैकीं कुठलाच पंथ पूर्ण (perfect) नाहीं म्हणून त्यानी नवीन पंथ स्थापण्याचा निश्चय केला आणि त्याची स्थूल रूपरेषा तयार केली.

१) जगाचा कर्ता कोणीतरी अंत:करणविशिष्ट व्यक्ति आहे, व त्याला सर्व मनुष्यजाति लेंकरासारखी आहे.

२) सर्व धर्मशास्त्रें मनुष्यकृत असून ईश्वराचें ज्ञान करून देणारा एकच ग्रंथ आहे. तो ग्रंथ म्हणजे हें जग.

३) पूर्वजन्म व पुनर्जन्म मुळींच नाहींत.

४) देवाच्या ठिकाणीं भाव व इहपरत्र बंधुता हें सर्व धर्मांचें सार होय.

५) मूर्तिपूजेसारखें दुसरें पाप नाहीं.

असा आराखडा त्यांच्या मनात तयार झाला होता. त्याचा प्रचार करावयाला सुरवात करण्याच्या बेतांत टिळक असतांना त्यांची एका युरोपियन गृहस्थाची गाठ पडली. त्यांचें संभाषण ऐकून तो त्यांना म्हणाला, "तुमच्याशीं बोलण्याची माझी पात्रता नाहीं, पण मला असें निश्चितपणें वाटतें कीं आणखी दोन वर्षांत तुम्ही ख्रिस्ती व्हाल." त्यानें त्यांना बायबल दिलें व त्याचा अभ्यास करावयास सांगितलें. टिळकांनीं बायबल वाचावयाला घेतलें ते कांहीं मोठ्या आस्थेनें नव्हे. केवळ त्या गृहस्थाला वचन दिलें होतें तेवढें पाळण्यासाठीं. पण ते पुढें म्हणतात. "डोंगरावरील उपदेशापर्यंत मात्र मी आलों. त्या उपदेशांतील प्रीति, करुणा, व सत्य यांनीं रसाळलेल्या वाक्यरत्नांस सोडून मला जाववेना." त्यांची खात्री पटली कीं ह्या धर्मापरता दुसरा धर्म स्थापन करणें अशक्य आहे आणि त्यांनीं पूर्ण विचारान्तीं ख्रिस्ती धर्म स्वीकारला.

रा. खानोलकरांनीं संपादन केलेल्या 'अर्वाचीन मराठी वाङ्मयसेवक' या ग्रंथामध्यें टिळकांवर श्री. रा. म. मराठे यांनीं एक निबंध लिहिलेला आहे. त्याचा टिळकांविषयीं असा ग्रह दिसतो कीं टिळकांमध्यें कुठले काम करण्याची धमकच नव्हती. म्हणून, ते जन्मभर अनुकरणच करीत गेले. रा. मराठे म्हणतात "नवधर्म स्थापू अशा कल्पनेची भरारी मारणारे टिळक ख्रिस्ती धर्मांत रुळले यावरून त्यांचें मन क्रान्तिकारक नव्हतें

असें सिद्ध होतें." माझ्या मतें असलें कांहीएक सिद्ध होत नाहीं. कारण नवा धर्म जो टिळक स्थापायला निघाले होते, तो स्वतःचें नांव व्हावें किंवा क्रांतिकारक म्हणून लोकांनीं आपला गौरव करावा म्हणून नव्हे तर त्यांच्या मतें हिंदुस्थानला खरोखरच नव्या धर्माची आवश्यकता होती म्हणून. आणि, नव्या धर्माची आवश्यकता नाहीं, कारण ख्रिस्ती धर्मासारखा धर्म अस्तित्वात आहे हें कळतांच त्यांनीं आपला नवधर्मसंस्थापनेचा विचार सोडून दिला. त्यांच्या आयुष्यांतला मोठ्यांत मोठा त्याग मला येथें दिसतो. पैशांचें तर त्यांना कांहीं अप्रूप नव्हतेंच. पण त्यांनीं जर नवधर्मस्थापना केली असती तर--जरी तो धर्म अयशस्वी ठरला असता तरीहि--हिंदुस्थानच्या सांस्कृतिक इतिहासांत त्यांचें एक विशेष स्थान निश्चित ठरलें असतें. secure झालें असतें. टिळकांना या गोष्टीची जाणीव नव्हती असेंहि म्हणता येत नाहीं. पण सत्याच्या मागें धावतांना त्यांना कीर्तीचीहि चाड उरलेली नव्हती.

हें मी सारें सांगतों आहें तें केवळ त्यांच्या चरित्राच्या व लेखनाच्या आधारावर. माझें पदरचें यांत कांहींएक नाहीं.

टिळकांचें एक भजन आहे—

" पाणी द्या पाणी तृषित मी
पाणी द्या पाणी ।
द्या ऐसें कीं तृषा न लागे ।
पीतां जें फिरुनी ॥

हें पाणी त्यांना हवें आहे तें कोणतें हें आतां आपल्या ध्यानांत येईल.

सर्व जलाशय पाहुन आलों
श्रमलों मी भ्रमुनी ॥

हे जलाशय म्हणजे निरनिराळे धर्मपंथ होत.

आ जा होइल प्रभु येशूच्या
तृप्ति तुझी चरणीं ॥

ही त्याची शेवटली मजल. येथें त्यांना तृप्ति मिळाली. व हीच तृप्ति सर्व हिंदी बांधवांना मिळावी म्हणून त्यांनीं यथाशक्ति प्रयत्न केले.

....लक्ष्मीबाईच्या स्मृतिचित्रांमुळें व त्यांच्या वैयक्तिक जीवनक्रमामुळें हिंदु समाजात त्यांच्याविषयीं जी एक तऱ्हेची विशेष आत्मीयता दिसून येते ती टिळकांच्याहि वाट्याला आलेली नाहीं. याचें एक कारण म्हणजे लक्ष्मीबाई स्त्री असल्यामुळें त्यांचा प्रवेश स्वयंपाकघरापर्यंत होत असे. आगरकरांपेक्षां त्याचींच तत्त्वें शिकविणारे हरिभाऊ आपटे जसे सामान्य स्त्रीपुरुषांना अधिक प्रिय झाले तसेंच लक्ष्मीबाईंचेहि झालें. लक्ष्मीबाई ही एक आदर्श आर्य स्त्री, पतिबद्दलचें कर्तव्य तिनें उत्कृष्ट रीतीनें पार पाडलें अशी सर्वांची खात्री असल्यामुळें त्यांच्या धर्मान्तराच्या बाबतींत एक मोठी सोईस्कर गैरसमजूत त्यांच्या हिंदु नातेवाईकांना व चाहत्यांना करून घेता आली.

टिळक व्यवहारात अगदीं 'अगणित' होते हें सर्वश्रुतच आहे. त्यातच विद्वान् लोक हे विक्षिप्त असायचेच! तेव्हा टिळकांची विद्वता बिनशर्त मान्य करूनहि त्यांना मूर्ख म्हणायचा मार्ग मोकळाच. हा वेडा आपल्या वेडाच्या लहरींत करू नये तें करू बसला. सर्व नात्यागोत्यांनीं अर्थातच त्याच्यावर बहिष्कार टाकलेला; अशा स्थितींत लक्ष्मीबाई स्वतः पतिव्रता असल्यानें त्याच्या रक्षणासाठीं व सेवेसाठीं स्वधर्मांचीहि पर्वा न करता त्याच्यामागें धांवली. वरून वरून जरी ती खिस्ती असली तरी खरी म्हणजे ती हिंदूच. पतिव्रताधर्म पाळण्यासाठीं तिने पतीचा धर्म अंगिकारला इतकेंच. तिच्या खिस्ती होण्यात खिस्ताचा संबंध अजीबात नाहीं अर्थात् ती खरी खिस्ती नव्हेच. असें कांहीं लोकांना प्रामाणिकपणे वाटत असते.

पण या गोष्टीकडे जरा बारकाईनें पहातांच तींतला फोलपणा स्पष्ट होतो. कारण लक्ष्मीबाई या खिस्ताकडे टिळकांप्रमाणेंच– टप्याटप्यानीं ओढल्या गेल्या हें त्यांच्या 'स्मृतिचित्रां' वरून स्पष्ट दिसतें.

टिळकानीं प्रायश्चित घेऊन परत जातींत यावें यासाठी प्रथमप्रथम लक्ष्मीबाईंनीं मारुतीला सकडें घातलीं, नवस आयास केले. शरीराचे हाल करून त्यानीं मिळविलेली पोटदुखी पुढें त्याना जन्मभर पुरून उरली. टिळक खिस्ती झाले हें त्यांनीं करू नये तें पाप केलें ही एक गोष्ट व गावांतील स्त्रिया लक्ष्मीबाईंची सवाष्णींमध्यें गणना करीत नसत ही दुसरी गोष्ट, त्यांच्या अंत:करणाला सारखी जाचत होती. यावर उपाय त्यानीं आपल्या भाबड्या मनाला सुचतील तेवढे केले. या बाबतीत त्यानीं विचार म्हणून त्याकाळीं कधीं केला नाहीं.

यानंतरची पायरी म्हणजे मुसलमानाच्या हातचें पाणी पिण्याचा तो प्रसंग. 'स्मृतिचित्रा'तील 'घोट विषाचा कीं अमृताचा' व 'परिवर्तन' या दोन प्रकरणात याचें वर्णन आलें आहे.

"घास घशात अडला. टिळक म्हणाले शरीर रक्षी तो धर्म. शिवाय चार हात पाणी वाहिलें कीं त्याचा विटाळ जातो असें हिंदुधर्म सांगतो. तू हें पाणी पी. ..मीं मुसलमानाच्या हातचें पाणी तोंडाजवळ नेलें. हो नाहीं करता करता डोळे घट्ट मिटून एक घोट घेतला तो आंत फार वेळ थुटमळलाच नाहीं. ताबडतोब पोटात होतें नव्हते तें घेऊन जोराने बाहेर आला. माझ्या वाती-मुळें सर्वांचीं जेवणें आटोपलीं. मीं तेथेंच पडलें."

यानंतर त्यांना सपाटून ताप भरला. झाल्या प्रकाराबद्दल स्वत:ची निर्भर्त्सना करीत त्या पडल्या. त्यावेळीं त्यांच्या मनात पूर्वी कधींहि न आलेले विचार येऊं लागले. त्या म्हणतात —

"मला एकदम प्रकाश पडल्यासारखा भास झाला. प्रकाश पडला म्हणजे अलंकारिक भाषेंत सांगत नाहीं. खरोखरच सूर्यप्रकाशा-

सारखा चक्क प्रकाश पडल्याचा मला भास झाला. मनातली तळमळ नाहींशी झाली आणि पूर्वी कधीं डोक्यांत आलें नव्हतें असे विचार थैमान घालूं लागले... जाती देवानें केल्या का माणसानें ! देवानें केल्या असत्या तर माणसामाणसांत काहीं फरक ठेवला असता ना ! जन्ममरण, बुद्धि, बरेंवाईट जाणण्याचें सामर्थ्य, सुखदुःख, हीं सर्व माणसांत सारखींच आहेत ना ? —शूद्राच्या शिरीं नंदीचें शिंग नाहीं कीं, ब्राह्मणाच्या कपाळीं महादेवाचें लिंग नाहीं. स्त्री व पुरुष या दोन जाती निरनिराळ्या असल्या तर आहेत. बस. माझा जातिभेद आता गेला. आजपासून मी सर्वांच्या हातचें खाईन, सर्वांच्या हातचें पिईन."

आता आपण विचार करून सांगा, हा पालट टिळकांच्या जुलमामुळे झाला आहे का ? घशांत घास अडला असता पाणी प्यावयाला लावणें त्याला म्हणाल का आपण जुलूम ? टिळकांनीं लक्ष्मीबाईंवर जुलूम केला असला तर तो येवढाच—विचार करण्याची जन्मात सवय नसलेल्या त्यांच्या मेंदूला टिळकांनीं धक्के देऊन विचार करायला लावलें. यालाच जर जुलूमजबरी म्हणावयाचें असेल तर म्हणा.

येथेंच संपलें नाहीं. येथें तर नुसती सुरवात आहे. मला असें सांगावयाचें आहे कीं येथून पुढें ' स्टेप बाय स्टेप ' लक्ष्मीबाई ख्रिस्ताजवळ आलेल्या आहेत. ही आता पाहिली ही पहिलीच पायरी म्हणा ना !

नंतर टिळक लक्ष्मीबाईंकडे येऊन म्हणूं लागले, "आता ऊठ, स्वयंपाक करून पुन्हा जेवण कर. मी स्वयंपाकाबद्दल व पाण्याबद्दल तुला काहींहि म्हणणार नाहीं." लक्ष्मीबाईंनीं त्याना आपला निश्चय सांगितला तेव्हा त्याना वाटलें ही उगाच त्राग्यानें बोलते आहे. त्याचा विश्वास बसेना. शेवटीं अम्माबाईंनीं—या मूळच्या मुसलमान होत्या—स्वयंपाक केला व सर्वजणें सुखासमाधानानें जेवलीं.

"परजातीच्या हातचें अन्न खाण्याचा माझा तो पहिला प्रसंग होता. पाणी प्यालें तेव्हा माझी जी स्थिति झाली ती अन्नसेवनानें झाली नाहीं."

येथून पुढें त्यांच्या दोन संसाराचा एक संसार झाला. लक्ष्मी-

बाईंच्या मूर्तिपूजेला टिळक विरोध करीत नसत व लक्ष्मीबाई त्यांच्या प्रार्थनेला नित्य नियमानें जाऊन बसत.

ह्याच्या नंतरची ‘स्टेप’ म्हणजे त्यांनीं एक अस्पृश्य मुलगी घेतली आणि ती पोटच्या पोरप्रमाणें वाढविली. दुष्काळी प्रदेशांतून प्रवास करीत असतांनाची ही हकीकत आहे. तेव्हां टिळक तेथें नव्हते. लक्ष्मीबाईंना त्या वेळीं खरे म्हणजे कुठल्या तरी नैतिक पाठिंब्याची (moral support,ची जरूरी होती. तेव्हां त्यांनीं टिळकाचें बायबल उचललें आणि तें उघडून दिसलें तें वाक्य वाचलें. वास्तविक पहातां बायबलमधून guidance घेण्याची ही रीत नव्हे. लक्ष्मीबाईंच्या जुन्या भाबड्या समजुती गेलेल्या नव्हत्या पण बायबल ही कौल लावण्याइतकी पवित्र वस्तु आहे अशी त्यांच्या मनाची खात्री असली पाहिजे. पूर्वीं त्यांच्या अंगीं नसलेली सहिष्णुता येथूनच उत्पन्न झालेली दिसते. बाई तेव्हां ख्रिस्ती नव्हत्या. व ख्रिस्ती होण्याचा त्याचा बेतहि नव्हता. पण अगदीं नकळत–In spite of herself त्या ख्रिस्ताच्या जवळ जवळ सरकत होत्या हें मात्र खरें.

टिळकांच्या प्रार्थनेच्या वेळीं लक्ष्मीबाई नियमानें जाऊन बसत.

“मला प्रार्थना आवडूं लागली. आपण आपल्या हृदयस्थ परमेश्वराशीं बोलणें म्हणजे एक नवा आल्हादजनक अनुभव मला येऊं लागला ”

असें त्यांनीं प्रार्थनेचें वर्णन केलें आहे. बायबलचीहि त्याना बरीच माहिती झाली होती. आणि विशेष म्हणजे ख्रिस्तावर त्याचा विश्वास बसत चालला होता. अशा एका प्रार्थनेच्या वेळीं [illegible] त्यांना [illegible]

“ तूं मला वचनबद्ध असून दूर राहू लागलास, तसच ख्रिस्ता-चे ठायीं भक्ति असेल, आणि ती असून तू त्याच्यापासून दूर राहूं लागलीस तर ती प्रतारणा देवाला कशी आवडेल ! तो तुजवर कशी दया करील ? ”

“ तूं आमच्या धर्मांत आली नाहींस तर देव तुझ्यावर दया करायचा नाहीं ” असा येथें बागुलबोआ दाखवलेला नाहीं. तर “ ख्रिस्तावर भक्ति असूनहि तू त्याच्यापासूनहि—माझ्यापासून [illegible]

दूर राहूं लागलीस तर तें त्याला कसें आवडेल ? " अशी समस्या येथें लक्ष्मीबाईपुढें टिळकांनीं मांडलेली आहे. ही प्रार्थना झाल्याबरोबर लक्ष्मीबाई ज्या उठल्या त्या थेट डॉ. बॅलंटाईनकडे जाऊन, दुसऱ्या दिवशीं बाप्तिस्मा घेण्याचें नक्की करून आल्या. त्या वेळींसुद्धा त्यांनीं टिळकांचा सल्ला घेतला नाहीं. डॉ. बॅलंटाइन म्हणत होते अजून तुमचा बायबलचा अभ्यास झालेला नाहीं. तरी सुद्धा बाईनीं आपला आग्रह सोडला नाहीं. असा लक्ष्मीबाईंच्या धर्मान्तराचा इतिहास आहे. पण अजून सपलें नाहीं. त्या खिस्ताजवळ ' स्टेप बाय स्टेप ' चालल्या होत्या, आणि बाप्तिस्मा ही कांहीं त्याची शेवटची ' स्टेप ' नव्हे.

टिळक गावाला गेले असतांनाची गोष्ट! बाईला त्यांच्याकडे एक भगीण येत असे. तिला बाईनीं म्हटलें, " तू इकडे येतेस तेव्हांच येवढी स्वच्छ असतेस, का घरींहि अशीच असतेस ?" भंगीण म्हणाली, " अशाच्या अशा माझ्या घरीं चला आणि पहा." लक्ष्मीबाईहि तशाच तिच्याबरोबर तिच्या घरीं गेल्या. त्या भंगिणीनें फराळाचें करून आणलें. गडीमाणसें कुरकूर करूं लागलीं. त्यांना बाईनीं म्हटलें. " तुम्हाला माझा आग्रह नाहीं. मी आणि माझीं मुलेंच खाऊं." सर्वांनीं मोठ्या प्रेमानें फराळ केला. टिळकांना ही गोष्ट कळल्यावर त्यांनीं काय सर्टिफिकेट दिलें ! — " तू तर माझ्याहि पुढें गेलीस !"

लक्ष्मीबाई जर केवळ पतीची सेवा करण्यासाठीं — आपल्या कॉन्शन्सच्या विरुद्ध — ख्रिस्ती झालेल्या असत्या तर त्यांना येवढें करण्याची काय जरूरी होती ? आणि टिळकांच्या मरणानंतर तरी त्यांचें ऋण सांभाळीत बसण्याचें काय कारण होतें ? परंतु लक्ष्मीबाईनीं टिळकांचें अपुरें खिस्तायन पुरें केलें शिवाय अगदी टिळकांच्या धर्तींवर अभंग लिहून त्यांच्या २०० कवनांच्या अभंगांजलींत २०० अभंगांची भर घातली. टिळकांच्या अभंगांत कवीचा उल्लेख ' दास म्हणे ' म्हणून असायचा, तर लक्ष्मीबाईंनीं आपला उल्लेख ' दासाची दासी ' म्हणून केला आहे.

आयुष्याच्या शेवटीं शेवटीं त्यांनीं केलेलीं खिस्तचरित्रावरील कीर्तनें, भजनें वगैरे पाहिल्यावर त्याहि टिळकांप्रमाणेंच खिस्तपदीं विलीन झाल्याची खात्री पटते.

# परिशिष्ट ३

## कांहीं विशेष कवितांचें विवेचन

[ टिळकांच्या कांहीं कवितांविषयीं गैरसमज आहेत. कांहींतील कल्पनाविषयीं थोडाफार वाद आहे. त्याचें येथें थोडक्यात विवेचन केलें आहे. ].

## कवीची विनवणी

१७ मे १९१५ च्या संदेश पत्रांत श्री. अच्युतराव कोल्हटकर ह्यांनीं ' टिळकांची कविता ' म्हणून एक लेख प्रसिद्ध केला. त्या लेखांत उपरोधादि शस्त्रांनीं टिळकांना जखमी करण्याचा बराच प्रयत्न करण्यांत आलेला आहे. तो संपूर्ण लेख व पृ.५०–५१ वर उल्लेखलेल्या श्री.द. के. केळकर ह्यांच्या ' काव्यालोचनां'तील टिळकांवर चार वेळ झालेले हल्ले, ह्या दोन्हींतील माऱ्याचें केन्द्र 'कवीची विनवणी' ह्या कवितेंतील—

कारण कशनें नच माझीं नच तुमचीं —मी गातों जीं
हीं निःश्वसितें, कोण सोडितें मम हृदयीं तें—
विचारुनी भिउनी त्याला पुढें करा मग कर अपुला

व —

वंदा निंदा! परि दुरुनी! पवित्र ही कवितारमणी
वगैरे– आहे हें स्पष्ट दिसतें.

त्यांचा समाचार घेण्याच्या आधीं ही कविता कशी लिहिली गेली त्याचा थोडा इतिहास दिल्यास तो अस्थानीं होणार नाहीं.

मराठी भाषेवर व मराठी संगीतावर आपल्या जन्मभाषेइतकेंच व आपल्या देशातील संगीताइतकेंच प्रेम करणारी एक अमेरिकन विदुषी डॉ. एमिली बिसेल, ख्रिस्ती उपासनासंगीतांतील टिळकांच्या काव्यांना चाली बसवीत होत्या. मधेंच एक ओळ त्यांना आपल्या सरगमांत नीटशी चपखल बसवितां येईना. तेव्हां त्यांना सह्य करणाऱ्या हिंदी गवयाच्या मदतीनें त्यांनीं ती ओळ बदलली. त्यांचें हें कृत्य टिळकांना अतिशय बोंचलें व त्याला उद्देशून त्यांनीं ही कविता प्रथम लिहिली.

२६-२-१९१४ च्या ज्ञानोदयांत ह्यावर लिहिलेल्या एका स्फुटांत ते म्हणतात —

"उद्गाता उंच स्वरानें वेदसंगीत गात आहे, इतर याजक आनंदानें सुरभरणा करीत आहेत, आणि एकीकडे यज्ञपशूचा तोंड दाबून बुक्यांखालीं जीव घेण्याचा उपक्रम चालू आहे, ह्याप्रमाणें कोणी गायक 'आकाशींची कुऱ्हाड आली, कुऱ्हाड आली येऊं द्या' ह्या वीररसानें व भक्तिरसानें भरून वाहणाऱ्या काव्य-वाहिनीला सारंग नाहीं तर वसत रागामध्यें खेचून नेत आहे, आणि ती तशी जात नाहीं म्हणून तिचा जीव घेऊन तिचें प्रेत बनवीत आहे, व या घोरकर्मांत त्याला मदत करणारे आनंदानें माना डोलवीत आहेत.—हा ह्या हृदयहीन वाज्यांच्या पेट्यांचा आणि सतारीतबल्यांचा धंदा बनला आहे — निसर्गसिद्ध कवीच्या मुखांतून निघणारी चाल हीच त्याच्या गायनाची खरी चाल आहे. त्याच्या गायनाला त्याला न विचारता तुम्ही आपल्या चाली लावू नका. लावाल तर तो कवि तरी निदान तुम्हाला त्याला अपत्य-तुल्य अशा आपल्या काव्यांचे प्राण हरण करणारे समजेल."

ह्याच स्फुटांत टिळक उपासनासंगीताच्या बाबतींत म्हणतात —

"जयजयकार रडत रडत करावा, रुदनाला हास्याचे सूर लावावे, वैराग्याची आणि शृंगाराची वाणी एकच बनवावी, वीरोक्तीला लहान बाळाच्या लडिवाळपणाच्या उक्तींचें स्वरूप द्यावें, हा ह्या हृदयहीन जिवंत बाज्यांच्या पेट्यांचा आणि ससारीतबल्याचा धंदा बनला आहे."

नुसत्या गायनकलेला सर्वस्व समजणाऱ्या ह्या गायकाच्या हातून स्वतःला नकळत होणाऱ्या ह्या भयंकर प्रमादाबद्दल टिळक म्हणतात—

"खरोखरच हा प्रमाद भयंकर आहे, कारण या प्रमादानें पुष्कळ वेळां आमच्या एखाद्या रसभरित उपासनागीतांतला सारा रस पिळून निघतो आणि मग तालसुराच्या मसाल्यानें चमचमीत बनविलेला त्याचा नुसता चोथा आम्हाला कसा तरी गिळावा लागतो."

ह्या कवितेचा हा इतिहास कळल्यावर ह्या दोन टीकाकारांच्या भातातील कांहीं बाण तरी व्यर्थ फेंकण्यात आले असल्याचें ध्यानात येईल.

श्री समर्थ रामदासांसंबंधीं लिहितांना श्री माडखोलकर म्हणतात—
'राजश्री' रघुनाथभट गोस्वामी यांना जें पत्र त्यांनीं हेळवा-

काच्या घळींतून "आवडीच्या कळवळ्यानें" आणि "मनास येईल तैसे" लिहिलें आहे त्या पत्रांतसुद्धां त्यांनीं असा निर्वाळा दिला आहे कीं—

मज रघुनाथजीवेगळें कोण्ही जिवलग नाहीं

आणि या 'जिवलगा'चा त्यांना एवढा आधार वाटत असे आणि इतका विलक्षण विश्वास होता कीं,—

आपगिलें मज श्रीरामसमर्थें ।
ब्रह्मांड पालथें घालूं शके
वक्रदृष्टी पहातां मरील त्याचा घोंट
काळाचेंहि पोट फोडूं शके

असे उद्दाम आत्मप्रत्ययाचे उद्गार त्यानीं पुनःपुन्हा काढले आहेत. किंबहुना, अशा तऱ्हेची ज्याची अविचल उत्कट श्रद्धा देवावर आहे, त्याला जर कांहीं उणें पडलें किंवा त्याच्या वर जर कांहीं आपत्ति आली, तर देवालाच उणें येतें असेहि उद्गार त्यानीं काढले आहेत. ते म्हणतात--

रामदास म्हणे माझें प्रचीतीचें बोलणें
हें वाक्य मिथ्या होतां येतें समर्थां उणे

इतका ज्या समर्थांचा देवावर विश्वास—"(त. भा. २७-४-५३)

`श्री समर्थांना जर असे उद्गार काढता येतात किंवा तुकाराम-महाराजांना

" आपुलीया बळें नाहीं मी बोलत
सखा कृपावंत बोलवितो "

तर टिळकांनीं

" जें जें मी गातों तें नाहीं माझें परतु देवाचें
कवितादूती त्याची बोलवि मज पाहिजे तसें वाचे "

असें म्हटल्यास कोणती हरकत आहे ! प्रीति आणि कवितादूती ' जयजयकारास गर्जिती ' आणि--

" ह्या दोघी म्हणती ' जा घेउन अमका निरोप लोकाना
मी क्षुद्र हो निरोप्या, रजावित्या त्याच, मी न रसिकांना "

ह्यांत टिळकहि ' बोलविता धनी वेगळाची ' असें समजून आपल्या-

कडे केवळ निरोप्याचें लघुत्व घेत नाहींत का ? श्री. द. कै. केळकरांच्या काव्यालोचनातील टिळकांवरील हल्ल्याला परिशिष्ट १ मध्यें सपूर्णपणें उत्तर देण्यात आलें आहे.

---

## पुरें जाणतों मीच माझें बल

टिळकांच्या ज्या दुसऱ्या एका कवितेबद्दल बराच गैरसमज पसरविण्यात आला आहे ती 'पुरें जाणतों मीच माझें बल' ही होय. "मनुष्य आपल्या परिस्थितीचा स्वामी असून त्याचें सामर्थ्य अन्राट आहे. आज व्यक्त असलेलें हें सामर्थ्य कितीहि थोडें दिसलें, तरी त्याची मर्यादा दिक्कालाला व्यापणारी आहे." हें टिळकांचें फार आवडतें व मौलिक तत्त्व होतें. ह्या कवितेंत तो 'माणूस' काय म्हणतो तें दाखविलें आहे. आपण स्वतः त्या कोटीला पोंचल्याचा टिळकांचा दावा नाहीं. ते तर नेहमीं म्हणत कीं 'पुष्कळ अजुनी उणा, प्रभू, मी पुष्कळ अजुनी उणा !'

परंतु—

धूळ खरोखर आपण, परि ह्या धुळीजवळ हा दिव्यपणा ।
मनुष्य आणी देव दूर हें स्वप्नींही नच खरें गणा ॥
उणें न कांहीं जगांत तुज, तूं मात्र नको ठरूं कधीं उणा
कर्तव्यानें हाक मारितां धाव पुढें आधीं तरुणा

ह्या कवितेसंबंधीं खुद्द टिळक लिहितात— (ज्ञानोदयः २९-४-१९१५)

"ईश्वराच्या अनुग्रहानें आपल्या ठायां जे विशेष गुण असतील, किंवा सामर्थ्य असेल, त्याच्या प्रभावाला आपली परिस्थिति प्रतिबंध करणारी झालीच पाहिजे अशी समजूत घेऊन बसणें हें मनुष्याचें परम दुर्भाग्य होय. तशात तो मनुष्य प्रत्यक्ष मृत्यूच्या मस्तकावर पाय देणाऱ्या ख्रिस्ताचा शिष्य असला, त्याच्यावर

विश्वास ठेवून 'रक्तापासून, देहापासून, किंवा माणसाच्या इच्छेपासून नव्हे, तर देवापासून जन्मलेला,' असला तर त्याला असा रडत बसलेला पाहून फारच वाईट वाटतें.

"प्रथमतः समाजाची घटनाच अशी आहे, कीं तिला अनुसरून ज्या कामांना विलक्षण बुद्धिमत्तेची, अचाट सामर्थ्याची किंवा अमर्याद शौर्यौदार्यादि गुणाची गरज आहे, अशीं कामें फारशीं कोणाच्या वांट्यास येऊं नयेत. समाजांत बहुतेक सारीं साधीं माणसें असून तीं साध्या व्यवहारांत रुळून गेलेलीं आहेत. तथापि सर्व जगाच्या हिताची चिंता वाहणाऱ्या परमेश्वराचा नियमच असा आहे, कीं ज्यांना त्यानें विशेष गुणांनीं किंवा विशेष सामर्थ्यानें मंडित केलें आहे, अशा स्त्रीपुरुषांनीं हीं असलीं साधीं कामें करीत असतांनाच मोठमोठीं कामें करायला लायक व्हावें.

* * * *

"जगाच्या नानाविध जीवनाला शुद्ध व उदात्त करणारीं जीं जीं नररत्नें चमकून गेलीं, त्यांतलीं कितीतरी साधेपणाच्या नव्हे, तर दारिद्र्याच्या खोल, अंधकारमय खाणींतून बाहेर आलेलीं आहेत. धर्म, व्युत्पत्ति, कला, राजकारण, रणांगण जिकडे पहाल तिकडे मानवी इतिहास हीच गर्जना करीत आहे, कीं मनुष्याच्या अंगीं जर देवानें विशेष तेज ठेवलें असलें तर तें बाहेर पडायला उच्च, संपन्न, सर्वतः अनुकूल परिस्थितीपेक्षां साधी, जग जिला नीच समजतें असली परिस्थिति व तीपेक्षांहि अधिक संकटपरंपराच कारण होत असतें.

"असें आहे तरी देवानें आपणास जी स्थिति दिली आहे, ती त्यानेंच आपणास दिलेल्या विशिष्ट गुणसंपत्तीच्या वाढीस किंवा

उपयोगास अडथळा करणारी आहे असें समजून आपल्या सद्यः-स्थितीपेक्षां उच्चतर असल्या स्वतः कल्पिलेल्या स्थितीचें व्यर्थ चिंतन करीत बसण्यात कितीतरी लोक आपलें आयुष्य व्यर्थ घालवींत आहेत! असल्या लोकांना पुढें आलेल्या कर्तव्याची कितीशी किंमत वाटणार! याच्या चालेलेल्या घटकेचा हे कितीसा उपयोग करणार? असले लोक एक प्रकारचे खुनी बनत असतात. त्याना कळो वा न कळो, पण ते आपल्या आयुष्याचा, आपणास मिळालेल्या सोन्यासारख्या संधीचा, आपणास देवानें दिलेल्या गुणसामर्थ्यांचा खून करीत असतात. 'मीं गरिबानें काय करावें' हें ह्यांच्या जीवितगीताचें पालुपद असतें. याच्यातला 'मी' स्वतःला कवडीमोलाचा समजत असल्यामुळें निरंतरचा दुर्बल झालेला असतो. हे असले लोक ज्या राष्ट्रात किंवा समाजात खच्चून भरलेले आहेत तें राष्ट्र, तो समाज जीवन्मृत होय. मनुष्य म्हणजे देवाचें प्रतिरूप. 'मीं गरिबानें काय करावें?' हें रडगाणें घेऊन जन्माला आलेला प्राणि मनुष्यच नव्हे. मनुष्याचें गाणें हें असलें पाहिजे:—

( ह्यापुढें ही संपूर्ण कविता दिली आहे. )

"हें गाणें आम्हीं वारवार पुढे केलें आहे, व करू. कारण हा नरवीराचा आराव आहे. हा आराव करीत त्यानें आपल्या असेल तसल्या परिस्थितीचा निःशेषः भेद करून, मेघजालाचा भेद करून पुढें येणाऱ्या सहस्ररश्मीप्रमाणें पुढें यावयाचें आहे. त्यानें असेंच करावें ही ईश्वरी योजना आहे.

"'मी ईश्वराच्या जगत्कारणाच्या खरी हेतुची पूर्तता मंगल' ही जाणीव जर त्याला क्षणमात्र सोडणार नाहीं, तर तो आपल्या अधिकारापासून कदापि च्युत होणार नाहीं."

"मी ईश्वराच्या. .." वगैरे 'मनुष्या'ला लागू असून टिळक ह्या व्यक्तीला नाहीं हें समजून सांगितल्यानंतरहि श्री. द. के. केळकर (३–५–५३ परिशिष्ट १ : पृ० ६) आपल्या पत्रांत उत्तरादाखल जें म्हणतात तें मला मुळींच पटत नाहीं. कारण टिळकांनीं हें जें म्हटलें आहे तें मनुष्य आपल्या परिस्थितीचा स्वामी होऊं शकतो ह्या भूमिके-वरून! तीनशें वर्षांपूर्वींचा धर्मभोळेपणा त्यांत नसून अगदीं आजच्या कर्मयोगयाची ती भूमिका आहे.

टिळक म्हणतात, "तुम्ही एखाद्या हिंदु वाण्याच्याकडे जाऊन देवधर्माचे नारळ आणि सुपाऱ्या मागा, म्हणजे तो तुम्हाला एकदम सस्ता भिकार माल काढून देईल. कारण आपण देवाला म्हणून जें जें अर्पूं तें तें ब्राह्मणाच्या घरांत जाणार हें त्यांना पक्कें ठाऊक असल्या-मुळें देवाला अर्पावयाचा पदार्थ बहुतकरून ते असेच पाहत असतात. चार आण्यांत कधीं गाय मिळाली आहे का? पण हिंदु लोकांचें गोप्रदान चार आण्यांत होतें! ह्याच्या अगदीं उलट यहुदी लोकांची चाल होती, आणि पुष्कळ अंशीं अजून आहे. जें देवाला वाहावयाचें तें निर्दोष, परिपूर्ण असेंच असलें पाहिजे असें त्याचें नियमशास्त्र त्यांना सांगत आहे. फार काय सांगावें, ज्याला कांहीं व्यंग आहे, जो शरीरानें व्यंग, रोगी किंवा नुसता दुबळा आहे त्याला त्याच्या देवळांत याजक होण्याची, आणि कित्येक व्याधिग्रस्तांना पाय ठेवण्याची मनाई आहे. परमेश्वर सामर्थ्याचा, पूर्णत्वाचा कर्ता आहे...देवानें मनुष्याला सामर्थ्याचा पुतळा म्हणून उत्पन्न केला आहे....देवाच्या हेतूची पूर्तता म्हणजे मनुष्य...आम्हीं देवाचें साह्य घेऊन समर्थ व पूर्ण झालें पाहिजे, आणि मग तें सामर्थ्य व पूर्णत्व देवाच्या चरणीं अर्पिलें पाहिजे."

अणुशक्तीचा शोध किंवा आतां प्रतिचंद्र निर्माण करण्याची ऐकूं येत असलेली भाषा हीं सारीं मनुष्यांतील 'मानव्या'कडे पाह-

त्याच्या ह्या दृष्टिकोनाचींच फळें आहेत. हातपाय गाळणें हें जर नेपाळ-च्या तेनसिंगाला ठाऊक असतें तर त्यानें नऊ वेळेला अपयश आलें असतां पुन्हा दहाव्या वेळेस गौरीशंकर शिखर गांठण्याचा प्रयत्न केलाच नसता. हीं उदाहरणें टिळकाच्या नंतरचीं आहेत पण टिळक ज्या तत्त्वाचे 'भाट' बनले तें तत्त्व त्रिकालाबाधित आहे हें सिद्ध करा-यला तीं समर्थ आहेत.

टिळकाचें हें तत्त्व कवितेंत किंवा लेखनातच तेवढें दिसण्यांत येत नसून त्याच्या खाजगी जीवनातहि तें पुरें भिनलें होतें.

अगदीं 'मृत्युच्छायेच्या खिंडींतून' ते जात असताना सुद्धा त्याची ही वृत्ति ढळली नाहीं. आणि त्यामुळें त्याहि प्रवासांत त्यांचे हातपाय गळाल्याचें दिसून आलें नाहीं.

---*---

## ब्राह्मण किंवा महार

'काव्यवाहिनी' नांवाचें एक पुस्तक अगदीं अलीकडे प्रसिद्ध झालें आहे. त्यांत संपादकांनीं लिहिलेल्या उपोद्घातात (पृ० १५-१६) खरें धार्मिक स्वातंत्र्य ह्यावर लिहितांना – "अनेक शतकाच्या काला-वधींत धर्माचाराना शृंखलाचें स्वरूप आल्यानें त्याचा व्यक्तिजीवना-वरील जुलूम असह्य झाला" असें सांगून त्याविरुद्ध आर्वाचीन कवींनीं कसें बंड उभारलें तें दाखविलें आहे. त्यांत "धर्माचें माजवुनी डंबर, नीतीला आणिती अडथळे, विसरुनिया हे जातात खुळे, नीतीचें पद जेथें न ढळे, धर्म होतसे तेथेंच स्थिर" व "नियमन मनुजासाठीं, मानव नसे नियमनासाठीं." असें केशवसुतांनीं सांगून ठेवल्याचा निर्वाळा देऊन नंतर इतर कवींनीं त्याच बाबत काय काय सांगितलें आहे त्याचीं अवतरणें दिलीं आहेत — येता येतां ते टिळकाकडे येऊन म्हण-

तात, "ख्रिस्ती धर्माचा स्वीकार करूनहि टिळकांनीं 'न ब्राह्मण वा महार मी। जन्मभूमिसेवाधर्मी' असें आपल्या धर्माचें वर्णन केलें."

टिळकांनीं ह्या धार्मिक शृंखला तोडून ख्रिस्तीधर्म स्वीकारला असें म्हटलें असतें तर तें एक शोभलें असतें परंतु आपल्या साच्यांत न बसण्यासाठीं टिळकांनीं जें म्हटले नाहीं तें त्यांच्या माथीं मारून 'जन्मभूमिसेवाधर्मी मी ब्राह्मण नाहीं कीं महार नाहीं' असा अर्थ लावून त्यांना त्या चौकटींत कोंबण्याचा जो प्रयत्न केला आहे तो मोठा हास्यास्पद वाटतो. टिळकांचें मूळ वाक्य असें आहे. "मी ब्राह्मण वा महार मी। गणीं न कवणालाच कमी" व हें वाक्य अर्थदृष्ट्या पुरें व्हायला त्याच्या पुढच्या ओळीसह तें वाचायला पाहिजे.

या सृष्टींतिल दिव्यपण। तेंच तेंच हें मनुजपण

——पण असें कांहीं करण्याची यातायात न करतां संपादकानीं पहिलीच ओळ आपल्याला पाहिजे तशी फिरवाफिरव करून घेऊन न ब्राह्मण वा महार मी। जन्मभूमिसेवाधर्मी असें करून टाकलें आहे व त्यांतील महत्त्वाचा 'गणीं' हा शब्द अजिबातच गाळून टाकला आहे!

केशवसुतांचीं जीं दोन वाक्यें त्यानीं उद्धृत केलीं आहेत तीं नव्या करारातील येशू ख्रिस्ताच्या वाक्याची पद्यमय आवृत्ति आहे हें सांगायला नको.

पहिली ओळ मत्तय २३ अध्यायाचें सार काढून बनविली आहे. मार्क ७:१३ "या प्रकारें तुम्ही आपल्या चालू ठेवलेल्या संप्रदायानें देवाचें वचन रद्द करतां आणि यासारख्या इतर पुष्कळ गोष्टी करितां." हें त्या अध्यायाचें सार आहे. दुसरें वाक्य तर "शब्बाथ मनुष्यांसाठीं झाला, मनुष्य शब्बाथासाठीं झाला नाहीं." (मार्क २:२८) ह्याचें अक्षरशः रूपान्तर आहे. (शब्बाथ हा विसाव्याचा दिवस यहूदी

लोकांत पाळीत असत व तो पाळण्याचे जे कडक नियम होते ते मोडल्या-बद्दल येशूच्या शिष्यावर ठपका आला तेव्हा येशूनें हें म्हटलें आहे.)

'ब्राह्मण किंवा महार' ह्या कवितेसंबंधीं खुद्द टिळकांनीं निरनिराळ्या वेळीं लिहून ठेवलेलें आहे तें पाहिल्यास त्या कवितेसंबंधीं अधिक फोड होईल.

१९१५ सालीं अहमदनगरच्या डेक्कन इंडियन ख्रिश्चियन असोसिएशन तर्फे महाराष्ट्र साहित्यसंमेलनास दिलेल्या संदेशांत ह्या संपूर्ण कवितेचा उल्लेख करून टिळक म्हणाले होते —

" इतर कित्येक समाजांप्रमाणें आम्ही हिंदी ख्रिस्ती लोकहि आपल्या स्वतंत्र संस्था स्थापून स्वतंत्रपणें आपली सुधारणा व उन्नति करीत आहों. परंतु आम्हाला एक लहान सुंदरसें तळें किंवा सरोवर बनायचें नाहीं. ही हिंदी ख्रिस्ती लोकगंगा आजपासूनच राष्ट्रमहासागराकडे वाहात आहे, हिचा ओघ त्याच्याकडे धाव घेत आहे; ही जसजशी पूर्ण होत जाईल तसतशी इतर जगाशीं संगत होत होत शेवटीं ह्या महासागरांत विलीन होईल. आपणास इतकीच विनंती आहे, कीं आपण हिच्या मार्गांतील विघ्नें दूर करा, हिला स्वतः तुच्छ, त्याज्य, आपल्या देशाबाहेरची मानू नका आणि इतरांना तशी मानू देऊं नका. आम्हाला व आपणाला ह्या सहस्रशीर्ष, सहस्राक्ष, सहस्रपाद हिंदी राष्ट्राचा " सर्वं इदं यद्भूतं यच्च भव्य उतामृतस्यापि ईशानः " असा [illegible]पुरुष बनवायचा आहे.

असा राष्ट्रपुरुष बनवणाराची वृत्ति ' ब्राह्मण किंवा महार ' ह्या पद्याप्रमाणें झाली पाहिजे.

१९१३ च्या एका ज्ञानोदयांतील स्फुटांत ' ब्राह्मणाचें वर्चस्व ' ह्या शीर्षकाखालीं टिळकांनीं एक स्फुट लिहून त्याखालीं पुन्हा ही

संपूर्ण कविता छापली आहे. ही मुळीं त्या स्फुटांसाठींच लिहिण्यात आली असावी असें दिसतें, कारण त्याच्या आधीं ती कोठें प्रसिद्ध झालेली नाहीं. तें स्फुट असें—

" ब्राह्मणांचें वर्चस्व ब्राह्मणांना कायम ठेवावयाचें असेल तर त्यांनीं त्याचाच त्याग केला पाहिजे. 'जो आपल्या जीवाला राखील तो त्याला मुकेल' ही प्रभु येशू ख्रिस्ताची वाणी जगाच्या कानीं पडून आतां दोन हजार वर्षें होतील. जगाला आतां ही चांगली समजली आहे, आता कोणी भाडून तडून, जगाच्या अज्ञानाचा फायदा घेऊन, नुसते 'आम्ही मोठे! आम्ही मोठे!' म्हणून विकट वर्तन करून आपलें वर्चस्व कायम ठेवू पाहील, तर तो त्याला खातरीनें मुकेल. यहुद्यांचा एक धर्ममार्तंड पौल ही ख्रिस्तवाणी ऐकून जेव्हा आपल्या सर्व वर्चस्वावर उदक सोडून 'सर्वांचा दास' झाला तेव्हांच त्याचें वर्चस्व अजरामर होऊन राहिलें. ( १ करिंथ ९:१९ )

"....आम्ही विसाव्या शतकाचा सल्ला घेऊन आपल्या ब्राह्मण देशबांधवांना विनयपूर्वक कळवितों कीं तुमचें वर्चस्व कायम रहावें म्हणून तुम्हाला आम्ही एवढाच निरोप देतों, कीं—

( ह्या नंतर संपूर्ण कविता देऊन शेवटीं म्हटलें आहे. )

" हें पद्य म्हणजे मोठेंसें सुंदर काव्य नाही, तथापि हें एखाद्या महामंत्रासारखें मुखोद्गत करा, आणि हें तुमच्या धर्मांत, शीलांत आचरणांत तसेंच उद्गत असू द्या तरच तुमचें वर्चस्व कायम राहील, नाही तर तुम्ही नुसेत आसन्नपतन नव्हे, आसन्नमरण आहां. तुमच्या पतनाची किंवा मरणाची कोणी वाट पाहात नाहीत, उलट तुम्हीं पडू नये, मरू नये अशीच सर्वांची इच्छा आहे. "

१९१७ साल्च्या ज्ञानोदयांत, 'आपण ' होमरूलर ' का झालों ह्यासंबधीं लिहितांना पुन्हा ह्याच कवितेचा आधार घेऊन टिळक म्हणतात—

" मी ख्रिस्ताचा अनुयायी आहें. युरोपचा नाही, अमेरिकेचा नाही, मिशनाचा नाही, मिशनरींचा नाही, चर्चचा नाही. मला चार पुढारी नको आहेत. लोक मागासलेले, दुबळे, धिक्कारलेले कसे का असेनात, लोक पाहिजेत आहेत. हे लोक म्हणजे माझें हिंदिस्तान, माझी मातृभूमि. हे लोक म्हणजे देवाचे प्रतिनिधि. ( मत्तय २५:३५–४५ )

"या लोकांना—माझ्या जन्मभूमिला मी म्हणत आहें कीं—

" तूंच घालिशिल जो वदनीं
तोच घास मी खाईन !
नातरि उपाशि राहोनी
तसाच मरुनी जाईन ! ॥
निजलों, बसलों,
सहर्ष रमलों
तिथेंचि मेलों
तव अंकावरि जरि जननी
तरी धन्य मी जन्मोनी. "

—*—

## रणशिंग व बोंबाबोंब

एकदा एक ख्रिस्ती कीर्तनकार येऊन टिळकांना आग्रह करूं लागले कीं मी देतों त्या चालीवर एक गाणें रचून द्या. आज मला कीर्तनांत तें म्हणायला पाहिजे. टिळकांनीं तावडतोब कागदपेन्सिल घेऊन त्या गृहस्थांची गरज भागविली. तें पद्य असें होतें—

सुख न ह्या जगात रे ।
जा कुठेंहि, जा पहा ॥ ध्रु० ॥
सुखनिधान धन म्हणोत, निधन तें मनाचें ! ।
कीर्ति बुद्बुदासमान फुटुन जाय, नेम हा ॥ १ ॥
सुख मनांत, सुख जनांत, सुख वनीं नसे रे ।
सुखनिधान तूंच ! तूंच ! हे प्रभो, गुरो महा ॥ २ ॥
ह्यापुढें तुझाच देह, जीव हा दयाळा ।
ह्याविना नसो जगांत मज दुजी विभो स्पृहा ॥ ३ ॥

घरात आम्हाला सगळ्यांना ती चाल फार आवडली होती. तेव्हां आम्ही सर्वजणच तें सुखपद गुणगुणत होतों. संध्याकाळीं डॉमेर निल्सा-प्रमाणें आले. त्यानीं जेव्हां घरांत ज्याच्यात्याच्या तोंडीं 'सुख न ह्या जगात रे' हा मनघोष ऐकला व टिळकांची ती नवी कविता आहे हें त्याना समजलें तेव्हा ते म्हणाले, 'मी पैज लावतों हें गाणें टिळकाचें नाहीं. त्याच्या साऱ्या लिखाणांत निराशेची एक ओळ सांपडणार नाहीं.' मग त्यांना आम्हीं सगळी कविता दाखविली. त्यानीं पैज जिंकली.

टिळकांना ही भूमीच मुळीं स्वर्ग आहे असें वाटे.

" म्हणे, जाऊ चला स्वर्गीं 'नको देवी' म्हणालों मी
'तिथें नाही नवें कांहीं धरीना जें इथें भूमी.' "

टिळकांचीं 'रणशिंग व बोंबाबोंब' हीं दोन गाणीं

अधारांतुन उजेड ये । तत्त्व नवें हें सदा नवें
अशुभ निराशेच्या उदरीं । देवी आशा जन्म वरी

हेंच तत्त्व निराळ्या रीतीनें पटवीत आहेत. मनुष्य आपल्या परिस्थिती-च्या स्वामी असल्यावर 'मेलों गेलों ठार बुडालों असली बोंबाबोंब करण्याचे कारणच त्याला उरत नाहीं.

दुसऱ्या एका कवितेत टिळक म्हणतात —

सरणें आणी मरणें एकच, यात न संशय मला जरा ।
कार्य संपलें माझें म्हणणें खराच हा मृत्यू दुसरा ॥

हे सारे अनुभव अमोल फल देणारे आहेत. पण असले अनुभव मोल दिल्याशिवाय मिळत नसतात. आपण ही जी देवघेव केली आहे ती लाभदायकच आहे. मग बोंबाबोंब कशाला ती? आपल्या देशांत लहानमोठ्या अनेक जाति व जमाती असून त्या आपापल्या परीनें आपापली सुधारणा करूं लागल्या आहेत, यावरून तुला वाटत आहे कीं ह्या जाती विभक्त आहेत. पण तसें नाहीं. ह्या प्रत्येक अशाच स्वतंत्र रीतीनें सुधारत जातील व शेवटीं यांच्या सुधारणेच्या स्वतंत्र ओघाचें समापन एकाच राष्ट्र कार्यांत होईल. नद्या आणि नाले भिन्न दिशांनीं वाहात गेले, तरी शेवटीं समुद्रांत एक होतात. तसेंच हें होणार आहे. मग कशाला बोंबाबोंब तर?

अद्यापि आपल्या देशांत सारा अंधार आहे असें म्हणतोस? बरें तसें का होईना. पण त्यासाठीं एवढी बोंबाबोंब करायला नको. आकाशां-त तारे काहीं एकदम उदयाला येत नसतात. आता थोडे मग थोडे असें होत होत सारें आकाश ताऱ्यानीं व्याप्त होऊन शोभू लागतें. आपल्यांत थोडे थोडे लोकहितकर्ते राष्ट्रपुरुष उदयाला येत आहेत का? थांब थोडा उगीच गबाबाब आताच करू नको. पहा आणखी किती तारका लौकरच चमकूं लागतील त्या.

व्यर्थ बोंबाबोंब करूं नको. यहुदी, पारशी, मिसरी वगैरे लोकांच्या राष्ट्रीयत्वाच्या नावा कशा फुटल्या हें इतिहासप्रसिद्ध आहे, पण ही हिंदराष्ट्रीयत्वाची नाव किती जरी वादळें होऊन गेलीं, तरी फुटली नाहीं. हिला जिकडे जायचें आहे तो किनारा दूर आहे. पण ही बळकट आहे, तर मग——

मेलों, गेलों ठार बुडालों!
क्यों यह बकवा? जयजय बोलो!
नैराश्योद्भव आशावैभव
कशास बोंबाबोंब?

৬২৬৫০
৭৬২২
REFBK-0007932